# सावरकर यांच्या आठवणी

संकलन:

श्री राजाराम लक्ष्मण रेणावीकर



ावरकर यांच्या आठवणी

I /Mar. 652

# सावरकर यांच्या आठवणी

By
S. V. MODAK

प्रकाशक
अधिकारी प्रकाशन
पुणें २

प्रकाशक :

सौ. कमलाबाई अधिकारी
मालक—अधिकारी प्रकाशन
३९६ नारायण पेठ, पुणें २
दि. १८ डिसेंबर १९६२

किंमत ४ रु.

SRS 923.2
Sa 92 M

मुद्रक :

शं. रा. दाते
यशवंत मुद्रणालय
१८३५ सदाशिव पेठ,
पुणें २.

UNIVERSITY
of
PENNSYLVANIA
LIBRARIES

# प्रस्तावना

स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर यांच्या आठवणी मिळवून प्रसिद्ध करण्याची योजना श्री. राजाराम लक्ष्मण रेणावीकर यांनी आपल्या अंगावर घेतली. त्यासाठी वर्षभर अतिशय मेहनत घेऊन आठवणी जमविल्या. त्यांचें कर्तृत्व त्यांचें वक्तृत्व हें सर्वथैव उचित. या न्यायानें त्यांनीच या प्रकाशनाच्या कामीं लिहिणें योग्य व उचित होतें. परंतु रेणावीकरांच्या सूचनेवरून मला हे चार शब्द लिहिणें क्रमप्राप्त झालें आहे.

स्वातंत्र्यवीर तात्यारावांचें जीवन हें सागराप्रमाणें विशाल, बहुरंगी व बहुविध आहे. त्यांच्या जीवनावर अनेकांनी चरित्रें लिहिलीं आहेत. स्वतः तात्यारावांनीहि आत्मचरित्रपर दोन पुस्तकें लिहिलीं आहेत. असें असलें तरी त्यांच्या जीवनाचें समग्र दर्शन तेवढ्यानें होत नाही. आठवणी ह्या चरित्र व आत्मचरित्र यांना सांधणारा पूरक दुवा आहे. माळेंतील एक एक मणि हा जसा अखंड स्मरणीचा घटक असतो, तसेंच जीवनांतील अनेकविध वैचारिक पैलूंचें दर्शन आठवणींच्या रूपानें घडतें. तात्यारावांच्या गांठी-भेटींत वा संभाषणांत निरनिराळ्या विषयांवर त्यांनी व्यक्त केलेल्या विचा-रांचा वा व्यक्तिमत्त्वाचा संबंधित व्यक्तींच्या मनावर किंवा बुद्धीवर उमट-लेल्या ठशाचें दर्शन आठवणींच्या रूपानें यांत दिसतें.

उत्कृष्ट चरित्रांत छायाप्रकाश हीं एकत्र वस्ती करून राहतात असें म्हणतात. स्वातंत्र्यवीरांचें जीवनहि अशा तऱ्हेचें आहे. उपेक्षा–गैरसमज–अपसमज यांनी तें व्यापलेलें आहे. जो जाणता असतो तो प्रायः प्रिय असतोच असें नाही हें व्यवहारांतील कटु सत्य त्यांच्या जीवनात पदोपदी दृष्टीस पडतें.

स्वातंत्र्यवीरांचा अनेकांशी संबंध आला आहे. अनेकांना पत्रें लिहूनहि आठवणी मिळूं शकल्या नाहीत. तथापि हातीं असलेल्या आठवणी प्रसिद्ध करून हातावेगळें व्हावें असें ठरविलें. या प्रसिद्धीकरणामुळें अद्याप प्रसिद्ध न झालेल्या आठवणींच्या संकलनास गति मिळावी, उमेद यावी, उत्साह उत्पन्न व्हावा व तात्यारावांच्या समग्र जीवनाचें दर्शन घडण्यास मदत व्हावी एवढीच परमेश्वरचरणीं प्रार्थना आहे.

शि. वि. मोडक

## अनुक्रमणिका

लेखक व आठवणी


| | | आठवण क्रमांक |
|---|---|---|
| १. | श्री. शंकर नारायण मोघे – आपले सहकारी आपल्या सहवासात असावेत. | १—११ |
| २. | श्री. बा. सा. बुधकर – सावरकर शपथविधि कसा करीत. | १२—१३ |
| ३. | श्री. के. जी. खरे – क्रांतिकारकांचा आत्मविश्वास | १४ |
| ४. | श्री. श्री. वा. सातवळेकर – मला हद्दपार केलें. | १५—१६ |
| ५. | श्री. धों. कृ. साठे – तरुणांची संघटना | १७ |
| ६. | श्री. वि. रा. टकले – अपराधी ओंकारेश्वर दर्शन | १८ |
| ७. | श्री. ज. ना. यत्ते – त्यांच्या बलिदानापुढे माझी काय कथा | १९ |
| ८. | श्री. रा. अ. कानिटकर – सावरकर यांचा पोशाख. | २० |
| ९. | श्री. श्री. र. वर्तक – दुर्दम्य आशावाद. | २१ |
| १०. | श्री. रा. बा. सोमण – अंदमानाला जाण्याची तयारी. | २२ |
| ११. | श्री. म. वि. लिमये – राहावयास घर मिळेना. | २३ |
| १२. | श्री. मो. वि. दामले – कट्टर सनातनी अनुयायी झाला. | २४—२७ |
| १३. | श्री. श्री. वि. वेलणकर – रत्नागिरी येथील चौपाटी | २८—२९ |
| १४. | श्री. य. गो. धैसास – तरीही हरकत नाही. | ३० |
| १५. | सौ. ताई दातार – मतभेद असला तरी आशीर्वाद मागितला | ३१—४१ |
| १६. | श्री. शं. गो. देवधर – खास संरक्षक. | ४२—४३ |
| १७. | श्री. र. के. पटवर्धन – उत्तरें ऐकून आश्चर्यचकित झाले. | ४४ |
| १८. | श्री. शं. वा. परांजपे – शब्दांना प्रतिशब्द. | ४५—४६ |
| १९. | श्री. वि. दा. बोरकर – प्रयोग पाहून अधिक समजलें. | ४७—५० |
| २०. | श्री. आत्माराम नाना पाटील – क्रांतिकारक आहेत – त्यांच्यात सामील व्हा. | ५१ |
| २१. | श्री. स. दी. पाटील – भगतसिंगाच्या फांशीने बेचैन झाले. | ५२ |
| २२. | श्री. वा. कृ. भावे – स्वदेशीचें प्रात्यक्षिक. | ५३ |
| २३. | श्री. द. धों. रेगे – बाळ, तू चित्रकार होशील. | ५४—६१ |





| | | |
|---|---|---|
| २४. | श्री. भय्याशास्त्री वाटवे – नेपाळकडे पहा. | ६२ |
| २५. | श्री. शं. ना. जोशी – इतिहास, इतिहासाचा उपयोग | ६३ |
| २६. | श्री. न. गो. ठाकूर – अस्पृश्योद्धार नव्हे स्पृश्योद्धार | ६४ |
| २७. | श्री. अ. शं. जोशी – सहभोजनाचा कार्यक्रम | ६५ |
| २८. | श्री. स. प. करंबीकर – प्रचारक नाही, मीच येतो | ६६ |
| २९. | श्री. न. गो. अभ्यंकर – गोवंश हत्याविरोधी आंदोलन. | ६७ |
| ३०. | श्री. गो. वि. आठल्ये – इंडिया नव्हे, हिंदुस्थान | ६८ |
| ३१. | श्री. ग. म. आपटे – मातृभाषेचा अभिमान | ६९ |
| ३२. | श्री. ह. सी. करमरकर – झिंदाबाद नव्हे 'अमर रहे' | ७० |
| ३३. | श्री. ज. ग. करंदीकर – भारत सरकारच्या समितीकरता लेख. | ७१—७८ |
| ३४. | एक सावरकरभक्त – औषधें मात्र न चुकतां घेतात. | ७९—८१ |
| ३५. | श्री. दि. वि. काळे – त्यांना शिवाजी पचावयचा नाही | ८२ |
| ३६. | श्री. शं. वा. किर्लोस्कर – क्रांतिकारक भेटला नाही. | ८३—८४ |
| ३७. | श्री. म. तु. कुळकर्णी – शस्त्र नाही म्हणून निशस्त्र आहोंत. | ८५—८६, १८२ |
| ३८. | श्री. त्र्यं. व्यं. कुलकर्णी – श्रीडवायरचा खून. | ८७ |
| ३९. | श्री. ना. बा. केळकर – तात्याराव केळकरांपासून आरंभ करा. | ८८—८९ |
| ४०. | सौ. लक्ष्मीबाई केळकर – वर्तावरणामुळे शत्रूचा फायदा होऊं नये. | ९० |
| ४१. | श्रीमती गोदूबाई खरे – ही सर्वोत्तम गोष्ट आहे. | ९१—९३ |
| ४२. | डॉ. ना. भा. खरे – माझ्या कार्याचा गौरव केला. | ९४—९७ |
| ४३. | श्री. बा. ब. गोगटे – क्रांतिकारकांचें एक महत्त्वाचें सूत्र | ९८ |
| ४४. | श्री. न. का. घारपुरे – उंच व सरळ तट कसा चढलों. | ९९ |
| ४५. | डॉ. ना. ग. चाफेकर – अंडें घेण्याचा सल्ला दिला. | १००—१०२ |
| ४६. | डॉ. श. ग. चाफेकर – चाफेकरांनी हार घालावयाचा नाही. | १०३—१०४ |
| ४७. | श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव – तुळशीपत्र वापरावें | १०५ |

४८. श्री. के. ह. जावडेकर—आपलें नातें चोखून ठेवीत. १०६
४९. श्री. धों. के. जोगळेकर—अस्पृश्यता प्रथम पाळवा. १०७—१०९
५०. श्री. क. तु. तळेकर—खून नव्हे, वध म्हणा. ११०—११४
५१. श्री. रा. स. भट—सिंह अध्यक्ष कसा होणार. ११५
५२. श्री. शि. वि. दामले—बंदुका उलट्या चालवाव्या. ११६—१२०
५३. श्री. मा. श्री. अणे—भेटल्याशिवाय कसा जाऊं १२१
५४. श्री. अनभिज्ञ—स्वातंत्र्यलक्ष्मी की जय. १२२—१२३
५५. श्री. र. ल. उपासनी—शील गुरुंवर पुस्तकें पाहिजेत. १२४
५६. श्री. नरसिंह ग. जोशी—हिंदुजातीचीं लेकरें १२५
५७. श्री. भि. शा. जोशी—नोकरी करणें राष्ट्रसेवाच आहे. १२६
५८. श्री. म. रा. तुळशीबागवाले—अधिवेशन भरवा मगच अटकी व्हा. १२७—१२८
५९. श्री. राम रानडे—सभा होईपर्यन्त दाढी काढू नका. १२९—१३०
६०. श्री. दत्तो वामन पोतदार—त्यांचें शरीर तजेलदार होतें. १३१—१३३
६१. प्रो. शं. दा. पेंडसे—अर्वाचीन सावित्री. १३४—१३८
६२. डॉ. के. ना. वाटवे—आठल्ये, असें करूं नका. १३९—१४१
६३. श्रीमती यशोदाबाई भोपटकर—मी तुम्हाला बाई म्हणू का. १४२—१४४
६४. श्री. हरिभाऊ भागवत—कडकडून आलिंगन दिलें. १४५—१४७
६५. श्री. ह. त्र्यं. देसाई—महाराजांनी न्हावी. १४८—१५०
६६. श्री. कृष्णराव गांगुर्डे—पालजी, ही सर्व मंडळी आपलीच आहेत. १५१—१६७
६७. श्रीमती मनोरमा देशपांडे—चरित्र लेखक हेही क्रांतिकारकच. १६८—१६९
६८. श्री. वि. शा. कोठीवाले—धर्माचें स्थान हृदय-पोट नव्हे. १७०—१७३
६९. श्री. द. बा. बर्वे—कोण हे बापूजी ? १७४—१७६
७०. श्री. वि. रा. सुपेकर—वीरपत्नींचें दर्शन १७७—१८१
७१. श्री. ह. भा. भिडे—एकमेव मार्ग म्हणजे सैनिकीकरण. १८३—१८४
७२. श्री. स. के. नेऊरगांवकर—राष्ट्रभाषेचें हें ममक. १८५

# अंतिम यश आपलेंच आहे

## एक हृदयस्पर्शी प्रसंग

सन १८५७ चा स्वातंत्र्यसमर शताब्दी महोत्सव झाला. अखिल भारतांतून आलेल्या हिंदुमहासभेच्या सर्व कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी जलपानाच्या कार्यक्रमासाठी 'जनपथ' हॉटेलांत बोलाविलें होतें. या वेळीं सर्वांची आस्थेवाईकपणें त्यांनी विचारपूस केली. शेवटीं सर्वांना उद्देशून ते जेव्हा बोलू लागले तेव्हा ते अत्यंत भारावून गेले होते. ते म्हणाले, 'आपण सर्वजण येथे आलांत ते माझ्यावरील अत्यंत श्रद्धेने, प्रेमाने व आपुलकीने, याची मला जाणीव आहे. या प्रेमाबद्दल मी कृतज्ञ आहे. आपणांस मी कधीच विसरणार नाही. माझ्याबरोबर गेल्या ५०।५५ वर्षांत चार पिढ्यांनी काम केलें. माझें नेतृत्व ज्यांनी पत्करलें, मानलें व आदरिलें, त्यांना मी मात्र कांहीच देऊं शकलेलों नाही. ना मान! ना सन्मान! ना लाभ! ना प्रतिष्ठा! कांहीच नाही! उलट त्यांना अपमान, दारिद्र्य व कष्ट सहन करावे लागले. येवढेंच नव्हे तर सर्वस्वाचा होम करण्याचीही पाळी आली. बरें इतकें करून पुढे तरी कांही दिसतें आहे का? नाही! तेथेहि निराशाच आहे. पण आपण अद्यापहि माझ्यामागे येत आहांत! आपला ध्येयवाद जाज्वल्य आहे. निश्चय वज्रवत् आहे. आपली मनोधारणा खंबीर आहे हें पाहून माझें मन आशावादीपणानें हर्षोत्फुल्ल झालें आहे. लक्षांत ठेवा! आपण सारखे पराभव सोशीत असलों तरी आपलाच पक्ष या राष्ट्रांतील विजयी पक्ष आहे. ध्येयापासून विचलित होऊं नका! हिंदुहिताशीं प्रतारणा करूं नका. निश्चयाने पुढे जा! अगदी एकाकी असलांत तरी हिंदुमहासभेचा कृपाणकुंडलिनीयुक्त भगवा ध्वज खांद्यावर टाकून धैर्याने पुढे जा. अंतिम यश आपलेंच आहे. माझा तुम्हांला आशीर्वाद आहे.'

भावनातिरेकानें वीर सावरकरांना यापुढे बोलणें अशक्य झालें; ते क्षणमात्र स्तब्ध झाले; या वेळीं त्यांच्या नेत्रांतील चमक व चेहऱ्यावरील तेज विलोभनीय होतें. निश्चयी व करारी दृष्टीने त्यांनी निरोप घेतला. या वेळीं वातावरण येवढें गंभीर होतें की, कार्यकर्ते क्षणमात्र दिङ्मूढच बनले; प्रत्येकाची नजर फक्त स्वातंत्र्यवीरांच्या प्रसन्न व तेजस्वी मुखमंडलावर खिळून राहिली होती.

द. बि. नामजोशी

# सावरकरांच्या आठवणी

## १. आपले सहकारी आपल्या सहवासांत असावेत.

१९०३ सालीं माझें वास्तव्य न्यू इंग्लिश स्कूलचे बोर्डिंगमध्यें होतें. पुण्यांत प्लेग झाल्यामुळें आमचें बोर्डिंग फर्ग्युसन कॉलेजांत गेलें होतें. बहुतेक विद्यार्थ्यांची राहण्याची सोय कॉलेजच्या वसतिगृहांत लावण्यांत आली होती. मला मात्र एका स्वतंत्र तंबूंत ठेवून आपल्या मर्जीतले ५।६ विद्यार्थी माझेवर लक्ष ठेवण्यासाठी बोर्डिंगचे प्रमुख प्रा. के. आर. कानिटकरांनी त्याच तंबूंत ठेवले होते. कारण त्या वेळीं कॉलेजांत असलेल्या विनायकराव सावरकरांचा व माझा संबंध येतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष होता व त्याप्रमाणें त्यांनी मला बजावून ठेवलें होतें. पण यामुळेंच मी सावरकरांकडे अधिक आकृष्ट झालों. हर प्रयत्नानें त्यांना भेटलों. नंतर त्या कॉलेजांतील कानिटकरांच्या मर्जीतला विद्यार्थी श्री. जोगळेकर ( जुन्नरचे जोगळेकर वकील ) यांच्या खोलींत मला राहावयास आणण्याची व्यवस्था लवकरच सावरकरांनी केली. तात्यांना आपले सहकारी शक्य तेवढे आपल्या सहवासांत असावेत व मित्र-मंडळींत होणाऱ्या वादविवादानें त्यांच्या ज्ञानांत भर पडावी व त्यांची मनें ध्येयसिद्धीला सिद्ध व्हावीत असें वाटत असे.

१९०३ मध्यें मी कॉलेजच्या वसतिगृहांत राहत असतांना केसरी, काळ, इंडियन सोशॅलिस्ट, अमृतबझारपत्रिका वगैरे वृत्तपत्रें रात्रीं ८ नंतर सामुदायिक रीत्या वाचण्याचा व त्यावर साधकबाधक चर्चा करण्याचा तात्यांचा कार्यक्रम असे. या चर्चा कधीं कधीं वेळेचें भान न राहतां रात्रीं १-२ वाजेपर्यंतहि चालत. मात्र यामुळें ऐकणाऱ्यांच्या व चर्चेंत भाग घेणाऱ्यांच्या ज्ञानांत निश्चित भर पडत असे. स्मरणांत आहे त्याप्रमाणें या वेळीं बहुधा तात्या, हरिभाऊ थत्ते, दाजी नागेश आपटे, विष्णु महादेव भट, जोगळेकर व चिपळूणकर ही मंडळी उपस्थित असत व सर्वजण चर्चेंत हिरिरीनें भाग घेत.

## २. सहकाऱ्यांवरील प्रेम

तात्या आपल्या सहकाऱ्यांशी अत्यंत प्रेमाने वागत. त्यांतील कोणी आजारी पडला तर जातीने आपल्या धाकट्या भावाप्रमाणे त्याची काळजी घेत. वसतिगृहात असतांना मला तीन चार दिवस मामुली ताप आला. त्या वेळीं आमच्या बोर्डिंगांतून माझ्यासाठी साबूदाण्याची लापशी येत असे. तात्या व त्यांचे मित्र माझी जातीने काळजी घेत. बरा झाल्यावरहि मला सकस अन्न मिळावें म्हणून तात्यांनी मला कित्येक दिवस कॉलेजच्या शिवाजी क्लबमध्ये कोणाचा ना कोणाचा तरी पाहुणा म्हणून भोजनास नेलें व माझी येणारी लापशी सर्वजणांनी आनंदाने खाल्ली. त्यांच्या असल्या आपुलकीच्या वर्तनाने ते सहज कोणालाहि आपलासा करीत.

शपथबद्ध सदस्यांच्या आठवड्याच्या सभा रात्रीचे वेळीं फर्ग्युसन कॉलेजच्या मागील टेकडीवर भरत. त्या वेळीं कॉलेजच्या वसतिगृहांतील विद्यार्थी, व गावांतील शाळा कॉलेजांतील विद्यार्थी उपस्थित असत. सभेला ठरलेल्या वेळीं प्रारंभ करण्यावर तात्यांचा कटाक्ष असे. उपस्थितांपैकी प्रत्येकाने सभेंत येईल तसें बोललेंच पाहिजे असा त्यांचा दंडक होता. सभेला प्रारंभ होण्यापूर्वी तात्या शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची, परीक्षेंतील गुणांची, शालेय क्रमांकाची व तो घेत असलेल्या व्यायामाची विचारणा करीत. त्यांत न्यून दिसल्यास गोड शब्दांत समज देत. फारच कमतरता दिसल्यास, "पहा रे बुवा, अभ्यासांत सुधारणा न झाल्यास तुला सभाबंदीची शिक्षा द्यावी लागेल" असें बजावीत. माझ्या सदस्यांत बत्थड विद्यार्थी नकोत, त्याने आपल्या कार्याची हानि होते असें ते सांगत. त्याचा इष्ट तो परिणाम होत असे. सभाबंदीची शिक्षा आम्हांला अत्यंत अपमानास्पद वाटे. मला एकदा हिंदुस्थानचे इतिहासांत ६० गुण मिळाले असतांहि "तुला इतके गुण कमी कां?" म्हणून तात्या बोलले. "मी तुम्हांला हिंदुस्थानचे इतिहासां-तील इतक्या खाचाखोचा समजावून सांगतों की तुम्हाला त्या विषयांत निदान ८० तरी गुण पडलेच पाहिजेत" असें ते म्हणत.

आपल्या सहकाऱ्यांतील गुणदोषांचे तात्या फार बारकाईने निरीक्षण करीत. त्यांचे दोष चव्हाट्यापुढे ते कधींहि उघडे पडूं देत नसत. उलट



त्यांवर पांघरूण घालीत. मात्र एकान्तांत गोड शब्दांनी व अवश्य तेवढ्या कठोर वाणीनेहि ते त्यांना दाखवून देत. मित्रांतील गुण वाढीस लावून त्यांना राष्ट्रीय वळण देऊन त्यांचा आपल्या क्रांतिकार्यासाठी उपयोग करून घेण्याची तात्यांची हातोटी कांही विलक्षण होती. हें कार्य ते कधी विनोदाने, कधी टिंगल करून, कधी उपदेश करून व ऐतिहासिक दाखले देऊन, तर कधी उपहासाने वा त्यांना डिवचून पार पाडीत. त्यांचा सिंहगडचा व बाजी प्रभूचा पोवाडा ( अभिनव भारतमाला पुष्प १ व २) नुकताच प्रसिद्ध झाला होता. एकदा गप्पा मारतां मारतां मला व दाजी नामेश आपटे यांना ते म्हणाले, "अरे माझे दोन पोवाडे प्रसिद्ध झाले, आता मी तुमच्या पोवाड्यांची वाट पहात आहे." याचाच परिणाम मी प्रतापराव गुजराचा पोवाडा (अभिनव भारतमाला पुष्प ३) व आपट्यांनी मुरारबाजीचा पोवाडा ( अभिनव भारतमाला पुष्प ४ ) हे लिहिले. पण मी शालेय विद्यार्थी असल्यामुळे माझा पोवाडा प्रसिद्ध करणें शक्य नव्हतें. तेव्हा तात्यांनी कै. दे. भ. शिवराम महादेव परांजपे यांना सांगून त्यांच्या मनोहर छापखान्यात तो छापून देण्याची व्यवस्था केली.

## ३. परदेशी कापडाची होळी कशी केली ?

१९०५ मध्ये गणेशोत्सवानिमित्त तात्या दे. भ. शिवराम महादेव परांजपे यांना नाशकास घेऊन गेले होते. तेथून परत आल्यावर वंगभंगामुळे परदेशी कापडाच्या बहिष्काराच्या उसळलेल्या चळवळीला पुण्यांत परदेशी कापडाची होळी करून अभिनव धक्का देण्याचें त्यांनी ठरविलें. त्यासंबंधी मित्रमंडळींत चर्चा केली. दसऱ्याचे मुहूर्तावर हा कार्यक्रम पार पाडण्याचें ठरविलें. तात्यासाहेब केळकर यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभेच्या सभागृहामध्ये १-१०-१९०५ ला सभा घेण्यांत आली. तात्यांचें मुख्य वक्ते म्हणून ओजस्वी व मुद्देसूद भाषण झालें. त्यांत त्यांनी परदेशी कापडाची होळी दसऱ्याच्या दिवशी करण्याचा मुद्दा ठासून मांडला व श्रोत्यांचे मनावर बिंबविला.

परदेशी कापडाची होळी करण्याचें ठरलें. तात्यांची बी.ए. ची परीक्षा या वेळी २-३ महिन्यांवर येऊन ठेपली होती. पण त्यांनी अभ्यासाची पुस्तकें गुंडाळून ठेवून होळीचा कार्यक्रम यशस्वी करण्याचें ठरविलें. कपडे

धर्मादिव्याची सभा कोठें घ्यावयाची, कोणी कोणी काय काय करावयाचें, मिरवणुकीची सजावट कशी करावयाची, ती कोणत्या मार्गानें न्यावयाची वगैरे गोष्टी त्यांनी निश्चित केल्या. दसऱ्यापूर्वीच्या मंगळवारच्या केसरींत तात्याराव केळकरांनी सर्व विदेशी कापडाची होळी न करतां काही गरिबांना वाटले जातील असें प्रसिद्ध केलें. या वेळीं लोकमान्य टिळक मुंबईला होते. केसरींतील मजकुरानें जनतेचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून तात्यांनी पत्रकें काढून शहरभर वाटण्याचें ठरविलें. आम्ही निरनिराळ्या छापखान्यांतून पत्रकें छापून घेण्याचा प्रयत्न केला. पण कोणीहि पत्रकें छापून देईनात. तात्यांना हें कळवितांच तें स्वतः काळकर्त्यांकडे गेले व त्यांनी मान्य केलें. पण त्या दिवशी त्यांचा छापखाना बंद होता. परांजप्यांनी स्वतः पत्रकाचें खिळे जुळविले, फॉर्म ठोकला व यंत्र चालू करून एका बाजूला ते स्वतः व दुसऱ्या बाजूला तात्या अशा रीतीनें तें चालविलें. अवश्य तीं पत्रकें छापून घेतलीं. मुलांनी तीं पुणें शहरभर वाटलीं.

दसऱ्याचे दिवशी दुपारीं जवळच तीनच्या सुमारास भोपटकर बंधूंनी काढलेल्या महाराष्ट्र विद्यालयाच्या चौकांत सावरकरांचें अत्यंत ओजस्वी व्याख्यान झालें. त्यांच्या व्याख्यानाच्या वेळीं ५-५ मिनिटांनी श्रोतृवर्गांकडून विदेशी कापडाचा व कपड्यांचा वर्षाव होऊन त्यांचा ढीग जमत होता. भोपटकर बंधु, काळकर्ते परांजपे, तात्यांचा मित्रगण या वेळीं उपस्थित होते. गटाऱ्यावर झोपाळा ठेवून त्यावर कापडाचा ढीग रचण्यांत आला. त्यावर फुलें गुलाल टाकून त्यावर भाताचा बळी व त्यांत जळता काकडा ठेवण्यांत आला. त्यापुढे चौघड्याचीहि योजना करण्यांत आली. अशा रीतीनें मिरवणूक निघाली. फार मोठा तरुणांचा समुदाय मागून घोषणा करीत चालला होता. मात्र केसरींतील प्रसिद्धीमुळें वयातील माणसें केवळ बघायचेंच काम करीत होतीं. हळू हळू मिरवणूक टिळक राहत होते त्या वाड्यापर्यंत आली. इतक्यांत टिळक मुंबईहून परत आल्याचें समजलें. तेव्हा तात्या, रिसबूड व मी असे माडीवर जाऊन टिळकांना भेटलों. तात्यांनी "दादा, तुम्ही येणार ना?" असा प्रश्न करतांच "तेवढ्या-करतांच तर धावत मुंबईहून आलों" असें म्हणून टिळक मिरवणुकीत सामील झाले. टिळक मिरवणुकींत सामील झाल्याची वार्ता वाऱ्यासारखी



शहरांत पसरली. मग लहान-थोरांच्या झुंडीच्या झुंडी मिरवणुकींत सामील झाल्या. लकडी पुलाकडे फर्ग्युसन कॉलेजजवळील मैदानावर परदेशी कापडाची चिता रचून होळी करण्यांत आली. त्या वेळीं सावरकर, टिळक व परांजपे यांचीं अत्यंत मार्मिक व स्फूर्तिदायक व्याख्यानें झालीं.

## ४. नरकाचा दरबार

परदेशी कापडाच्या होळी प्रकरणानें फर्ग्युसन कॉलेजांतील काही प्राध्यापक व प्रि. रँ. परांजपे अत्यन्त संतप्त झाले, व त्याचा परिणाम म्हणजे तात्यांना कॉलेजच्या वसतिगृहांत वास्तव्य करण्यास बंदी करून त्यांच्या होळी प्रकरणांत पुढाकार घेण्याच्या प्रकरणाबद्दल दंड केला. दंड त्यांच्या चाहत्या सहकारी विद्यार्थ्यांनी भरला. लोकमान्य टिळकांनी रँ. परांजप्यांच्या या कृत्याबद्दल "प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते" या शीर्षकाखाली केसरींत अग्रलेख लिहून तात्यांच्या कृत्याचा एक प्रकारें पाठपुरावा केला. पण तात्यांना वसतिगृह सोडून नारायणपेठेंतील गोखले (सुवर्णराज-गुलकंद-कर्ते) यांचे घरांत रहावयास जाणें भाग पडलें. आठवड्याच्या सभा या वेळेपासून गोखल्यांच्या वाड्यांत होऊं लागल्या. याच ठिकाणीं कै. कृष्णाजी पांडुरंग लिमये (कवि राधारमण) यांची ओळख झाली व ते अभिनव भारताचे शपथबद्ध सदस्य बनले.

गोखल्यांच्या वाड्यांत सावरकर रहावयास गेले त्याच सुमारास माझ्या बोर्डिंगचे सुपरिंटेंडेंट के. आर. कानेटकर यांचे माझ्या वडिलांना एक पत्र गेलें आणि त्याचा परिणाम म्हणून मला वसतिगृह सोडावें लागलें. मीहि गोखल्यांच्या वाड्यांतच राहावयास गेलों. या वेळीं तात्यांची बी. ए. ची परीक्षा अगदी नजीक आली होती. त्यांनी जोरानें अभ्यास करण्याचा निश्चय केला होता. पण त्याच कालांत भाला वृत्तपत्रांत "नरकाचा दरबार" हा लेख प्रसिद्ध झाला. त्यावर सरकारनें खटला भरला. दाजी नागेश आपटे यांनी हा लेख प्रथम फर्ग्युसन कॉलेजच्या हस्तलिखित मासिकांत प्रसिद्ध केला होता. खटला भरला गेल्याचा वृत्तान्त कळतांच तात्यांनी पुस्तकें बाजूला सारली व कॉलेजांतील मूळ लेख नाहीसा करण्याच्या

कामाला ते लागले. खेड्यात गेलेल्या आपटयांना सावधगिरीची सूचना देण्याचीहि त्यांनी तत्काल व्यवस्था केली.

## ५. मुंबईंत अभ्यास

पुण्याहून तात्या मुंबईस बी.ए.च्या परीक्षेस जाण्यास निघाले तेव्हा त्यांच्या अभ्यासाची सिद्धता झालेली होती. पण हिंदुस्थानचा इतिहास मात्र नजरेखालून घालावयाचा राहिला होता. मुंबईस जाण्याचे आदले दिवशी त्यांनी मला "तुला शाळेंत कोणता इतिहास लावला आहे ? " म्हणून विचारलें. मी म्हणालों "सिन्क्लेअरचा इतिहास लावला आहे." असें सांगतांच "हें बघ, मी मुंबईला जातो आहे, इतिहासाच्या परीक्षेच्या आदल्या दिवशी मला पोचेल अशा बेताने तुझें इतिहासाचें पुस्तक मला डाकेने पाठव म्हणजे मला तें चाळून पाहतां येईल" असें ते मला म्हणाले. त्याप्रमाणे मी केलें. परीक्षेंत उत्तीर्ण होण्यासाठीं हिंदुस्थानचा इतिहास एकदा चाळला म्हणजे पुरे एवढा त्यांना आत्मविश्वास होता.

१९०६ च्या प्रारंभाला तात्या एलएल. बी. च्या द्वितीय वर्षाच्या परीक्षेच्या अभ्यासासाठी मुंबईस गिरगावांतील पोर्तुगीज चर्चच्या मागील बाजूला बनाम हॉल गल्लीच्या नाक्यावर त्या वेळीं असलेल्या मुलनिवासमध्ये राहिलेले होते. तेथील त्यांच्या वास्तव्यांत कै. बा. ग. खेर, डॉ. गुणे वगैरे मंडळींना त्यांनी अभिनव भारताचे शपथबद्ध सभासद केलें. त्या ठिकाणीं होणाऱ्या आठवड्याच्या सभांना ही मंडळी व हरिभाऊ चत्ते, वि. म. भट ही मंडळी प्रमुखाने उपस्थित असत.

## ६. मित्राला स्वत:च्या घरीं ठेविलें

१९०६ चे मे महिन्यात मी घरी गेलों असतां लिहिलेल्या पोवाड्याचा व परदेशी कापडाच्या होळीच्या कार्यक्रमात भाग घेतल्याचा परिणाम माझ्या वडिलांच्या नोकरीवर होईल म्हणून माझे वडील अत्यन्त संतापले होते. मी घरी येतांच "तूं माझ्या घरांतून चालता हो" असें त्यांनी मला सांगितलें. उद्विग्न मन:स्थितीत मी चिंचवडीहून कल्याणच्या स्टेशनवर विनातिकिट आलों व एका बाकावर बसलों. योगायोगाने तात्या त्याच वेळी पुण्याहून



नाशकास जाण्यासाठी कल्याणवर उतरले होते. मला "काय रे तू येथे कुठे ? " म्हणून त्यांनी प्रश्न केला. तात्यांना पाहून व त्यांचा तो प्रश्न ऐकताच मला रडू कोसळलें. त्यांनी मजजवळ बसून माझें सांत्वन केलें व हळूहळू सर्व हकीगत विचारून घेतली. ते मला म्हणाले, एवढा घाबरतोस का ? नाशकास येतोस माझ्याबरोबर ? तुझी सर्व व्यवस्था होईल असें सांगून माझ्या होकाराची वाटहि न पाहतां माझें तिकिट काढून ते मला नाशकास घेऊन गेले.

मी नाशकास गेलों त्या वेळीं सावरकर तिळभांडेश्वर गल्लींतील वासाराचे घरात माडीवर राहत असत. त्या जागेत एक पोटमाळ्यासारखी जागा होती. तेथे ते पुष्कळ वेळा बसत असत. ते तेथे असले म्हणजे वर्तक, केतकर, जोशी, मी इत्यादि मुलांचा घोळका त्यांच्या भोवती बहुधा असे. तात्यांच्या पत्नी ते एकटे आहेत असें पाहून त्यांना दुधाचा पेला त्यांच्यासाठी आणून देत. पण तात्या कसले वस्ताद ! ते सर्व मुलांना हाका मारीत, व प्रत्येकाचे हातावर २/२ चमचे दूध वाढून उरलेलें थोडेंसे दूध आपण पीत. त्यांच्या या कृतीचा तात्यांच्या पत्नीला पुष्कळ वेळा राग येई. पण तात्यांना मात्र आम्हा मुलांना दिल्यावांचून दूध पेणें जमत नसे.

नाशकास असतांना मी तात्यांचे कनिष्ठ बंधु कै. डॉ. सावरकर यांचे बरोबर तालमींत जात असे. तालीम करून परत येतांना बाळ (डॉ. सावरकर) खुराक म्हणून जिलबी खाण्यास हलवायाच्या दुकानांत जात असे. मी मात्र त्या वेळीं त्याला चुकवून घरीं येत असे. तात्यांच्या ही गोष्ट लक्षांत येतांच तात्यांनी बाळला मला जिलबी खाण्यास बरोबर नेण्यास बजाविलें. त्यानंतर त्याने मला तालमींतून निघाल्यावर जिलबी खाल्ल्याविना घरीं जाऊ दिलें नाही.

## ७. अज्ञातवास काढावा लागेल, लक्षांत ठेवा.

१९०६ सालीं लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने महाराष्ट्रांत सर्वत्र शिवजयन्त्युत्सव होऊं लागले होते. या वर्षी तात्यांनी नाशिक जिल्ह्यातील

लहान लहान खेड्यापाड्यांपर्यंत शिवजन्मोत्सवाचें लोण नेऊन पोचविण्याचें ठरविलें. प्रत्येक ठिकाणासाठीं अध्यक्ष, व्याख्याता व उपव्याख्याता नाशिकहून पुरविण्याचें मान्य केलें. त्यासाठीं त्यांनी आम्हा मुलांना तास सव्वा-तास मुद्देसूद उद्बोधक व स्फूर्तिप्रद व्याख्यान देतां येईल इतकें सिद्ध केलें. नाशिक जिल्हा गाजविला.

१९०६ चे मे महिन्यांत सावरकरांना शामजी कृष्ण-वर्मा यांची शिष्यवृत्ति मिळून बॅरिस्टरची परीक्षा देण्याकरितां त्यांचा विलायतेला जाण्याचा कार्यक्रम निश्चित झालेला होता. म्हणून नाशिक शहरात त्यांना पानसुपारीच्या निमित्ताने बोलावून त्यांचीं व्याख्यानें करण्याची जणु काही अहमहमिका लागलेली होती. सर्व लोकांनी तात्यांचा सन्मान केला व त्या वेळीं दिवसातून १०-१०, १५-१५ व्याख्यानेंही त्यांना द्यावीं लागली. पण त्याचा परिणाम त्यांचा आवाज बसण्यात झाला. जाण्यापूर्वी कै. आबा दरेकर (कवि गोविन्द) यांचे माडीवर सदस्यांची खाजगी सभा झाली व त्या वेळीं तात्यांनी त्यांच्यांतील दोष प्रत्येकाने दाखवावे, असें सांगून त्यासाठी सर्वांत लहान म्हणून श्रीधर वर्तक, प्रो. केळकर व सर्वांत मोठे म्हणून आबा दरेकर यांची योजना केली. या सर्वांत लहान असलेले श्री. वर्तक यांनी सूर्याकडे टक लावून पाहिल्यास डोळ्यापुढें अंधारी येते तसेंच तात्यांकडे पाहिल्यास काही तरी कमीपणा तात्यांच्यात वाटतो, पण तो कमीपणा की त्यांच्या प्रभावाने आपल्या डोळ्यापुढें उत्पन्न झालेली अंधेरी आहे हें समजू शकत नाही, असे उद्गार काढले.

१९०६ च्या जूनमध्ये तात्यांनी विलायतेला प्रयाण केलें. त्यानंतर त्यांची त्यांच्या बंधूंना येणारी पत्रें मला नियमाने वाचावयास मिळत असत. त्यातील एका पत्रांत त्यांनी अभिनव भारतातील सदस्यांना एक इशारा खालील वाक्यांनी दिला होता. "...आपण सर्वांनी एक गोष्ट नेहमी लक्षांत ठेवावी की रामजन्मापूर्वी कौसल्येला प्रसूतीच्या वेदना भोगाव्या लागल्या. सिंहासनावर आरूढ होण्यापूर्वी पांडवांना वनवासात व अज्ञातवासांत दिवस घालवावे लागले. म्हणूनच मी परत येईपर्यंत आपला अज्ञातवासाचा काळ आहे असें समजून आपलें कार्य अविरतपणें चालू ठेवावें."



## ८. खाडिलकरांना उत्तर देतां आलें नाही.

स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर इंग्लंडला जाऊन दोन जन्मठेपींची शिक्षा भोगून येरवड्याच्या तुरुंगांतून स्थानबद्धतेंत राहण्यासाठी रत्नागिरीस जाण्याकरितां जेव्हा मुंबईस गिरगावांत दीन देवळाजवळील किर्लोस्कर भुवनांत त्यांचे बंधु डॉ. नारायणराव सावरकर यांचे घरीं आले, तेव्हा त्यांची व माझी भेट झाली.

दि. ६-१-२४ ला अंदमानच्या तुरुंगांतून ते सुटले व मुंबईस आले. ७ किंवा ८ ला बहुधा सोमवार असावा. मी दादरहून सहकुटुंब त्यांना भेटण्यास आलों. तेव्हा मी रत्नागिरीस जाईपर्यंत तूं येथेच राहा असें त्यांनी सांगितलें. सोमवारीं सकाळपासून तरुण मंडळी व विद्यार्थी यांची तात्यांच्या दर्शनास रीघ लागलेली होती. तात्या त्यांच्याशी सारखे बोलत होते. नऊ साडे नऊच्या सुमारास कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर तात्यांना भेटण्यास आले. ते त्यांना नमस्कार करूं लागले तोंच तात्यांनी त्यांचे हात धरून स्वतःच त्यांना नमस्कार केला. त्यांना खाली बसविलें. औपचारिक कुशल वृत्त विचारून झाल्यानंतर तात्या खाडिलकरांना म्हणाले, " सकाळपासून माझ्याकडे तरुणांची व विद्यार्थ्यांची रीघ लागलेली आहे. पण त्यांना पाहून माझ्या मनात एक प्रश्न सारखा घुमतो आहे. आपणच त्याचें उत्तर देऊं शकाल. विचारूं का ?" काकांनी 'विचारा' म्हणताच तात्या म्हणाले, आपल्या सारख्यांच्या लेखांनी आम्ही क्रांतिकार्यात सांपडून मितीआड झालों त्या वेळीं त्या वेळच्या तरुणांच्या तोंडावर जें तेज व ओज दिसत होतें तें आजच्या तरुणांच्या तोंडावर मात्र दिसत नाही, याला उत्तरदायी कोण ?" काकांनी हसून 'हल्लीची शिक्षणपद्धति' असें उत्तर दिलें. त्यावर तात्या म्हणाले, "छे छे, पटत नाही. वरवरचें कारण असेल. मला तर असें वाटतें कीं, खाडिलकरांची लेखणी हे कीचकवधासारखीं नाटकें लिहीत व तरुणांच्या मनांत क्रांतीच्या ज्वाळा उसळवीत होती तीच खाडिलकरांची लेखणी जेव्हा 'भास मला आहत्या पाहतां कोपला' असलें वाङ्मय निर्माण करूं लागली तेव्हापासूनच या तरुणांतील तेज व ओज नष्ट होऊं लागलें असावें. आपल्यासारखे पुढारीच याला उत्तरदायी आहेत." काकांनी हंसून वेळ मारून नेली; पण त्यांचा चेहरा मात्र पडल्याचें दिसून आलें.

## ९. सरकारी हेराला चकविलें.

१९२४ सालीं तात्यांना रत्नागिरीस स्थानबद्ध करण्यांत आल्यानंतर वर्ष-दीडवर्षानि त्यांना एक महिना त्यांचे बंधु डॉ. सावरकर यांनिकडे दादरला येऊन राहण्याची परवानगी मिळाली. ते रत्नागिरीहून आले, तेव्हा बोटीवरून उतरवून घेण्याकरितां मी व माझा मित्र बर्वे गेलों होतों. तात्यांबरोबर रत्नागिरीचा गुप्तचर आलेला होताच. आम्ही दादरला जाण्यास टॅक्सी केली. तेव्हा तात्या त्या गुप्तचराला म्हणाले, "अरे कशाला पैसे खर्च करतोस ? तूं ड्रायव्हरजवळ टॅक्सींतच बस म्हणजे झालें." गुप्तचराने तात्यांना प्रणाम केला. तो गाडींत बसला. तात्यांना दादरला पोहोचवून मी घरीं येण्यास निघालों तेव्हा तात्या म्हणाले, "हे बघ शंकर, मी मुंबईचे सर्व रस्ते विसरलों आहे. तूं आल्याविना मला घरांतून बाहेर पडतां येणार नाहीं हें लक्षात ठेव. सायंकाळीं ३॥ ला ये." मी होकार देऊन दादरला तुळशीदास तेजपाळ चाळींतील माझ्या बिऱ्हाडीं आलों. जेवणखाण करून मी झोपलों व रात्रभर जागरण झालें असल्यामुळे कोणीहि आलें तरी मला साडे तीन वाजेपर्यंत उठवूं नको असें पत्नीला बजावलें. पण दुपारीं दोनला तात्या आपला भाचा वसंत काळे याला घेऊन आले व त्यांनी माझ्या खोलीचा दरवाजा ठोठावला. पत्नीने दरवाजा उघडला व रात्रीं जागरण झालें आहे, त्यांना आतां उठवीत नाहीं, मग या. आतां उठविलें तर रागावतील असें तात्यांना न ओळखल्यामुळे सांगितलें. पण बघूया, असें म्हणून माझी पत्नी नको नको म्हणत असतांना ते माझ्या पलंगाजवळ आले व "कारे किती झोप घेतोस ? ऊठ" असें मला हलवून म्हणाले. मी जागा झालों व 'कोण तात्या' असें म्हणून उठून बसलों व पत्नीला चहा ठेवावयास सांगितलें. चहा घेतल्यानंतर तात्यांनी वसंतरावाला परत पाठविलें व मला ते म्हणाले, "आमचा सरकारी रखवालदार वाडीबाहेर फाटकाजवळ उभा आहे त्याला थोडी चुणूक दाखवावी असें वाटतें. फाटकाकडे न जातां बाहेर पडण्यास एखादा मार्ग आहे का ?" "चाळीचे गटारापलीकडील कुंपणावरून उडी मारून जातां येईल, जमेल का ?" असें मी म्हणालों. त्यावर तात्या म्हणाले "अरे अजून मला उडी मारतां येते. चल आटप. मला येथे कोण ओळखतो आहे ?" ठरल्याप्रमाणे



आम्ही दोघे कुंपणावरून उडी मारून समुद्रावर निघून गेलों. बराच वेळ भटकून माटुंगा स्टेशनवरून रात्रीं आठ साडेआठला दादरला जाऊन पोहोचलों. नऊ साडेनऊ वाजेपर्यंत तात्यांची वाट पाहून रखवालदार हवालदील झाला. त्यांचा पत्ता लागेना, तेव्हा तो धावत पळत दादरला आला. सावरकरांना पाहतांच त्याचा जीव भांड्यात पडला व तो दीनवाणीने म्हणाला, "साहेब कृपा करा, माझ्या गरीबाच्या पोटावर पाय आणू नका. तुमच्या हालचालींची माहिती रोज मला कमिशनर साहेबांना पाठवावी लागते. पोटासाठी आम्ही हें सारें करतों." तात्या त्यावर म्हणाले "अरे तुम्हांला फसविणें कठीण नाहीं याची तुला थोडी चुणूक दाखविली. पण तुला मी सोपा मार्ग दाखवितों. तू दादरला राहतोस. मोघेहि दादरलाच राहतात. ते बरोबर असल्याविना मी घरातून बाहेर पडत नाहीं. तू रोज सकाळीं त्यांचेकडे जाऊन माझ्या हालचालींची माहिती घेत जा म्हणजे तुझी धावपळहि होणार नाहीं. त्याला तें पटलें. पुढे तो त्याप्रमाणे माझ्याकडे येतहि असे.

## १०. अमेरिकन वर्तमानपत्राचा बंगाली बातमीदार

मी तात्यांना घेऊन शीवला गेलों असतांना शीवच्या स्टेशनवर एक अमेरिकन वर्तमानपत्राचा बंगाली बातमीदार उभा होता. तात्यांच्या तोंडावरील तेज व त्यांच्या बरोबर कमरेला डंगर, हातांत बंदूक अशा सैनिकी वेषांत माझा द्वितीय पुत्र विनायक याला पाहून मजजवळ येऊन त्या बातमीदाराने 'हे कोण' म्हणून विचारलें. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' असें मी सांगतांच त्याने त्यांना नमस्कार केला व विनायककडे बोट करून 'हा आपला पुत्र काय' असें विचारलें. 'तो माझ्या मित्राचा मुलगा आहे' असें तात्यांनी सांगितलें. तेव्हा "मी एका अमेरिकन वृत्तपत्राचा बातमीदार आहे, आपणा दोघांचें छायाचित्र घेण्यास आपली परवानगी मिळेल काय" असें त्याने विचारलें. तात्यांनी होकार देतांच त्याने छायाचित्र घेतलें. तेव्हा तात्या विनायककडे बोट करून त्या बातमीदाराला म्हणाले "Please note, this is the next generation of mother India" त्या बंगाली गृहस्थाने "याच शीर्षकाखाली मी हें छायाचित्र अमेरिकेला पाठवीन" असें सांगितलें व त्यांचा निरोप घेतला.

## ११. मित्रप्रेमाचा एक नमुना

मुंबईच्या मुक्कामांत एका नाटक मंडळीच्या सांगण्यावरून डॉ. वेलकर यांनी सावरकरांना नाटकाला घेऊन येण्याचें मान्य केलें. त्यांचे मित्र डॉ. सावरकर यांच्या संमतीने तीन तिकिटांची व्यवस्था केली. डॉ. सावरकरांनी तात्यांचे कानावर ही गोष्ट घातली व तात्यांनी त्या वेळीं दुसरा कोणताहि कार्यक्रम ठेवलेला नाही अशी मनजवळून निश्चिति करून घेऊन त्याला संमति दिली. ठरलेल्या दिवशीं तात्यांना घेऊन मी डॉ. सावरकरांच्या चिकित्सालयांत येऊन पोहोचलों. दत्तोपंत सावरकर (हल्लीचे अमेरिकेंतील केसरीचे बातमीदार) हे त्या ठिकाणीं होते. ते म्हणाले "तात्या, नाटकाची डॉ. वेलकर व डॉ. सावरकर इतक्यांचीच तिकिटें कंपनीकडून मागविलेलीं आहेत, आपली व्यवस्था काय"? मी म्हणालों "आपण पैसे भरून तिकिट काढून जाऊ" त्याप्रमाणे व्यवस्थाहि केली. नाटकाची वेळ होतांच डॉ. वेलकरादि सर्व मंडळी नाटकास गेली. आम्हीहि तिकिटें काढून मागील खुर्च्यांवर बसलों. तात्या, डॉ. सावरकर व वेलकर यांची व्यवस्था कंपनीने सर्वांत पुढे स्वतंत्र कोच मांडून केलेली होती. नाटकाचा एक अंक होऊन गेला. तेव्हा मध्यन्तरांत आम्ही तात्यांना कोठे जवळ दिसलों नाही. म्हणून त्यांनी मागे पाहिलें. ५।४ रांगा मागील खुर्च्यांवर आम्हांला बसलेले पाहतांच तात्या उठून त्या ठिकाणीं आले. आणि आमच्या शेजारील गृहस्थास "आपण पुढल्या रांगीं पुढील कोचावर बसा, मी यांच्या जवळच बसतों," असें म्हणून तेथे बसले. दुसरा अंक सुरु होण्याच्या सुमारास तो गृहस्थ कोचावर बसण्यास गेला. तेव्हा डॉ. वेलकर "अहो इथे नाही" असें त्यास सांगूं लागले. त्यावर "येथे बसणाऱ्या गृहस्थांनी मला येथे बसण्यास सांगून ते मागे माझ्या जागेवर बसलेले आहेत" असें सांगितलें. तेव्हा डॉ. वेलकर उठून तात्या बसले होते तेथे आले आणि म्हणाले "तात्यासाहेब हें काय?" तेव्हा तात्या म्हणाले "पुढे बसलों म्हणजेच मला लोक विनायकराव सावरकर म्हणून ओळखतील असें नाही. इथे बसलों तरी तेंच. हा शंकर येथे आहे, येथेच बसतों."

—शंकर नारायण मोघे, मुंबई

* * *



## १२. सावरकर शपथविधि कसा करीत

वीर सावरकर १९०४ च्या सुमारास फर्ग्युसन महाविद्यालयांत शिकत होते. त्यांच्या तेजस्वी वक्तृत्वामुळे आमच्या मूळच्या बंडखोर प्रवृत्तीला एक प्रकारें आव्हानच मिळालें. माझे मित्र कळवे, दत्तोपंत चिपळूणकर, बाळासाहेब परांजपे यांच्यासह आम्ही सावरकरांची प्रत्यक्ष भेट घेण्यास निघालों. त्या भेटीचा तो दिवसहि मला आठवतो. सोमवार भाद्रपद शुद्ध द्वादशी अगर त्रयोदशी. आम्ही मित्रवर्य त्यांना नमस्कार करून बसलों. सावरकर तन्मयतेने लेखन करीत होते. नाशिक येथे झालेल्या काळकर्ते परांजपे यांच्या 'धारातीर्थ' या व्याख्यानाचा सारांश ते लिहीत होते. तो वृत्तान्त लिहून त्यांना लगोलग केसरीत पाठवावयाचा होता. लेखन संपतांच सुहास्य वदनानें आमच्याकडे पाहात त्यांनी कुशल विचारलें. आमच्या येण्याचें उद्दिष्ट त्यांनी गंभीरपणें ऐकलें. ते म्हणाले "सर्व परिस्थितीचा आपण विचार केलेला आहे ना? भावनेच्या आवेशांत धैर्याचा विचारहि पाहिजे." असें म्हणून त्यांनी चिपळूणकर या त्यांच्या मित्राला आम्हांला सभासद करून घेण्यास सांगितलें.

दुसऱ्या दिवशीं श्री. तांबे यांच्या वाड्यांत प्रतिज्ञेचा कार्यक्रम झाला. हा शपथविधीचा कार्यक्रम अतिशय चित्ताकर्षक असे. छत्रपति शिवाजीमहाराज, भगवान् श्रीकृष्ण यांच्या तसबिरी समोर मांडलेल्या असत. त्यासमोर आम्ही एकेक तरुण पुढे येऊन 'देशाच्या स्वातंत्र्याकरिता सर्वस्वाचें बलिदान करू' असें म्हणतच हाताच्या बोटाचें रक्त काढून प्रतिज्ञा करीत होतों. या दीक्षा समारंभाच्या वेळीं वीर सावरकरांच्या चेहऱ्यावर दिसणारे भाव हे दूर भवितव्याच्या विचारांत दिसत. प्रतिज्ञेनंतर सावरकर कांही गंभीर अशी सूचना देत. प्रतिज्ञित सभासदांच्या कर्तृत्वाची फुकट लक्षांत घेऊन कामाची ते आखणी करीत. प्रतिज्ञा घेतली की तो क्रांतिवीर असें त्यानें प्रमाण नव्हतें.

## १३. सावरकरांच्या कवितांचें हस्तलिखित

१९०५ च्या अगोदर वीर सावरकरांनी कांही कविता केल्या होत्या. त्या कवितांचें हस्तलिखित माझ्याकडे होतें. पुढे अनेक प्रसंगांत पोलिसांच्या नजरेत मी त्या कवितांचें बाड जीवापलीकडे जतन केलें. १९३७ मध्ये वीर

सावरकर मुक्त झाल्यावर तें कवितांचें हस्तलिखित माझे मुलाकरवी त्यांच्या स्वाधीन केलें. त्या वेळीं त्यांना अतिशय आनंद झाला.

—बा. स. बुधकर, मनूर

* * *

## १४. क्रांतिकारकांचा आत्मविश्वास

इंग्रजांना हाकून देण्याची वीर सावरकरांच्या नेतृत्वाखाली जी क्रांतिकारक चळवळ झाली तींमध्ये मी पकडला गेलों. आम्हीं एकूण ३८ आरोपी होतों. सर्वजण तरुणेबांड होतों. त्यांपैकी ११ दोषमुक्त म्हणून सुटले. बाकी २७ जणांना सक्तर अशा शिक्षा झाल्या. हा निकाल न्यायमूर्ति चन्दावरकर होते. माझें निकालपत्र सुरू झालें. वाचनाच्या प्रारंभी माझ्याविरुद्ध सबळ पुरावा दिसत नाही असें दिसू लागलें. त्या वेळीं माझ्या मागे बसलेले वीर सावरकर मला मागच्या बाजूने बोटाने टोंचून म्हणाले आतां तुम्ही बहुतेक सुटलात तर पुन्हा सापडतां कामा नये." मी म्हणालों. " मला दोन तास मिळाले तर मी यांना पुन्हा सापडत नाही. "

के. जी. खरे, वकील, पुणें.

* * *

## १५. मला हद्दपार केलें.

सावरकर— ज्यांच्याकडे आपण माझें पुस्तक इटालीमध्ये पाठविलें त्यासंबंधीची माहिती आठवत असेल ती सांगावी.

सातवळेकर—मी आपलें पुस्तक श्री. देऊलकरांनी लिहिलेल्या पत्त्यावर



पाठविलें. श्री. देऊलकर वारल्यास सात वर्षें झालीं. त्यामुळें त्यासंबंधानें अधिक विस्तर माहिती मिळविणें शक्य नाही.

सावरकर—कोणत्या पत्त्यावर तें पुस्तक पाठविलें तें तरी सांगतां येईल काय?

सातवळेकर— तो काल १९०५ ते १९०७ च्या दरम्यानचा होता. मला वाटतें या कालांतच आपलें वास्तव्य विलायतेंत होतें. त्या वेळची सर्व परिस्थिति लक्षांत घेतां कागदपत्र व पत्ते जपून ठेवणें मला शक्य नव्हतें आणि तशा सूचनाहि होत्या. ज्या पत्त्यावर तें पुस्तक पाठवावें असें लिहिलेलें होतें, त्या पत्त्यावर मी पाठवून दिलें.

सावरकर— कागदपत्र व पत्ते जपून न ठेवण्याचें कारण काय ? आपण कोणत्या चळवळींत सामील झाला होतां ?

सातवळेकर— मी तसा कोणत्याच चळवळींत प्रत्यक्ष नव्हतों. पण पत्ते व पत्रें सभाळून ठेवणें मला शक्य नव्हतें. कारण कांहीं सामान, पुस्तकें, पत्रकें अशी माझ्यामार्फत येत. चित्रांच्या फ्रेम्समधून पिस्तुलें व त्यांचे सामान येई. त्यामुळे संशयितांमध्यें मी होतों, अथर्ववेदाच्या, पृथ्वीसूक्ताचा अर्थ १९०६मध्ये मी छापला तीं पुस्तकें सरकारनें जप्त करून नष्ट केलीं. माझ्यावरच्या संशयानें सरकार इतकें संशयग्रस्त झालें की, पुस्तकांचीं हिंदी भाषांतरें अलाहाबादेस छापलीं तीं सर्व पुस्तकें सरकारनें जप्त केलीं. १९०७ मध्ये 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख 'विश्ववृत्तांत' छापण्याबद्दल प्रा. विजापूरकर व श्री. कोल्ही यांना ३॥ वर्षांची शिक्षा झाली. मला हरिद्वारच्या गुरुकुलांत पकडलें, बिजनोरच्या तुरुंगांत पायांत बेडया घालून मला महिनाभर ठेविलें. तेथून कोल्हापुरास १॥ वर्ष संशयित म्हणून ठेवलें. सरकारचा माझ्यावर पुढे एवढा रोष झाला की, हैद्राबादेंत व पंजाबांत मी वेदावर व्याख्यानें दिलीं म्हणून १९०८ मध्ये मला हद्दपार केलें.

सावरकर— आपल्यावरचा सरकारचा संशय बरोबर होता तर !

सातवळेकर— आपणांसारखी चळवळ व आपल्यासारखे विचार पसरविणें मला शक्य नव्हतें. पण आपल्या अनुयायांपैकी लहान दर्जाचा अनुयायी समजून जें काय मी केलें त्यामुळेच मी इंग्रजांच्या अप्रीतींत होतों.

सावरकर—पुस्तक पाठविलें तेव्हा तुम्ही कोठें होता ?

सातवळेकर – मी दक्षिण हैद्राबादमध्ये होतों. तेथूनच तें पुस्तक इटालीस पाठविलें.

सावरकर – तुम्ही पंजाबमधील कांही माहिती सांगू शकाल काय ?

सातवळेकर – मी १९०८ ते १९१८ पर्यंत लाहोरमध्ये चित्रकार म्हणून राहिलों. त्या वेळी लाहोरमध्ये लाला लजपतराय वगैरे लोक चळवळ करीत असत. अमृतसरचें हत्याकांड झालें तेव्हा मी लाहोरलाच होतों. कांही क्रांतिकारी लोकांशी माझा संबंध आला होता. पण तो अगदी वरवरचा होता. आपल्याप्रमाणे अंतःप्रवेश त्यात नव्हता.

सावरकर— त्या वेळच्या जीवनांतील कांही विशेष प्रसंग ?

सातवळेकर – त्या वेळचे कॉलेजांतील कांही विद्यार्थी गुप्तपोलिसांचें काम करीत असत.

## १६. तुमची भाषा शुद्ध नाही.

सावरकर – भाषा शुद्धीबद्दल तुमचें काय म्हणणें आहे ?

सातवळेकर – भाषाशुद्धीबद्दल आपले विचार परिपूर्णतेनें मला मान्य आहेत.

सावरकर – पण तुमची भाषा तशी शुद्ध असत नाही हें कसें ?

सातवळेकर – हें आपलें म्हणणें अगदी खरें आहे. तो माझा दोष आहे. हे मला मान्य आहे.

या चर्चेनंतर सावरकरांनी मला त्यांचें भाषाशुद्धीचें पुस्तक दिलें. त्यांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांनी मला पेलाभर दूध पिण्यास दिलें. इतर गप्पा करून मी त्यांचा निरोप घेतला.

—श्रीपाद दामोदर सातवळेकर, पारडी.

✦ ✦ ✦



## १७. तरुणांची संघटना

वर्ष नक्की आठवत नाही. १९०५ किंवा १९०६ चा डिसेंबर महिना असावा. त्या सुमारास मी नुकताच मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबईहून पुण्यास निघालों. याच प्रवासांत माझी सावरकरांशी पहिली भेट झाली. तेहि पुण्याला निघाले होते. माझें तरुण वय, नुकताच मॅट्रिक पास झालों ही माहिती प्राथमिक ओळखीत करून ते 'माझ्याशी मॅट्रिक नंतर काय करणार' या अनुषंगानें चर्चा करूं लागले. चर्चेपेक्षा मला ते मार्गदर्शन करूं लागले. कारण तेच माझ्याशी बोलत होते. मी अगदी गप्प होतों. सावरकर जो विषय मला सांगत होते त्याची मला पुसट ओळखहि नव्हती. मॅट्रिक नंतर काय करणार हें माझें निश्चित ठरलें नव्हतें. सावरकर म्हणाले, "पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये आपण प्रवेश केल्यावर शिवरामपंत परांजपे यांचा मुलगा कृष्णा हा तुम्हांला मार्गदर्शन करील. फर्ग्युसनमध्ये गेलात तर चिपळूणकर तुम्हांला मदत करतील," पुणे स्टेशनवर आम्ही परस्परांनी निरोप घेतला. मी घरीं गेलों. विशेष सांगण्याचें आश्चर्य असें कीं, सावरकर पुन्हा दुसऱ्या दिवशीं घर हुडकीत आले. त्यांच्या बरोबर आणखी दोघे तरुण होते. त्यांनी त्यांची ओळख करून दिली. देशांत त्यांना जी तरुणांची संघटना करावयाची होती त्यांतलाच त्यांचा हा प्रयत्न होता.

—धों. कृ. साठे, पुणें.

✦ ✦ ✦

## १८. अपरात्रीं ओंकारेश्वरदर्शन

स्वातंत्र्यवीर सावरकरांशी माझा संबंध १९०५ मध्ये फर्ग्युसन कॉलेजांत आला. ते कॉलेजांत 'पुनर्जन्म' नांवाचें हस्तलिखित काढीत. तें साप्ताहिक होतें. त्यात क्रांतिकारक विचारांचे लेख असत. 'राष्ट्रीय सप्तपदी' हा लेख मी व माझे कांही मित्र यांना वाचलेला आठवतो. दर रविवारी कॉलेजच्या

मागे चतुःशृंगीच्या मैदानात पहाटेच्या सुमारास आम्ही जमत असूं. तेथें वीर सावरकर विविध विषयांवर बौद्धिक घेत. डिग्बीचें अर्थशास्त्र, दादाभाईंचें अर्थशास्त्र, जस्टिस् रानड्यांचें अर्थशास्त्र यावर सावरकर बोलत. तसेंच पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या स्वातंत्र्यासाठी कसकसे प्रयत्न केले, स शस्त्र क्रांतीसाठी त्यांना काय करावें लागलें, किती लोकांनी त्यासाठी आत्माहुति दिली, केवढा त्याग आणि छळ सोसला, यावरहि चर्चा चाले. जोराने धावणें, तालीम करणें, मन खंबीर बनविणें, पोहणें, अगदी अपरात्रीं, मध्यरात्रीं ओंकारेश्वरावर प्रेतें जळत असतां एकट्यानें जाऊन येणें, अवडे म्हणून धीटाईचे गुण असतात त्यांचा परिचय करून घेतला जात असे.

वीर सावरकरांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये असतांना परदेशी कपड्यांची होळी केली म्हणून व त्यांच्या इतर राजकीय हालचाली पाहून त्या वेळचे प्रिन्सिपॉल रँग्लर र. पु. परांजपे यांनी त्यांना १० रु. दंड करून बोर्डिंगमधून काढून टाकलें. मी व माझे मित्र कळंबे सावरकरांना भेटावयास गेलों. सावरकर म्हणाले, "अहो आता हें असेंच व्हावयाचें; न होईल तरच आश्चर्य !"

—वि. रा. टकले, डहाणू.

✦ ✦ ✦

## २९. त्यांच्या बलिदानापुढे माझी काय कथा !

नाशिकच्या जॅक्सन कलेक्टरच्या वधाच्या खटल्यानंतर त्याला जोडूनच पुरवणी खटला झाला. त्यामध्ये मी गोवला गेलों आणि मला तीन वर्षांची शिक्षा झाली. ही शिक्षा मी भायखळा कारावासगृहांत भोगीत होतों. त्याच सुमारास सावरकरांना ५० वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्यांना अंदमानला पाठविण्यापूर्वी भायखळा कारावासगृहांत स्वतंत्र खोलीत ठेविलें होतें. बॉम्ब उडविणाऱ्यांना पुढारी पकडून तेथें आणला आहे, ही बातमी



मला रखवालीचा वॉर्डर तुकाराम सोनार याने सांगितली. ही बातमी समजताच सावरकरांना कसें भेटतां येईल आणि त्या करिता धडपड व युक्ति काय करावी हा माझा प्रयत्न सुरू झाला. तुकाराम वॉर्डरशी माझा स्नेह चांगला होता. सावरकरांच्या भेटीकरितां माझा जीव किती व्याकूळ झाला आहे हें सांगून मी त्या वार्डरला इतकेंहि म्हणालों की सावरकर अंदमानला आता थोड्याच दिवसांत जातील. तिकडे गेलेलें माणूस परत जिवंत येत नाही. या थोर पुरुषाची भेट घडवून आणण्याकरितां तूं तुझी नोकरी धोक्यांत घालूनहि हें कृत्य करशील का? तुझे हे उपकार मी कधीच विसरणार नाही." तुकाराम वार्डर तयार झाला. त्यानें प्रयत्न करून सावरकरांना भेटीची पूर्वसूचना दिली. ठरल्या दिवशीं मी सावरकरांच्या खोलीला लागून असलेल्या भिंतीवर चढलों. खाली डोकावून पाहिलें तो सावरकर माझीच वाट पहात असलेले दिसले. त्यांच्याहि अंगावर सक्तमजुरीचे कारावासगृहाचे जाडेभरडे कपडे व हातापायांत दंडाबेडी दिसली. माझी चाहूल लागताच त्यांनी शृंखला हातांनी वर उचलल्या आणि भिंतीच्या अगदी लागत येऊन उभे राहिले. त्यांची निर्भय व प्रसन्न वृत्ति पाहून मी थक्कच झालों. त्यांच्याशीं काय बोलावें हें क्षणभर मला सुचेना. तेच माझ्याशीं बोलू लागले. सरकारने त्यांना दिलेल्या अमानुष शिक्षेचा मी धिक्कार केला. ते म्हणाले, "चाफेकर, मिश्रा, कान्हेरे अशा थोर देशभक्तांनी संग्रामांत आपलें बलिदान केलें आहे. माझी ती काय कथा, असें सांगून सावरकरांनी एका इंग्रजी कवितेचा सारांश सांगितला.

" Those corpses of young men,
Those martyrs that hang from gibbets,
Those hearts pierced by the gray lead,
Cold and motionless as they seem line
Elsewhere with unslaughtered vitality "

बोलण्यांत १० मिनिटें झालीं. भेट लांबून उघडकीला येईल म्हणून तुकाराम वार्डरने मला एक खडा मारून भेट संपविण्याची सूचना केली. मी चटदिशी सावरकरांचा निरोप घेऊन भिंतीवरून खाली उडी मारली.

—ज. ना. बसे, इंदूर.

✦ ✦ ✦

## २०. सावरकर यांचा पोशाख

सावरकर फर्ग्युसन महाविद्यालयांत १९०२ च्या सुरवातीस आले. ते विद्यालयाच्या वसतिगृहांत राहूं लागले. त्या वसतिगृहांत विद्यार्थ्यांची दोन मंडळें (क्लब) होतीं. सावरकर असलेल्या विद्यार्थीमंडळांत सावरकरांनी कांही लिहून ठेविलेल्या लेखनाबद्दल बराच वाद माजला. तो वाद विकोपास जाण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. महाविद्यालयाचे नवे प्रिन्सिपाल रँग्लर र. पु. परांजपे यांनी माधवराव भिडे (नंतरचे पंजाब हायकोर्टाचे न्यायाधीश) व श्री. श्रीधरपंत बापट यांच्याकडे त्या वादासंबंधी चौकशीचें काम दिलें. चौकशी मंडळाने सावरकरांविरुद्ध निर्णय दिला. त्याचे पर्यवसान असें झालें की सावरकर कानडी विद्यार्थ्यांनी स्थापिलेल्या विद्यार्थी मंडळाचे सदस्य झाले.

फर्ग्युसन महाविद्यालयांत सावरकरांचा पोशाख इटालियन देशभक्त मॅझिनीच्या पद्धतीप्रमाणे असे. महाविद्यालयांत आल्यापासून त्यांनी आपल्या मित्रांचा एक संघच बनविला होता. या संघातील मित्रांचा वादविवाद जोरदार व उत्साहपूर्ण चाले. १९०३ अगर १९०४ मध्ये सावरकरांना वसतिगृहांत उत्तरेकडेच्या खालच्या मजल्यावर खोली मिळाली होती. त्या वेळी मला विद्यालयाची दक्षिणा फेलोशिप मिळाली होती. माझा एम.ए. चा अभ्यास चालू होता. सावरकरांची खोली माझ्या खोलीच्या नेमकी खाली होती. कांही वेळां रात्रीच्या शांत वेळी सावरकरांच्या मित्रांचा वादविवाद अतिशय जोराने चाले. मध्ये केवळ लाकडाची तक्तपोशी असल्याने माझ्या वरच्या अभ्यासाच्या खोलींत व्यत्यय येत असे. कांही वेळां सावरकरांना व त्यांच्या मित्रांना हळू बोला अशी सूचना मला करावी लागे.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या पहिल्या वसतिगृहाची उत्तरेची बाजू पुढे पटांगण असल्याने त्या वेळी मोकळी होती. पूर्व-पश्चिमेच्या खोल्यांना होणारा उन्हाचा त्रासहि तिकडे नसल्याने त्या खोल्यांत वसती करण्यास मिळावी यासाठी विद्यार्थ्यांत चढाओढ असे. तेथें राहणारे विद्यार्थी स्कॉलर अगर इतर गुणांनी प्रसिद्ध असत. सावरकर त्यांना 'नार्थ ब्लॉक ॲरिस्टोक्रॅट्स' असें संबोधीत असत.

—रामचंद्र अनंत कानिटकर, वकील, बुलढाणा.

* * *



## २१. दुर्दम्य आशावाद

सन १९०० मध्ये वीर सावरकर नाशिक येथील शिवाजी स्कूलमध्ये शिकत होते. नाशिक येथे वक्तृत्वाच्या चढाओढी होत असत. ते या चढाओढीत भाग घेण्याची तयारी करूं लागले. सावरकरांच्या अंगीं वक्तृत्व हा गुण जन्मतःच होता. परंतु त्या गुणाचा विकास त्यांनी फार परिश्रमपूर्वक केला आहे. नियोजित विषयावर काय बोलावयाचें त्याबद्दलचा लेख त्यांनी विचारपूर्वक लिहून काढला. तें व्याख्यान कसें वठेल व परिणामकारक ठरेल हे अजमविण्याकरिता त्या व्याख्यानाची रंगीत तालीम ते माझ्यासारख्या छोट्या प्रेक्षकांसमोर मोठ्या उत्साहाने करीत. वक्तृत्वाच्या चढाओढीत भाग घेण्याच्या अर्जास उशीर झाल्यामुळे सावरकरांचा क्रमांक शेवटी लागला. त्यांना सर्वांच्या शेवटी भाषण करावें लागलें. परंतु सर्व वक्त्यांमध्ये वक्ता या दृष्टीने त्यांचा क्रमांक पहिला आला.

सन १९०४ च्या सुमारास नाशिक येथील अभिनव भारत क्रांतिकारक संस्थेंत अनेक तरुण दाखल झाले होते. एकदा धुळ्याचे टिळक पक्षीय देशभक्त शंकर श्रीकृष्ण देव यांना व्याख्यानासाठी बोलाविलें होतें. प्रकट व्याख्यान झाल्यावर रात्रीं त्यांना अभिनव भारताच्या क्रांतिकारक तरुणांच्या गुप्त बैठकीला नेण्यांत आलें. त्या गुप्त बैठकीत शंकरराव देवांनी आपल्या मनांतील प्रामाणिक विचार खुल्या दिलाने मांडले. ते बैठकींत म्हणाले, "इंग्रज सरकारची शक्ति मोठी आहे. त्यांचा शस्त्रसंभार मोठा असून आपलें क्रांतिकार्य त्यांच्यापुढे काय टिकाव धरणार? सशस्त्र क्रांति घडवून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेऊं असे कितीहि प्रयत्न केले तरी ते फलद्रूप होतील असें वाटत नाही. भविष्यकाळांत मला आशेचा एक किरणहि दृष्टीस पडत नाही." असें त्यांनी निराशेचे उद्गार काढले. तेथे जमलेल्या तरुणांच्या मनांवर वैफल्याची भावना स्पष्ट दिसूं लागली. या बैठकीस सावरकर प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांना बोलण्याची विनंती करण्यांत आली. सावरकर अगदी शांतपणें बोलूं लागले. त्यांनी प्रथम देवांनी देशभक्तीने प्रेरित व तळमळीने केलेल्या भाषणाबद्दल आभार मानले. देवांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांचा आणि सिद्धान्तांचा त्यांनी समाचार

घेतला. मॅझिनीच्या वेळीं 'यंग इटली' या संस्थेकडून जर इटलीचें स्वातंत्र्य मिळूं शकलें तर योग्य प्रयत्नांतीं 'अभिनव भारत' या संस्थेच्या प्रयत्नानें हिंदुस्थानला स्वातंत्र्य कां मिळूं शकणार नाहीं? असा दुर्दम्य आशावाद त्यांनी मांडला. सावरकरांच्या बौद्धिकाचा परिणाम असा झाला कीं आरबींचें वातावरण पुन्हा बदलून गेलें. सावरकर शेवटी म्हणाले " देशानी आपली परीक्षा पाहण्यासाठीच केवळ वैफल्याची भूमिका पुढें मांडली. परंतु ते मनांतून निराश नाहीत हें पक्कें समजावें."

—श्री. र. वसंत, नाशिक.

✦ ✦ ✦

## २२. अंदमानला जाण्याची तयारी

स्वातंत्र्यवीर सावरकर ५० वर्षं काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी अंदमानाला निघाले. त्यापूर्वी ते ठाणें कारावासगृहांत होते. त्या सुमारास म्हणजे १९११ मध्ये मी त्या कारावासगृहांत सरकारचा कारकून म्हणून होतो. अंदमानला ठाणें बंदिगृहांतून शेकडो बंदिवान थोड्याच दिवसांत पाठवायचे होते. अंदमानाला जाण्यापूर्वी सावरकरांना मुंबई बंदीगृहांतून ठाणें बंदीगृहांत ट्रान्सपोर्टेशन यार्डांत एका कोठडींत अगदी कडेकोट बंदोबस्तांत ठेविले होते. बंदीगृहाचा कारकून म्हणून सांवनिवाणी इत्यादि टिपण—टिपणी करण्या-करितां म्हणून मला त्यांच्याकडे जातां येत असे.

काळेपाण्यावर जाणाऱ्या कैद्यांचे खाजगी कपडे बरोबर पाठवीत नसत. तेथेच त्यांचा लिलाव करून पैसे बरोबर पाठविले जात. वीर सावरकरांचे कपडे भारी किमतीचे होते. त्यांत गरम ओव्हरकोट करड्या रंगाचा होता. कांही पुस्तकें होतीं. त्यामध्ये " राजयोग नांवाचें पुस्तक " मला पाहिल्याचें स्मरतें. त्यांच्या या सामानाचा लिलाव मामलेदार कचेरींत त्यांचें नांव लोकांना न कळवितां केला गेला. त्या सामानाचे आलेले पैसे सावरकरांचे



नांवें जमा न करतां सरकारजमा केले. कारण वारंटावर सर्व मालमत्ता जप्त करण्याचा हुकूम होता.

याच वेळीं वीर सावरकरांचे धाकटे बंधु डॉ. नारायणराव ठाण्यास सहा महिन्यांची शिक्षा भोगीत होते. त्या दोघा बंधूंची भेट होऊं दिली नाहीं. उलट नारायणरावांना धुळयाच्या तुरुंगांत नेऊन ठेवलें.

त्या वेळचा सावरकरांचा पोशाख (पिवळी टोपी-काळे पाण्याची निशाणी म्हणून या टोपीला ओळखले जाई) कांपरापर्यंत मुंडी छाट कुडता, गुडघ्या-पर्यंत पायजमा—या कापड्यांचें कापड अगदी राठ असे. दोन्ही पायांत साखळ-दंडाची बेडी होती. याच पोशाखांत त्यांना अंदमानांत जाण्यापूर्वी अगोदर दोन दिवस त्यांच्या पत्नी सौ. माईंना—थोडा वेळ भेटूं दिलें. सौ. माई लोखंडी दरवाज्याबाहेर उभ्या होत्या आणि सावरकर गजाच्या आंत उभे होते. या त्यांच्या भेटीच्या वेळीं मी दूर उभा होतों. त्यामुळे त्या दोघांचें बोलणें मला ऐकूं आलें नाहीं. 'माझी जन्मठेप' या त्यांच्या आत्मवृत्तांत त्यांनी संभाषणाचा उल्लेख केलेला आहे.

सावरकरांच्या बरोबर आणखी १०० लोक अंदमानाला जाणार होते. त्या सर्वांना ठाणें बंदीगृहांतून स्टेशनपर्यंत पायीं नेण्यांत आलें. सावरकरांना मात्र घोड्याच्या गाडींतून कडक बंदोबस्तांत नेलें. एका पोलिस अधिकाऱ्यानें आपल्या हातांत बेडीचें कडें घातलें आणि त्या कड्याला लोखंडी साखळी अडकवून दुसरी बेडी सावरकरांच्या हातीं अडकविली. स्टेशनवर गाडीचा डिब्बा रिझर्व्ह वेगळा ठेविला होता. त्यांतहि वेगळा भाग करून सावरकरांना गाडीच्या खिडक्या बंद करून ठेविलें. त्यांचा पोशाख वर वर्णन केला तसाच होता. त्यांच्या डोळ्यावर सोनेरी काडीचा चष्मा होता. त्यांचें बोलणें चालणें धैर्याचें आणि निर्भय दिसत होतें. चेहऱ्यावरचें स्मित हास्य कधींहि मावळलेलें दिसलें नाहीं. त्यांचा चष्मा कसा काढून घेतला नाहीं याचें मला आश्चर्य वाटलें. त्या वेळच्या नियमांप्रमाणें जोडा, बूट व इतर वस्तु बरोबर नेण्याची अनुज्ञा नसे.

—रा. वा. सोमण, पुणें.

✦ ✦ ✦

## २३. राहावयास घर मिळेना.

सरकारने १९२४ मध्ये रत्नागिरी जिल्हा सोडून बाहेर कोठे जाऊ नये असा निर्बंध घातला. सावरकर पुण्याहून रत्नागिरीस आले. राहण्यास भाड्याची जागा शोधू लागले. भाड्याने घर मिळणार नाही अशी पराची टंचाई त्या वेळी नव्हती. पण वीर सावरकरांना रत्नागिरीत राहण्यास भाड्याने घर कोणी द्यायला तयार होईना. इंग्रज सरकारचे भय सर्वांना होते. शेवटी शिरगाव येथील कै. वि. श्री. दामले यांच्या घरीं ते जाऊन राहिले. पुढें थोडें वातावरण निवळल्यावर ते रत्नागिरीत आलें.

—म. वि. लिमये कर्वे.

✦ ✦ ✦

## २४. कट्टर सनातनी अनुयायी झाला.

स्वातंत्र्यवीर सावरकर १९२४ ते १९३७ पर्यंत रत्नागिरीत होते. या कालांत माझा त्यांच्याबरोबर परिचय झाला. त्यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे युवक नि बाल त्यांच्याकडे एकदम आकर्षित होत. वयस्क लोक मात्र थोडे सावधगिरीनेच त्यांच्या चळवळींत सामील होत. मात्र त्यांच्या विद्वत्तेची नि कार्यकर्तृत्वाची छाप त्यांच्यावरहि पडलेली असे. सावरकरांनी रत्नागिरीला येताच हिंदुसभा स्थापन करून अस्पृश्योद्धाराचें आंदोलन सुरू केलें. रत्नागिरी ही सनातनी लोकांचा बालेकिल्ला असल्याने त्यांच्याभोवती सर्व परिस्थिति प्रतिकूल होती. एकदा सावरकर हे हिंदुसंघटनेच्या आंदोलनास मदत मागण्यासाठी नि हिंदुसभेचे सभासद करून घेण्यासाठी आपल्या अनुयायांसमवेत घरोघरी फिरत होते. असाच एका कट्टर सनातन्याकडे ते गेले. त्या ठिकाणीं बरीच चर्चा नि वादावादी होईल असें मला वाटलें. त्या सनातनी माणसाने त्यांच्या हातीं दोन रुपये देत म्हटलें "तुमचें हें करणें मला बरोबर वाटत



नाही. तथापि तुम्हीच आलात म्हणून देतों." या त्यांच्या बोलण्यावर सावरकरांनी आपल्या कार्यावर लक्ष ठेवून आजेंवी नि लाडवी भाषेंत त्यांचे आभार मानले. त्याचा परिणाम असा झाला कीं, हे गृहस्थ पुढे त्यांचे कट्टर अनुयायी झाले.

## २५. क्रांतिकारक मित्र अय्यरांची भेट

रत्नागिरीस प्लेग सुरू झाल्याने सावरकर शिरगाव गांवीं आमच्या घरी राहण्यास आले. रोजच्या दिनक्रमांत ते जेवणानंतर अंगणांत शतपावली करीत. या रिकाम्या वेळांत ते आमच्या घरांतील गड्याला श्रीगणेशा शिकण्यासाठी बोलावून घेत. यासंबंधी सावरकर म्हणत की, आमच्या असंख्य देशबंधूंचें अज्ञान हें पारतंत्र्याचें प्रमुख कारण आहे. म्हणून प्रत्येकाने जितके लोक साक्षर करतां येतील तितके करावे.

शिरगांवच्या वास्तव्यांत वीर सावरकरांचे इंग्लंडमधील मित्र आणि मद्रासचे क्रांतिकारक श्री. अय्यर हे त्यांना भेटावयास शिरगांवी येले होते. अय्यर आमच्या अंगणांत येतांच सावरकरांनी त्यांना प्रेमभराने कडकडून आलिंगन दिलें.

## २६. पहिलें सार्वजनिक हळदीकुंकू

वीर सावरकरांनी पहिलें संमिश्र हळदी-कुंकू आमचे घरांत केलें. जवळच्या आसपासच्या उच्चवर्णीय स्त्रिया अस्पृश्य स्त्रियांना हळदी-कुंकू प्रत्यक्ष देण्यास धजेनात. सावरकरांनी आपल्या पत्नी सौ. माईंच्याकडून अस्पृश्य स्त्रियांना हळदी-कुंकू दिलें. नंतर मग दबकत दबकत उच्चवर्णीय स्त्रिया त्यांत सहभागी झाल्या. या घटनेने एक-दोन वर्षे विलक्षण खळबळ उडाली. इतकेंच नव्हे तर आमचें घर कित्येक दिवस अनेकांनी वर्ज्य केलें होतें.

रत्नागिरी शहरांतून सावरकरांनी अखिल हिंदु उपाहारगृह सुरू केलें. त्या ठिकाणीं चहा फराळाचे पदार्थ करण्यास महार जातीचा मुलगा ठेवला होता. त्या सुमारास कै. दादासाहेब मावळणकर रत्नागिरींत होते ते या उपाहारगृहांत अधून मधून येत होते. सावरकरांनी या उपाहारगृहांत एक (वेरे बुक) अभिप्राय नोंद पुस्तक ठेविलें होतें. माझ्या माहितीप्रमाणे या पुस्तकांत पहिला अभिप्राय दादासाहेब मावळणकरांचा असावा.

## २७. कलेक्टरला सावरकरांची पानसुपारी

त्या वेळीं रत्नागिरी जिल्ह्याचे कलेक्टर ब्राऊन नांवाचे इंग्रज गृहस्थ होते. सावरकरांच्या सामाजिक कार्याला नि विशेषत: अस्पृश्यता निवारण चळवळीला कलेक्टरसाहेबांचा मन:पूर्वक पाठिंबा होता. या ब्राऊनची रत्नागिरीहून बदली झाली. सावरकरांनी त्यांना पानसुपारी करून निरोप दिला. रत्नागिरीच्या कांही लोकांना सावरकरांचें हें कृत्य आवडलें नाहीं. "सावरकरांसारख्या देशभक्त क्रांतिकारकानें एका इंग्रज अधिकाऱ्याला पानसुपारी करावी काय" अशी टीका सुरू झाली. त्या वेळीं सावरकर म्हणाले, "माझ्या कोणत्याहि चळवळींत पानसुपारीपासून पिस्तुलापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश होतो. 'साधनानामनेकता' हें तर माझ्या सर्व चळवळींचें सूत्र आहे."

—मो. वि. दामले, चिरगांव

✦ ✦ ✦

## २८. रत्नागिरी येथील चौपाटी

स्वातंत्र्यवीर सावरकरांना अंदमानांतून आणून १९२४ मध्यें रत्नागिरीत स्थानबद्ध केलें होतें. अस्पृश्योद्धाराची चळवळ त्यांनीं चालविल्यानें सनातनी हिंदुसमाज बिथरला होता. कांही लोक असें म्हणत कीं रत्नागिरीच्या कलेक्टरानें यांना येथें आणून आम्हांला संकटांत टाकलें आहे. त्यांच्या संबंधांतील या कुतूहलाच्या विविध घटना ऐकून त्यांना पाहण्याची माझी इच्छा तीव्र झाली. सावरकर रत्नागिरीच्या समुद्रकिनारीं चौपटीवर फिरावयास जात. तेथें मी गेलों. बरोबर एक तास मी त्यांचें मोहक व तेजस्वी व्यक्तिमत्व पाहात होतों. त्यांच्याशीं आपण बोलावें कसें हें मला सुचेना. पुन्हा दुसरे दिवशीं गेलों. सावरकरांच्या भोवती कांही तरुण लोक उभे होते. सावरकर हातांतल्या काठीनें वाळूंत कांहीतरी लिहीत होते आणि लोक उत्सुकतेनें वाचीत होते.



माझे मित्र भाई कुंभवडेकर यांनी मला सावरकरांची ओळख करून दिली. सावरकरांच्या मागें रत्नागिरी गावांतील तरुण लोक तेथें जाऊं लागले. कांही वेळां तर जत्रेसारखी गर्दी त्यांच्या भोवती असे. सावरकर त्या वेळीं जें कांही बोलत तें मनावर संस्कार करणारें असे. ज्ञानांत भर पडे. त्यांनी उच्चारलेल्या शब्दांचा विसर पडत नसे. त्यांच्या बोलण्यात धीटपणा, करारीपणा व बिनचूक असा आग्रहीपणा दिसून येई.

त्यांच्या जाण्यायेण्याच्या वाटेवर एका वृद्ध आजीचें घर होतें. ती सनातनी वृत्तीची होती. सावरकरांबद्दल तिच्या मनांत गैरसमजुतीनें एक प्रकारची घृणा निर्माण झाली होती. सावरकर तिच्या दारावरून गेले कीं रस्ता व तिचें घर विटाळलें असें ती मानी. ते गेल्यानंतर ती वृद्ध बाई शेणकाला करून आपल्या दारांत व रस्त्यावर गोमुत्रासारखा शिपडी. अशा कृत्यानंतर तिला पवित्र झाल्यासारखें वाटे. हा शेणकाला शिपडतांना ती वृद्धा देवाचें नामस्मरण करी, त्याजबरोबर अपशब्दांचेंहि नामस्मरण करी. त्या म्हातारीचें हें रोजचें कृत्य पाहून आम्हांला अतिशय राग आला. आम्ही हा राग सावरकरांना बोलून दाखविला. ते त्याबद्दल कांही म्हणाले नाहींत. आम्ही सावरकरांना म्हणालों, "या बाईच्या कृत्यांचा बंदोबस्त आम्ही करतों. तुमची परवानगी पाहिजे." सावरकर हसत म्हणाले, "तिला तुम्ही विशेष कांही सांगू नका. रागावूं तर मुळीच नका." असें सांगून ते पुढें म्हणाले, "तिला म्हणावें बाई आपणांकडे रोज कोण मृत्यु पावतें? कारण आपण रोज दारापुढें संध्याकाळीं शेणकाला टाकतां म्हणून विचारलें!" आम्ही वृद्ध बाईला असें जाऊन विचारलें आणि त्या दिवसापासून रस्त्यावरून सावरकर गेल्यानंतर तिनें कधी शेणकाला टाकला नाहीं. पुढें या बाईंना सावरकरांच्या कार्याचें महत्त्व कळून ती त्यांना देवाप्रमाणें मानूं लागली होती. त्यांना ती नमस्कार करीत असे.

## २९. कलेक्टरला भेटून सोय करून दिली.

सावरकर चौपाटीवर फिरावयास जात, त्या मार्गावर रस्त्याच्या कडेला झाडीच्या पलीकडे ३०–३५ वयाची महारोगी स्त्री पडलेली होती. त्या

त्यांच्या ध्यानाच्या वेळीं आम्ही मुलें जरा गडबड गोंगाट करीत होतों. तेव्हां तात्यांना आम्ही म्हटलें, "तुमच्या ध्यानांत आज घोटाळा झाला असेल." तात्या लगेच म्हणाले, "तुम्ही मुलें म्हणजे देवाचे अंशच आहांत. यामुळे तुमच्या गडबडीने माझ्या ध्यानांत व्यत्यय कसला येणार ?"

### ३४. प्रश्न कोणी विचारावा ?

गणेशोत्सवांतील व्याख्यानांतून स्वातंत्र्याच्या प्रश्नाची चर्चा झाल्यावरून मला तात्यांना एक प्रश्न विचारण्याची प्रेरणा झाली. मी दुसऱ्या दिवशीं वेणी घालण्यास बसले असतानाच तात्यांना विचारलें, "तात्या, भारताला स्वातंत्र्य केव्हा मिळणार हो?" तात्या म्हणाले, "बंगालमधील वीणा दास-शांता घोष यांनी असा कांही प्रश्न विचारला तर त्याचें उत्तर देतां येईल. तुमच्या सारख्या केस पिंजारून स्वस्थ बसणाऱ्यांना त्याचें काय उत्तर देणार ? प्रथम वीणा दास सारख्या क्रांतिकार्यांतील भगिनींच्या जीवनाचा अभ्यास करा म्हणजे त्या प्रश्नाचें उत्तर तुम्हांला आपोआप समजेल."

### ३५. अंदमानांतील दोन वॉर्डर

मी चिपळूण येथें प्राथमिक शाळेंतील मुख्य शिक्षिका असतांना तात्या चिपळूणास आले होते. त्यांच्यावरील वॉर्डर म्हणून काम करीत असलेले खेडचे दोन कैदी शिक्षा भोगून परत आले होते. त्यांना तात्या (सावरकर) चिपळूणास आल्याचें समजलें. हें समजतांच ते वीस मैलांवरील खेड गांवाहून चालत तात्यांना भेटण्यासाठी आले होते. तात्यांना त्यांनी साष्टांग नमस्कार केला. तात्यांनीही त्यांना नमस्कार करून त्यांचें क्षेमकुशल विचारलें. तात्यांच्या अंदमानांतील सहवासामुळे त्या गुन्हेगार कैद्यांनाही उपरति होऊन त्यांच्यांत सुधारणा झाली होती. त्याबद्दल ते दोघे कैदी तात्यांना धन्यवाद देत असतां तात्या मला उद्देशून म्हणाले —"तुम्ही मंडळी आतां सुखाच्या काळांतील सोबती आहांत. परंतु ही मंडळी माझ्यावरील दुःखाच्या प्रसंगांतील सोबती नव्हे—तर आमचे अधिकारी होती." त्यांनी त्या दोघांनाही खर्चासाठी बिदागी देऊन त्यांचा निरोप घेतला.



### ३६. सावरकरांच्या प्रेरणेने स्वदेशी भांडार

तात्या स्वदेशी वस्तु वापरण्यासंबंधी आग्रह धरीत असत. त्यांच्या प्रेरणेवरूनच आम्ही रत्नागिरीच्या प्राथमिक शाळेंत 'स्वदेशी भांडार' चालविलें होतें. भांडारासाठी खात्रीच्या स्वदेशी वस्तु तात्याच खटपट करून आम्हांला मिळवून देत असत. स्वदेशी भांडाराच्या उलाढालींत एका महिन्यास तर केवळ दोन रुपये नफा मिळाला. हें आम्ही तात्यांना जरा निराशेनें सांगितल्यावर तात्या म्हणाले. "तुम्ही इतका स्वदेशीसाठी आटापिटा केला नसता तर हे दोन रुपये सुद्धा परदेशस्थानाच मिळाले असते. त्याऐवजी तेवढे दोन रुपयेच कां असेनात पण ते तुम्ही आपल्यांतच ठेवलेत हेंही कांही कमी नाही."

### ३७. हिंदुधर्म फोफावत जाईल.

अबदुल रशीद नांवाच्या मुसलमानाने स्वामी श्रद्धानंदांना सन १९२६ डिसेंबरमध्यें खून केल्यावर स्वामीजींच्या दुःखद निधनानिमित्त रत्नागिरीस फार मोठी सभा घेण्यांत आली होती. त्या वेळीं बोलतांना तात्या म्हणाले, "कुणी सांगावें ! स्वामीजींवर आला, अगदी तसाच प्रसंग माझ्यावर येणार नाही म्हणून ! तसें होणें अगदी शक्य आहे, परंतु त्याला मी मुळीच भीत नाहीं. स्वामीजींची हत्या ही खर्चाची बाजू फार मोठी असली तरी साठ सहस्र मल्काना रजपुतांना त्यांनी शुद्ध करून हिंदुधर्मांत आणलें ही जमेची बाजूही कांही अगदीच तोकडी नाहीं. हा व्यापार अगदीच तोट्याचा झाला असें म्हणण्याचें कारण नाही.

ज्या ठिकाणीं औरंगजेब बादशहाच्या लाख लाख तलवारींनी व तोफांनी हिंदुधर्म विचलित झाला नाही तेथें एका स्वामीजींच्या हत्येने हिंदुधर्म नाहींसा न होतां जास्तच फोफावत जाईल हें ध्यानांत असू द्या."

### ३८. धाक्रस कुटुंबाचा संसार

रत्नागिरी येथील ख्रिस्ती झालेल्या धाक्रस कुटुंबास तात्यांनी शुद्ध करून हिंदुधर्मांत घेतलें. शुद्ध झालेल्या लोकांना समाजांत योग्य तें स्थान प्राप्त होण्याच्या कामीं अनेक अडचणी असतात. त्या सर्व निवारण करून शुद्धीकृतांना

तात्या सर्वतोपरी आधार देत असत. धाकल हे मूळचे ब्राह्मण, ख्रिस्ती झालेले होते. पतिपत्नी व ६ मुलें एवढें त्यांचें कुटुंब होतें. युद्धोत्तर धाकल कुटुंबातील दोन मुलींचीं लग्नें तात्यांनीच स्थळें पाहून जमवून दिलीं. लग्नाचा सर्व देखील तात्यांनीच केला व लग्नेंही थाटाने केलीं. लग्न संस्काराने विधिपूर्वक पौरोहित्यासाठी पुण्याहून श्री. चित्रावशास्त्री यांना मुद्दाम बोलावलें होतें. विधीतील मंत्र तात्यांचे मुखोद्गत असत. नवीन मंत्राची सुरुवात चित्रावशास्त्रींनी उच्चारण्यापूर्वीच तात्या कांही वेळेला करीत असत. या लग्नातील वरातीच्या मिरवणुकीच्या वेळी मलाही मिरवण्याची संधि घरच्यांपैकीच एक म्हणून मिळाली होती. त्या वेळी तात्या विनोदाने म्हणाले, " तुम्हीं खुशाल मोटारीतून मिरवत आहांत पण माझी मान नेया उडते आहे बरं कां ! "

## ३९. सावरकरांच्या प्रेरणेने व्यायाम शाळा निघाली.

विद्यार्थी म्हणजे राष्ट्राची भावी पिढी. ती प्रथम शरीरप्रकृतीने धडधाकट व प्रतिकारक्षम असली पाहिजे असा तात्यांचा कटाक्ष असे. या दृष्टीनें प्रयत्न व्हावेत म्हणून त्यांनी लोकांना सारखें प्रोत्साहन देण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला होता. त्यांच्या प्रेरणेमुळेच मी रत्नागिरीस मुलींच्या शाळेत शिक्षिका असतांना स्वतंत्र वर्ग काढून मुलींना लाठी, लेझिम व जंबियाचें शिक्षण दिलें. अशाच तऱ्हेच्या उपक्रमामुळे तात्यांनी रत्नागिरीच्या नगरपालिकेकडून व्यायामशाळा सुरू केली. मला वाटतें नगरपालिकेने व्यायामशाळा चालविली असल्याचें रत्नागिरी हें एकमेव पहिलेंच उदाहरण महाराष्ट्रांत असावें. ही अवश्य पण अशक्य वाटणारी गोष्ट तात्यांच्या केवळ तीव्र तळमळीमुळेच होऊं शकली.

## ४०. युद्धावर जाणेंच बरें !

डॉ. गोपाळराव दातार १९४२ मध्ये युद्धआघाडीवर डॉक्टर म्हणून काम करण्यास निघाले. लष्करामध्ये नांवही नोंदवलें. पण मला कांही चैन पडेना. मला वाटे यांना भरपूर पैसे, मानमरातब सर्व कांही आहे. कशाला जातात हे युद्धावर. त्यातून आमच्या विवाहालाही २-३ वर्षेच झाली होती. म्हणून मी



विरोध करी. तेव्हा डॉक्टर म्हणाले, तुम्ही माननीय तात्यांना पत्र लिहा. त्यांचें उत्तर असें येईल त्याप्रमाणे करूं या. तसें उत्तर आल्यावर विरोध करूं नका. त्याप्रमाणे मी तात्यांना पत्र लिहिलें. त्याचें उत्तर डॉक्टरांना अनुकूल आलें.

त्यांत लिहिलें होतें कीं देशहिताच्या दृष्टीने जाणें आवश्यक आहे. तुम्ही विरोध करूं नये. पुढें डॉ. दातार युद्धभूमीवर जाऊन ग्रीस, इजिप्त, इटाली वगैरेकडे डॉक्टर म्हणून जाऊन आले.

## ४१. पूर्वीचे पूर्वी–आताचे आता

माझी धाकटी बहीण सौ. विनोदिनी नामजोशी एकदा तात्यांना म्हणाली " तात्या तुम्ही पूर्वी दुर्गादेवीची पूजा करीत होता, मग आता कां नाही करीत हो !

तात्या म्हणाले, "तू पूर्वी बाहुलीशीं चूल बोळक्याशी खेळत होतीस आता कां नाही खेळत ? "

—सौ. ताई दातार, कऱ्हाड

✦ ✦ ✦

## ४२. खास संरक्षक

एका लग्नसमारंभाच्या ठिकाणीं वीर सावरकरांना भोजनाचें निमंत्रण होतें. त्याप्रमाणे ते आले. भोजनास अवकाश होता. म्हणून सावरकर घरच्या खोलींत पुस्तक वाचीत बसले. थोड्या वेळाने पानें बोलावणें आलें. सावरकर पुस्तक ठेवून खोलीबाहेर येऊन म्हणाले, 'देवधर, समोरच्या ओट्यावर उन्हांत जो मनुष्य बसला आहे त्यालाहि जेवावयास बोलावून घ्या. माझें नांव सांगा म्हणजे तो येईल.' त्याप्रमाणे तो आला. हा गृहस्थ कोण याचें सर्वांना कुतूहल वाटलें. सावरकरांनी त्याला एवढ्या आस्थेने आपल्या पंक्तीस कां घेतलें ? शास्त्रीबुवा म्हणाले, "सावरकर, हा कोण जावई ?" सावरकर म्हणाले, "सरकारने हा माझ्या खास संरक्षणासाठी ठेवलेला आहे."

### ४३. सनातन्यांचा पराजय

स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेंत असतांना अस्पृश्योद्धार इत्यादि सामाजिक चळवळी करीत होते. मुरुड या गांवीं वीर सावरकर यांत प्रचाराकरितां आले. तेथील सनातन्यांनी त्यांना प्रकट सभेंत विरोध करण्याचें ठरविलें. सावरकरांच्या सुधारक मतांची आपण सहज रेवडी करूं असें त्यांना वाटत होतें. ही मंडळी पोथ्यापुराणांचे शास्त्रार्थ बरोबर घेऊन आली. सावरकरांचें व्याख्यान सुरू झाल्यावर ही मंडळी प्रथम त्यांच्याकडे कुचेष्टेने आणि उपहासाने पाहूं लागली. थोड्या वेळांत हीच मंडळी त्यांच्या व्याख्यानास माना डोलवूं लागली. आपण त्यांना विरोध करावयास आलों आहोंत हें ते लोक विसरून गेले. सावरकरांनी आपलें व्याख्यान संपविल्यावर विचारलें की, "कोणाला कांही शंका विचारावयाच्या आहेत का ?" एकही पुढें आला नाही. या सनातन्यांना कांही लोक म्हणाले, आपण वाद करण्यासाठी आला होता ना ? सनातनी खजील झाले.

—शं. मो. देवधर, बडोदें.

* * *

### ४४. उत्तरें ऐकून आश्चर्यचकित झाले.

१९२४ ते १९३७ च्या दरम्यान वीर सावरकर रत्नागिरींत स्थानबद्ध असतांना ते मुंबईस आले होते. त्यांना दादरच्या एका व्यायामशाळेने पानसुपारीचें निमंत्रण दिलें. त्यांच्यासमोर संस्थेंतील विद्यार्थ्यांचे व्यायामाचे प्रकार करून दाखविण्यांत आले. सावरकरांना व्यायामाचे प्रकार मनापासून आवडलेले दिसले. कार्यक्रम झाल्यावर ते चालकांना म्हणाले, "कोणत्याहि तीन विद्यार्थ्यांना माझ्यासमोर आणा." चालकांना विशेष कुतूहल वाटून त्यांनी १५ वर्षांच्या विद्यार्थ्यांना बोलावून घेतलें. वीर सावरकरांनी त्या तिघांना प्रश्न विचारला, "तुम्ही व्यायामाचे प्रकार



कशासाठी शिकतां ?" विद्यार्थी म्हणाले, "शरीर बळकट व सुंदर होण्यासाठी." सावरकर म्हणाले, "शरीर बळकट कशासाठी करावयास पाहिजे?" विद्यार्थी म्हणाले, "कोणत्याहि प्रसंगीं तोंड देण्याची आपली सतत तयारी असावी म्हणून." सावरकरांनी तिसरा प्रश्न विचारला, "एवढ्याच हेतूने तुम्ही व्यायाम घेता काय ? की आणखी कांही उद्दिष्ट आहे ?" विद्यार्थी म्हणाले, "हो हो आहे तर; नुसते एवढेंच नव्हे तर आणखी थोर ध्येय आहे आमच्यापुढे. आम्ही पारतंत्र्याच्या नरकांत खितपत पडलों आहोंत. देशाला तनमनधन अर्पण करण्याचाहि आम्ही निर्धार केला आहे. ते करीत असतांना जिवावरचे प्रसंग येतील त्या वेळी शरीर हटता कामा नये म्हणून आम्ही व्यायाम शिकत आहोंत." या तिघा विद्यार्थ्यांची ही उत्तरें ऐकून सावरकर आश्चर्यचकित झाले. त्यांनी त्यांची पाठ थोपटली. ते म्हणाले, "हा निश्चय मनांत कायम ठेवा." संस्थेच्या चालकांचा त्यांनी गौरव करून लहान मुलांच्या खाऊकरिता देणगी दिली.

—र. के. पटवर्धन, कुर्ला.

* * *

### ४५. शब्दांना प्रतिशब्द

नाट्यकला प्रसारक मंडळ घेऊन मी १९२७ मध्ये रत्नागिरीस गेलों होतों. मी या नाटक मंडळीचा व्यवस्थापक होतों. त्या वेळीं वीर सावरकर रत्नागिरीत होते. सावरकरांनी आमच्या नाटक संस्थेकरितां एक नाटक लिहावें अशी त्यांना विनंती करण्यात आली. त्यांनी आमची विनंती मान्य करून 'उःशाप' हें नाटक लिहिलें आणि स्वतः सूचना देऊन बसविलें. नाटकाचा दिवस ठरला. दर्शिका [तिकिटें] विकल्या गेल्या. नाटकाला नाटकगृह असें नव्हतें. नारळाच्या फांद्या आणि तरटाचें गृह उभारण्यांत आलें. ऐन वेळीं रत्नागिरीच्या जिल्हा अधिकाऱ्याने या नाटकाला पर-

कामनी देसां येत नाही अशी आज्ञा केली. आमची श्रेद्धा उडाली. परंतु तें नाटक वीर सावरकरांचें असल्याने रत्नागिरीच्या जनतेने समंजसपणा दाखवून म्हटलें, " सरकारने नाटकाला मंजुरी दिली तर आम्ही नाटक पाहूं. आपण केलेले श्रम लक्षात घेतां आम्ही पैसे परत मागणार नाही." मला असें आठवतें की, वीर सावरकरांनी त्यावेळच्या गव्हर्नरला विद्युत् संदेश पाठवून म्हटलें की, "माझ्या लेखनात असा कोणता आक्षेपार्ह भाग आहे तें मला कळवावें." सुदैवाने नाटकाला अनुज्ञा मिळाली. सावरकरांनी नाटकगृहात कांही भाषाशुद्धीचे तक्ते लाविले होते. तिकिट न म्हणतां 'दर्शिका', वन्स मोअर न म्हणतां 'पुनश्च', शेम शेम न म्हणतां 'धिक्कार धिक्कार' अशा त्या सूचना होत्या.

## ४६. पोलिसांनी गराडा घातला

नाटकगृहाला पोलिसांनी वेढा घातला होता. आमचे नाटकाचे संवाद संक्षेपारले पाठ होते. दोन सरकारी लेखनिक आम्ही तेच शब्द बोलतो आहोत की नाही हें पाहण्याकरिता डोळे फाडून आणि कान टवकारून बसले होते. उशाप नाटक अतिशय परिणामकारक झालें. आम्ही सावरकरांचे आभार मानून त्यांना चांदीची दौत नि चांदीचा दांडा असलेलें सोन्याचें टोक [ निब ] अर्पण केलें. त्यांना या वस्तु अर्पण करतांना आम्ही विनंती केली की, " या लेखनसाहित्याने आपण आमच्या मंडळीकरता दुसरें नाटक लिहिण्यास द्यावें." सावरकर हसून म्हणाले, " लाकडाच्या दांड्यांत लोखंडाचें टोक बसवून लिहिलेल्या नाटकासंबंधी मंडळींना भोगावा लागणाऱ्या त्रासाची जर बरोबर कल्पना असेल तर चांदीच्या दांड्याला सोन्याचें टोक बसवून लिहिल्या जाणाऱ्या नाटकाला किती कष्ट नि त्रास भोगावा लागेल याची कल्पना करून मगच दुसरें नाटक लिहिण्यास विनंती करणें बरें पडेल."

—शं. बा. परांजपे, इंदूर,

* * *



## ४७. प्रयोग पाहून अधिक समजलें.

वीर सावरकर १९२४ ते ३७ च्या दरम्यान रत्नागिरीला असतांना समुद्रकाठीं फिरावयास जाण्याचा त्यांचा नियम होता. त्यांच्या मार्गावरच आमच्या नाटक मंडळीचें बिऱ्हाड होतें. फिरावयास जातांना ते घटकाभर थांबून आमची सर्वांची चौकशी करून पुढे जात. कधी कांही प्रसंगाला विशेष मार्गदर्शनहि करीत. नाटक मंडळीतील सर्व लहान मोठे लोक रोज त्यांची आतुरतेने वाट पाहत. वीर सावरकरांनी एकदा तरी एखादें संपूर्ण नाटक बघावें अशी आमची सर्वांची इच्छा होती. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे ते रात्रीचें जागरण नेहमी टाळीत असत. अखेर कै. गडकऱ्यांचें नाटक म्हणुन ते बघावयास तयार झाले. वीर सावरकर नाटकाला उपस्थित राहणार ही बातमी गांवभर झाल्याबरोबर कधी झाली नाही इतकी गर्दी थिएटरवर झाली. नाटक बघावयास सावरकर आल्यामुळे नाटकांतला काम करणारा प्रत्येक नट आपलें नाट्यगुण परिपूर्णपणें दाखवीत होता. सावरकर म्हणाले, " गडकऱ्यांचें वाङ्मय मी वाचलें होतें. पण तें खरोखरच किती सुंदर आहे तें आजच्या प्रयोगाने मला समजलें."

## ४८. तें बापडें अर्भक सांभाळाल कांहो !

शारदा संगीत नाटक मंडळीचा मुक्काम १९२७ मध्ये रत्नागिरीला होता. रत्नागिरीच्या मुक्कामांत वीर सावरकरांचा सहवास लाभणार हा सर्वांचा आनंद मोठा असे. नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं फिरावयास जातांना ते नियमाने येत. एका संध्याकाळीं सावरकर बिऱ्हाडीं आले पण त्या दिवशीं त्यांनी आमचें कुशल विचारलें नाही. सावरकर नेहमीच्या प्रसन्न मनःस्थितींत दिसले नाहीत. ते ज्या चिंतेत होते ती चिंता एका हिंदूच्या भवितव्याची होती. तेथे पसरलेल्या गंभीर वातावरणांत ते मला एकदम म्हणाले, " बोरकर, आपण नाटक मंडळीत एकूण किती माणसं सांभाळता ? " मी म्हणालों, ' चाळीस '. ते म्हणाले " ठीक आहे, मग आता हें आणखी एकेचाळिसावें माणूस तुम्ही सांभाळावयाचें आहे, नव्हे चाळीस माणसांनी मिळून हें एकेचाळीसावें माणूस सांभाळावयाचें ठरविलें तर या हिंदू जीवावरचें संकट टळणार आहे. तुम्ही तेवढें करावें अशी माझी इच्छा आहे." असें म्हणून

त्यांनी माझ्या समोर एक अर्भक ठेविलें. मी त्यांची कळकळीची विनंती एकदम मान्य केली. माझें तें कर्तव्य होतें. नंतर सावरकरांनी त्या अर्भकाची व त्याच्या आईची माहिती सांगितली. ते म्हणाले " एक बिचारी हिंदु अनाथ स्त्री अपघाताने आयुष्यांत फसली होती. आणि परिणामी एका अनाथ अर्भकाला जन्म देऊन ती परलोकवासी झाली. तिचें हें मूल जिवंत होतें. त्या मातेचें दुर्भाग्य संपलें होतें. आणि अर्भकाचें सुरू झालें होतें. आई हें नातें त्या इवल्या जीवाला कळण्यापूर्वीच त्याची आई गेली." सावरकर हा प्रसंग सांगत असतांना आमच्या काळजाची कालवाकालव झाली.

## ४९. मास्टर दत्तारामचें भविष्य

रत्नागिरीच्या हायस्कुलांत कीचकवध नाटक व्हावयाचें होतें. हा समारंभ वीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली होता. या नाटकाच्या प्रयोगाच्या आदल्या दिवशीं सैरंध्रीची भूमिका करणारा मुलगा आजारी पडला. आता उद्या काय करावें हा प्रश्न पडला. सावरकरांच्या कानीं हा प्रकार गेला. ते चालकांना म्हणाले, " चिंता करूं नका. नाटकाचा प्रयोग ठरल्या वेळींच होईल. मी पाहतो." असें म्हणून ते थेट आमच्या नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं आले. ते मला म्हणाले "बोरकर, कंपनीत एखादा हुशार, धीट, एकपाठी असा कोणी मुलगा असला तर त्याला हाक मारा पाहूं" मी चटकन दत्तारामाला हाक मारली. सावरकर त्याला काय विचारणार आहेत किंवा कसली परीक्षा घेणार आहेत याची मला कल्पना येईना. ते दत्तारामाला जवळ घेऊन म्हणाले, "हे पहा बाळ, आता मी तुझ्याकडे कीचकवध नाटकातील सैरंध्रीचीच नक्कल पाठ करायला देणार आहे. उद्या रात्री तू तें काम करावयाचें. करशील ना ?" दत्तारामने कबूल केलें. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशीं दत्तारामचें सैरंध्रीचें काम दृष्ट लागण्याइतकें गोड झालेंही. नाटक संपल्यावर वीर सावरकर आंत आले. त्यांनी दत्तारामला जवळ घेऊन आम्हांला म्हटलें, "हा मुलगा उद्या फार मोठा नट होणार आहे." आजच्या मास्टर दत्तारामचें भवितव्य सावरकरांनी उच्चारल्याप्रमाणे यशस्वी ठरलें आहे.



## ५०. नाटककार दीक्षित शरण गेले.

दीक्षित नावाचे एक नाटककार वीर सावरकरांना भेटावयास पतितपावन मंदिरांत आले होते. दीक्षितांनी आपल्या नाटकाचा विषय सावरकरांना समजावून सांगितला. त्यांचे विचार हे सनातनी व समाजाची प्रगति न करणारे होते. त्यांची प्रतिगामी विचारसरणी ऐकून सावरकरांनी त्यांच्या नाटकावर खूपच कडाडून टीका केली. दीक्षितांनी आपली बाजू मांडण्याचा खूप प्रयत्न केला पण वादांत अखेर त्यांना सावरकरांचीं मतें मान्य करावीं लागलीं. दीक्षित त्यांचा निरोप घेऊं लागले, तेव्हां सावरकरांनी त्यांना चहा देऊं केला. हा चहा अस्पृश्याच्या हातचा होता. पतितपावन मंदिरांत सावरकरांनी चहा करण्यास महार जातीचा मुलगा कायम ठेविला होता. दीक्षित चहा घेण्यास तयार होईनात. ते खोटें बोलून म्हणाले, 'मी चहा घेत नाही.' सावरकर म्हणाले, 'आमच्याकडे दूध आहे ना. मी दूध मागवितों आपल्याला.' असें म्हणून सावरकरांनी त्याच मुलाला दूध आणायास सांगितलें. कर्मठ दीक्षितांना तें दूध प्राशन करावें लागलें.

—वि. दा. बोरकर, पुणें.

* * *

## ५१. क्रांतिकारक आहेत त्यांच्यांत सामील व्हा

आमचे गुरुजी श्री. फडणीस हे दहशतवादी क्रांतिकारक होते. ते नुकतेच तुरुंगांतून सुटून आले होते. त्यांच्याच सांगण्यावरून आमच्या मूळ क्रांतिकारक मनोवृत्तीला प्रोत्साहन मिळालें. दहशतवादी चळवळ अंगीकारल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही, अशा विचारांच्या मनःस्थितींत मी कोल्हापुरास असतांना श्री. फडणीस गुरुजींकडून वीर सावरकरांच्या जीवनांतील कांही रोमहर्षक गोष्टी ऐकावयास मिळाल्या. या सुमारास सावरकर रत्नागिरीस अज्ञातवासांत होते. त्यांचा तो इतिहास ऐकल्याने त्यांना पाहण्याची

तीव्र इच्छा झाली. १९३१ मध्ये त्यांच्या भेटीस सायकलवरून रत्नागिरीस गेलों. मी त्यांच्याशी प्रचलित म्हणजे गांधीजींच्या राजकारणासंबंधाने बोलूं लागलों. सावरकर म्हणाले, "स्वातंत्र्याच्या लढ्याकरिता तुमच्या मनाची तयारी काय आहे ? आणि त्याकरिता काय करतां ?" मी म्हणालों, "मी खादी वापरतों आणि देशाच्या स्वातंत्र्याकरिता वाटेल तो त्याग करण्याची माझी तयारी आहे." ते म्हणाले, "गांधींच्या मार्गात वाटेल तो त्याग करून नाही. त्यामुळे तुमचें इच्छित साध्य साधणार नाही." त्यांचा हा दृष्टिकोन मला पटला. या संबंधांत सावरकर आणखी मार्गदर्शन करूं लागल्यावर मी तर मोहून गेलों. ते म्हणाले, "महाराष्ट्रांत अजून कांही क्रांतिकारक आहेत, त्यांच्यांत तुम्ही सामील व्हा."

पुढे भाई मानवेंद्र रॉय यांच्याशी माझा संबंध आला. त्यांना वीर सावरकरांविषयी अतिशय आदर होता.

—आत्माराम नाना पाटील

* * *

## ५२. भगतसिंगाच्या फाशीने बेचैन झाले.

रत्नागिरी जिल्ह्यांतील बरवडे गांवच्या शाळेचा वार्षिक समारंभ चालू होता. या समारंभाचे अध्यक्ष कै. दादासाहेब परकर हे होते आणि उद्घाटक वीर सावरकर होते. १९२९ सालची ही गोष्ट. हें वर्ष भारताच्या स्वातंत्र्य लढ्यांतील अपूर्व होतें. समारंभ सकाळचा सुरू झाला, तेवढ्यांत तिवरी बंदराच्या बोटीने आलेल्या ताज्या वृत्तपत्रांत भगतसिंग, राजगुरु यांना फांशी दिल्याची बातमी कळली. तें वृत्त वाचतांच या समारंभावर आणि विशेषतः वीर सावरकरांच्या चर्येवर विलक्षण दुःखाची छाया पसरली. वीर सावरकरांचे डोळे अश्रूंनी डबडबले. बराच वेळ त्यांची मनःस्थिति बेचैन झाली. कांही वेळ त्यांनी मौन पाळलें आणि ते ध्यानमग्न झाले.

—स. दी. पाटील, मालगुंड.

* * *



## ५३. स्वदेशीचें प्रात्यक्षिक

१९२९ मध्ये मी महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसतर्फे रत्नागिरी जिल्ह्यांत 'स्वदेशी' या विषयावर व्याख्यानाच्या दौऱ्यावर गेलों होतों. रत्नागिरीला मी एके दिवशीं सायंकाळीं रस्त्याने चाललों असतां एका बंगल्याच्या आवारांतून मला कडाक्याचा वादविवाद ऐकूं आला. या एकूण वादविवादावरून त्या ठिकाणीं वीर सावरकर असावेत असें मला वाटलें. मी तडक फाटकांतून आत शिरलों. माझी ओळख करून देतांना मी त्यांना 'केसरीचा सहसंपादक असून इकडे स्वदेशी या विषयावर व्याख्यान देण्यास आलों' असें सांगितलें. स्वदेशी हा शब्द ऐकतांच सावरकर उठून म्हणाले 'आतां माझ्या बरोबर चला म्हणजे मी स्वदेशीची चळवळ काय करीत आहे हें तुम्हाला दिसेल.' असें म्हणून त्यांनी मला एका स्वदेशी मालाच्या दुकानांत नेऊन स्वदेशीचें प्रात्यक्षिक दाखविलें. त्यांचें तेथील कार्य पाहून मी थक्कच झालों. सायंकाळीं माझें विठ्ठल मंदिरांत व्याख्यान झालें. मीं त्यांना निमंत्रण केलें. ते म्हणाले, 'सरकारी प्रतिबंधनामुळे मला तुमच्या व्याख्यानाला येतां येणार नाही. परन्तु देवळाच्या माडीवर बसून तुमचें व्याख्यान ऐकेन.'

—वा. कृ. भावे, पुणें.

* * *

## ५४. बाळ, तूं चित्रकार होशील !

१९२४ सालीं स्वातंत्र्यवीर रत्नागिरीस बंधमुक्त होऊन आले. साधारण रोज सकाळीं अंगांत निळसर रंगाचा व काळसर रेघा असलेला कोट घालून तात्या फिरावयास बाहेर पडत. हातांत छत्री व डोक्यावर गोल काळी टोपी असे. चेहेऱ्यावर तर प्रखर बुद्धिमत्ता व सोसलेल्या कष्टांची कठोर छाया अगदी स्पष्टपणें दृग्गोचर झालेली असावयाची. त्यांचें एक काल्पनिक चित्र

काढण्याची मला तीव्र इच्छा झाली. माझें वय त्या वेळीं अवघें १२-१३ वर्षांचें असावें. मी त्यांना रोज न्याहाळून पाहायचा क्रम आखला. तीनचार दिवसांत त्यांचें एक मोठें चित्र काढून तें त्यांच्या जाण्याच्या मार्गांत असलेल्या एका दुकानांत बाहेर लावून ठेवलें. एके दिवशीं रस्त्याने जात असतां तात्यांची दृष्टि त्या माझ्या कलाकृतीवर गेली व ते विस्मयाने चटकन त्या ठिकाणी थांबले. अवघ्या १३ वर्षांच्या एका मुलाने आपलें इतकें सुंदर चित्र काढलेलें पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें व मला आपल्या घरीं भेटण्यासाठी त्यांनी बोलावलें. मी भीत भीत त्यांचेसमोर जाऊन उभा राहिलों. माझ्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले, " बाळ, पुढे तूं मोठा चित्रकार होशील." तात्यांनी मला दहा रुपये बक्षीस दिल्याचेंहि आठवतें. मी त्यांना त्यांच्या हस्ताक्षरांत प्रशस्तिपत्र मागितलें. त्यांत त्यांनी लिहिलें " कुमार रेगे याने काढलेलें माझें चित्र मी पाहिलें. शिष्यवृत्त्या मिळून त्यास उत्तेजन मिळाल्यास तो चित्रकलेंत चांगलाच नांवलौकिक मिळवील असें मला वाटतें." अनेक आंतरराष्ट्रीय व्यक्तींनी मला जी शाबासकी दिली व स्व. महामंत्री नेहरूंनी जी माझ्या कलेची वाखाणणी केली, त्यामागें तात्यांच्या सदिच्छेचा फार मोठा भाग आहे.

## ५५. मृदूनि कुसुमादपि

रत्नागिरीस असतां वर्षाच्या शेवटीं म्हणजे साधारण दर डिसेंबर महिन्यांत मी त्यांच्याबरोबर आपलें छायाचित्र काढून घेत असे. असा क्रम चालू असतां १९२९ सालीं घेतलेल्या छायाचित्रांत तात्या चि. विश्वासला मांडीवर घेऊन खुर्चीवर बसले. त्यांच्या पायाजवळ चि. सौ. प्रभाताई बसल्या होत्या. मला वाटतें त्या वेळीं चि. विश्वास सुमारें एक वर्षाचा व चि. प्रभाताई ३-४ वर्षांच्या असाव्यात. तात्यांच्या मागे मी उभा राहिलों. छायाचित्र श्री. वसंतराव बागवे यांनी घेतलें. तात्यांना देण्यासाठी ब्रोमाईड कागदावर मी त्याच्या प्रती काढल्या व माझ्याजवळ पीओपी कागदावर काढलेली एक कच्ची प्रत ठेवली. वास्तविक ती मुळींच टिकाऊ नव्हती. पण त्यांची अशी कल्पना झाली की, त्यांना दिलेल्या काळसर प्रतीपेक्षा त्यांत खास वैशिष्ट्य असावें. मी नाना प्रकारें त्यांना सांगून पाहिलें पण त्यांची समजूत पटेना. एकदम रागाने त्यांनी माझ्या अंगावर ते फोटो भिरकावून दिले. मग मी काय करणार ! माझ्या जवळची जांभळट प्रत त्यांच्या टेबलावर ठेवली. पुढे कांही दिवसांनी ती फिकी पडली. गालांतल्या गालांत हसून तात्या म्हणाले, " अरे, माझ्या त्या काळसर प्रती घेऊन ये. तुझ्यावर मी फार रागावलों ना रे ? मनांत कांही आणू नको बरं का !"



## ५६. श्रद्धानंद जन्मास येतील.

त्यांनी श्रद्धानंदांचा खून झाला त्या वेळीं तात्यांचें रत्नागिरीच्या विठ्ठल-मंदिरांत जें भाषण झालें तें ज्यांनी ऐकलें असेल त्यांच्या कानांत अद्वितीय कर्तृत्वाचे पडसाद अजूनही उमटत असतील. व्याख्यानाच्या शेवटीं तात्या म्हणाले, " जर कुणाला अशी घमेंड असेल की एक श्रद्धानंद गेले म्हणून सारें हिंदुत्व नष्ट होईल, तर त्याला माझें आव्हान आहे की, ज्या भारत मातेने एक श्रद्धानंद निर्माण केला त्याच्या रक्ताच्या एकेक थेंबागणीक लाखों श्रद्धानंदांना जन्म देण्याचें तिच्यांत अपूर्व सामर्थ्य आहे."

## ५७. सरकारने हरकत घेतलेला अभिप्राय

भारतीय सैन्यांत नोकरी करत असतां १९४४ च्या सुमारास मी रवींद्रनाथ टागोरांच्या "गीतांजलि"चें मराठींत भाषांतर केलें. तात्यांनी आपल्या हस्ताक्षरांत मला माझ्या पुस्तकावर अतिशय सुंदर अभिप्राय दिला. परंतु त्या वेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्याने हरकत घेतल्यामुळे मला तो पुस्तकांत छापतां आला नाही ! तो अभिप्राय असा:—श्रीयुत रेगे हे सैन्यांत शिरून आज एक लढाऊ ऑफिसर झाले आहेत ह्याचा मला अभिमान वाटतो. आजच्या हिंदु तरुणांचें आजचें पहिलें कर्तव्य म्हणजे सैन्यांत शिरून आपली मेलेली सैनिक परंपरा नि बाणा पुन्हा जिवंत करणें होय. स्वदेशाकरता तुरुंगांत आज जाणें हें जसें कांही प्रसंगीं देशभक्तीचें लक्षण समजलें जातें, त्याचप्रमाणें तरुणांनी सेनादल, विमानदल व नौदल यांत शिरून शस्त्रविद्या शिकणें हें देशभक्तीचेंच लक्षण आहे, कर्तव्य आहे. मी तरुणांना मागे सांगितलें होतें की, रडक्या कथा, कादंबऱ्या आता पुरेत. स्वातंत्र्य हवें असेल तर श्रीफळ मोडा नि बंदुका उचला. श्री. रेगे यांनी बंदूक तर उचललीच परंतु माझें त्या वाक्यांतील सारें मर्म ओळखून बंदूक चालवीत असतांनाच फावले तेव्हा

कलेचाही विकास करण्यासाठी ओक पण मोटका नाही. त्यांनी सैन्यांतच सापडल्या वेळी केलेले गीतांजलीचें भाषांतर वाचलें आहे. त्यांची अजीच प्रगति होवो." —वि. दा. सावरकर.

* * *

## ५८. तात्याराव स्वतः गाणें म्हणत.

अस्पृश्योद्धाराची चळवळ तात्यांनी ज्या वेळीं रत्नागिरीस प्रथमतः सुरू केली, त्या वेळीं सनातनी व्यक्तीकडून त्यांना अतिशय विरोध झाला. तात्यांनी आपल्या महान् कर्तृत्वाच्या जोरावर हा विरोध हळूहळू नष्ट केला व भंग्याच्या एका मुलाला विठ्ठलमंदिराच्या सभामंडपांत उभे करून ईश-प्रार्थना म्हणावयास लावली. दहीकाल्याच्या दिवशीं भयंकर गर्दी विठ्ठल मंदिरासमोर व्हायची. एका विस्तीर्ण वृक्षाखालील पारावर उभे राहून तात्या स्वतः मोठ्या आवाजांत "तुम्ही आम्ही सकल हिंदु" हें गाणें हातवारे करून म्हणायचे. त्यांच्या कपाळाला त्या वेळीं गुलाल फासलेला असे. जमलेले लोक त्यांच्या गाण्याची पुनरावृत्ति करीत. सारें वातावरण दुमदुमून जात असे. तात्यांच्या मानेच्या व कपाळाच्या शिरा ताठ झालेल्या दिसत.

## ५९. तात्यांनी केलेलें गांधीजींचें स्वागत

तात्या रत्नागिरीस असतां महात्मा गांधी १९२५-२६ सालच्या सुमारास तेथे आले होते. पटवर्धन हायस्कूलच्या मैदानावर त्यांचें व्याख्यान झालें. व्याख्यानाच्या सुरवातीसच महात्माजी म्हणाले, "रत्नागिरीस येण्याचा माझा पहिला हेतु म्हणजे सावरकरांचें दर्शन घेणें; बऱ्याच वर्षांनी माझी त्यांची भेट होणार आहे." महात्माजी आपल्या घरीं येणार याची तात्यांना अगोदर मुळीच कल्पना नव्हती. तत्काळ ते त्यांच्या आतिथ्याच्या तयारीला लागले.



महात्माजी येण्याच्या सुमारास तात्या आपल्या घराच्या समोर असलेल्या बोळाच्या टोकाला उभे राहिले. त्यांच्या शेजारीं मी उभा होतों. महात्माजी मोटारींतून उतरले व त्यांनी तात्यांना घट्ट कवटाळलें. "ह्या रस्त्याने या" तात्या महात्माजींना म्हणाले. तात्यांच्या खांद्यावर हात ठेवून महात्माजी चालू लागले. हसत हसत ते म्हणाले, "सावरकरजी, तुम्हीच आता मला मार्ग दाखवावयाचा आहे." तात्यांनी त्यावर स्मित हास्य केलें. महात्माजींच्या बरोबर सौ. कस्तुरबाही त्या वेळीं होत्या. घरांत आल्यावर त्या आतील स्वयंपाकघरांत थेट सौ. माईंकडे गेल्या. महात्माजी कॉटवर बसले व तात्या समोरील खुर्चीवर त्यांच्या समोर बसले. राजकारणावर या दोन महापुरुषांचा बराच वेळ वादविवाद चालला होता. चरखा फिरवून व खादी वापरून स्वराज्य मिळेल हा महात्माजींचा दावा तात्यांना पटला नाही. बऱ्याच वेळा महात्माजींना त्यांनी निरुत्तर केलें. शेवटीं महात्माजी म्हणाले, "मला वेळ फार थोडा आहे. पत्राने आपण अधिक चर्चा करूं."

## ६०. श्रीमंत भागोजीराव कीर

पूर्वास्पृश्यांच्या उद्धाराचें पवित्र कार्य हातीं घेतांना, त्यासाठी तात्यांना अतिशय कष्ट सोसावे लागले आहेत. पूर्वास्पृश्यांच्या लहान लहान झोपड्यांत आमच्या तात्यांचें पडलेलें पहिलें तडफेचें पाऊल आम्ही डोळ्यांनी पाहिलें आहे. रत्नागिरीतील एक दिवंगत उद्योगपति भागोजीराव कीर त्या भागांत सर्वांनाच परिचित होते. अत्यंत गरीबीतून स्वतःच्या कर्तबगारीवर पुढे येऊन ते लक्षाधीश झाले. ईश्वरावर त्यांची नितान्त श्रद्धा! महादेवाचें एक अतिशय सुंदर व भव्य असें मंदिर त्यांनी रत्नागिरीस बांधलें. त्यांची वृत्तीही अतिशय सनातनी होती. त्यांच्या औदार्याची आठवण अजूनही सर्व-जण काढतात. अशा या पुराणमतवादी धनिकाच्या हृदयांत परिवर्तन तात्यांनी केलें. पूर्वास्पृश्यांच्या प्रवेशानें दिव्य करून दाखविण्यासाठी 'पतितपावन मंदिर' त्यांच्याकडून बांधविलें. मंदिराचें उद्घाटन जगद्गुरु शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी केलें. फार मोठा थाटाचा सोहळा त्या वेळीं करण्यांत आला. आपल्या रसाळ वाणीनें तात्यांनी सर्वांना अक्षरशः मंत्रमुग्ध केलें. भागोजी-राव कीरांच्या औदार्याचें, भक्तिभावनेचें आणि अपूर्व कर्तृत्वाचें वर्णन

ते आपल्या प्रभावशाली शैलीने करीत असतां सर्व श्रोते चित्रामारखे तटस्थ होऊन त्यांच्याकडे पाहत होते. श्री. कीर यांना तर इतकें गहिंवरून आलें की, त्यांच्या डोळ्यांतून अक्षरशः अश्रु ठिपकतांना मीं पाहिले आहेत.

## ६१. तें दुर्मिळ छायाचित्र

तात्यांची खास घेतलेली कितीतरी छायाचित्रें आपण पाहतों. बहुतेकांत त्यांच्या मुखावर गंभीर छटा पसरलेली दिसते. तात्यांची सुंदर छायाचित्रें घेण्याचें माझ्या एकदा मनांत आलें. त्यांचा तो करड्या रंगाचा संपूर्ण इंग्रजी पद्धतीचा सूट त्यांनी अंगावर घालावा असा मी हट्ट धरला. उष्मा होत होता. तरीही तात्यांनी माझा तो हट्ट पुरविला. त्यांना बरोबर घेऊन मी एका छायाचित्रमंदिरात गेलों. माझे मित्र श्री. शामराव नाईक यांनी माझ्या वतीने छायाचित्रें घेतलीं. प्रत्येक छायाचित्रांत तात्या आपले नेहमीप्रमाणे गंभीर ! मग मी एक युक्ति केली. तात्यांचा व माझा आत्मीयतेचा संबंध होता म्हणूनच माझी युक्ति फलद्रूप झाली. श्री. नाईक यांचेजवळ जाऊन मी हळूच त्यांच्या कानांत पुटपुटलों, "तुम्ही तयारींत राहा. मी तात्यांना हसवतो." सावकाशपणें मी तात्यांच्या जवळ गेलों आणि एकदम त्यांच्या डोक्यावरील टोपी उचलली. ते विस्मयाने माझ्याकडे पाहूं लागले. मी म्हणालों, "तात्या, तुमच्या रुबाबदार भालप्रदेशावरील टक्कल किती छान दिसतें !" तात्या मनापासून हसले. एकच क्षण ! शामराव नाईकांनी छायायंत्रावरील झाकण उघडलें. एक दुर्मिळ छायाचित्र हस्तगत झालें. दिनांक ३-३-१९५३ रोजी घेतलेलें तात्यांचें तें चित्र कांही मोजक्या अशा ठळक व्यक्तींच्या संग्रहांत आहे.

—द. श्री. रेगे, चित्रकार

✦ ✦ ✦



## ६२. नेपाळकडे पहा.

वाई येथील प्राज्ञपाठशाळेच्या प्रचाराकरिता मी रत्नागिरीस १९२६ मध्ये गेलों होतों. या वेळीं वीर सावरकर मुक्त होऊन रत्नागिरींत आले होते. माझ्या प्रकट भाषण समारंभास सावरकरांची अध्यक्ष म्हणून निवड झाली होती. त्यांनी अध्यक्षीय भाषण केलें. विशेष म्हणजे माझ्या विषयांतही त्यांची महान् आदर्श पाहण्याची प्रतिभा दिसून आली. व्याख्यान संपल्यावर सावरकर मला आग्रहाने म्हणाले, "शास्त्रीबोवा, उद्या सकाळीं मला भेटल्याशिवाय जाऊं नका." त्याप्रमाणे मी त्यांच्याकडे गेलों. त्यांच्या निवासस्थानी सुमारें दोन तास वेगवेगळ्या विषयांवर बोलणें झालें. नेपाळसंबंधाने ते म्हणाले, "तुम्ही नि तुमच्यासारख्या तरुण मंडळींनी आता नेपाळकडे वळले पाहिजे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा आरंभ-बिंदु स्वतंत्र नेपाळमधूनच सुरू झाला पाहिजे. कारण सार्‍या जगात भारतापैकी तोच एक भूभाग स्वतंत्र असा आहे. म्हणून तेथेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी कांही तरी प्रयत्न करता येईल. भारताच्या अखंड राष्ट्रीयत्वाचा आणि स्वातंत्र्याच्या विचारांचा प्रचार नेपाळमध्ये होईल तर गुरख्यांच्या वीर वृत्तीचा भारताच्या स्वातंत्र्य-संपादनाला पाठिंबा मिळेल."

—भय्याशास्त्री वाटवे, कराड.

✦ ✦ ✦

## ६३. इतिहास, इतिहासाचा उपयोग व इतिहासाची दृष्टि

छत्रपति शिवाजी महाराज यांच्या जन्मतिथीच्या संशोधनाकरिता मी १९२७ मध्ये सातारा–कोल्हापुरच्या दौर्‍यावर गेलों होतों. तेथील काम आटोपून त्याच सुमारास रत्नागिरींत असलेल्या वीर सावरकरांना भेटावें म्हणून तिकडे गेलों. शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीचा विषय मी काढून त्यांना म्हणालों, "आज माझें प्रकट व्याख्यान शिवजन्मप्रसंगावर आहे."

सावरकर म्हणाले, "शिवजन्म प्रसंग म्हणजे त्या वेळची परिस्थिति सांगणार काय?" मी म्हणालों, "प्रामुख्यानें मला शिवाजी महाराजांचा जन्म १६२७ मध्ये झाला की १६३० मध्ये हें सांगावयाचें आहे. माझ्या हातीं जी साधनें आलीं आहेत त्या पुराव्यानुसार १६३० मध्येच त्यांचा जन्म झाला हें मी सांगणार आहे." सावरकर म्हणाले "मग हें तुमचें भाषण शिक्षणसंस्थां-तून होण्याजोगें आहे. केवळ जनतेपुढे नको." मी म्हणालों, "शाळादिकां-तून मी जाणारच आहे पण एखादें प्रकट भाषण करावेंसें वाटतें." या माझ्या भाषणास आपण अध्यक्ष म्हणून यावें अशी माझी फार इच्छा आहे. या जन्मतिथीबद्दल आपलें मत काय पडतें तें मला ऐकण्याची इच्छा आहे." सावरकर म्हणाले, "मला नवी मिति मान्य आहे. मी तें सर्व वाचलें आहे. शिवाजी महाराजांनी जो राज्यव्यवहार कोश केला तो मला पाहिजे होता. तो कोठें मिळेना. पण तुमच्या या शिवचरित्र प्रदीपांत तो सर्व आला आहे. त्यांत शिवजन्म प्रसंग आला आहे. तुमची मिति मला मान्य आहे." मी म्हणालों, "आपण नवी मिति मान्य आहे असें म्हणतां, परंतु चुकीच्या मितीवर जो मुंबईत शिवजन्मोत्सव होणार आहे त्यावर आपण आपली स्वाक्षरी कशी काय केली?" सावरकर म्हणाले "होय, मी स्वाक्षरी दिली आहे. इतिहासाचे बाबतीत माझीं मतें निराळीं आहेत. इतिहास, इतिहासाचा उपयोग व इतिहासाची दृष्टि यांत थोडें थोडें अंतर आहे. नव्या मितीचा स्वीकार करावा हें अवश्य आहे म्हणून प्रयत्न व संशोधनहि अवश्य; पण जुन्या मितीच्या विरुद्ध म्हणजे उत्सवाच्या विरुद्ध असें होऊं नये. हजारो लोक 'शिवाजी महाराज की जय' करीत असतांना मी आपला आवाज त्यांत मिळवितांना हा जयजयकार जुन्या की नव्या मितीस करावयाचा याला प्राधान्य मिळावें हें मला संमत नाही." अशी त्यांची माझी उद्बोधक चर्चा झाली. माझ्या सभेला त्यांना येतां आलें नाही.

पुण्याच्या शिवाजी मंदिरात वीर सावरकर यायचे होते. जवळच भारत इतिहास संशोधन मंडळाला त्यांनी भेट द्यावी म्हणून निमंत्रण देण्यास मी गायकवाडवाड्यांत गेलों. मी म्हणालों, "जातां जातां आमच्या मंडळांत यावें.' सावरकर म्हणाले, "अहो, जातां जातां कां म्हणतां? चांगलें थांबून थांबून तुमचें मंडळ मला पहावयाचें आहे. कांही चर्चाहि करावयाची आहे तुमच्याशीं."



माझ्या रत्नागिरीच्या भेटींत शिवजन्मतिथीसंबंधानें झालेल्या चर्चेची स्मृति सावरकरांना देऊन ते म्हणाले, "काय, जन्माच्यापुढे कांही गेलांत कां तिथेच आहांत?' मी म्हणालों 'आग्र्याहून सुटून सुद्धा आलों.'

—ग. ना. जोशी, पुणें.

## ६४. अस्पृश्योद्धार नव्हे, स्पृश्योद्धार

स्वातंत्र्यवीर सावरकर १९२५-२६ च्या सुमारास येवल्याला आले होते. येवल्याच्या नागरिकांनी त्यांची मिरवणूक काढली. त्याचें रात्रीं प्रकट व्याख्यान झालें. व्याख्यानाचीं हस्तपत्रकें वाटलीं, त्यावर शीर्षक होतें 'स्पृश्योद्धार.'

सभेचे आणि त्या सर्व कार्यक्रमाचे सूत्रधार कै. वामनशास्त्री दातार हे होते. लोकांनी त्यांना विचारलें 'अस्पृश्योद्धार या शब्दांतला सुरवातीचा 'अ' कोठें गेला?' तेव्हा स्वतः सावरकरांनी आपल्या भाषणांत खुलासा केला. ते म्हणाले, "अस्पृश्य मानलेल्या बांधवांच्या बाबतींत शतकानुशतकें स्पृश्यांनी जो घोर अन्याय केलेला आहे त्या पापाचें प्रायश्चित्त घेऊनच आता स्पृश्यांचा उद्धार होणार आहे, म्हणून हा स्पृश्यांच्याच उद्धाराचा कार्यक्रम असल्यानें 'स्पृश्योद्धार' हाच शब्द यथायोग्य असून मुद्दामच योजला आहे."

—न. ग. ठाकूर, पुणें.

* * *

## ६५. सहभोजनाचा कार्यक्रम

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी श्रीमान् भागोजी शेठ कीर यांच्या साहाय्याने रत्नागिरींत पतितपावन मंदिर बांधलें. मूर्तीची स्थापना करण्याकरिता भागोजींनी काशी, मुंबई, नाशिक या गांवांहून विद्वान ब्राह्मणांना निमंत्रित केलें. रत्नागिरी येथील सनातनी लोकांचा सावरकरांच्या सर्वच सामाजिक

चळवळींना कडाडून विरोध असे. या बाहेरगांवांहून आलेल्या ब्राह्मणांना ही रत्नागिरींतील सनातनी मंडळी भेटून म्हणाली "भागोजी कीर हे भंडारी जातीचे आहेत. त्यांनी बांधलेल्या पतितपावन मंदिराची स्थापना वेदोक्त पद्धतीने करणें हें योग्य नाही." आलेली विद्वान् ब्राह्मणशास्त्री मंडळी बिथरली. त्यांनी या कार्याला स्पष्ट नकार दिला. वीर सावरकरांनी त्यांना स्पष्ट म्हटलें, "तुम्ही वेदोक्त पद्धतीनेंच सर्व कार्य उरकले पाहिजे, आणि तसें जर तुम्ही केलें नाही तर मी थांबणार नाही. 'हिंदुधर्म की जय' हा एकच मंत्र म्हणून पतितपावनाच्या मूर्तीची स्थापना करीन." सावरकरांनी असें निर्वाणीचें सांगतांच त्यांपैकी कांहीजण तयार झाले आणि कांही आले तसे निघून गेले.

वीर सावरकर सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणीत. सर्व जातीचे लोक या भोजनास येत. परंतु महार चांभाराजवळ, चांभार भंग्याजवळ, भंगी डोराजवळ बसण्याचें टाळीत. आपल्या जातीच्याच गटांत जेवावयास बसत. हें सावरकरांच्या लक्षांत आलें. ते या सर्व लोकांना म्हणाले "पूर्वास्पृश्याला ब्राह्मणाने पंक्तीला घ्यायचें म्हणजे त्याने चांभाराजवळ बसलेंच पाहिजे. पण पूर्वास्पृश्यांनीहि त्याच क्रमाने आपल्या पोटजातीमधील दुरावा सोडला पाहिजे. तें नापसंत असेल तर ब्राह्मणांनी इतरांच्या पंक्तीला कां बसावें?' हें त्यांनी स्पष्ट सांगितल्यावर सर्वजण सरमिसळ बसूं लागले.

वीर सावरकर रत्नागिरींत १९२४ ते १९३७ अखेरपर्यंत स्थानबद्धतेंत होते. या वास्तव्यांत त्यांच्या दैनंदिन प्रपंचखर्चाला ब्रिटिश सरकारकडून महिना साठ रुपये मिळत. ते कलेक्टर कचेरींतून दर महिना मी आणावयास जात असे. मी हें काम नित्यनियमाने बरेच दिवस करीत होतो. एके दिवशीं सावरकर मला म्हणाले, "मी हे पैसे मनिआर्डरनें मागूं शकतो. पण सरकार मनिआर्डरचें कमिशन कापून घेईल. निष्कारण ते पैसे सरकारला कां द्यावे? ते पैसे आपल्या माणसाला मिळावे हा माझा हेतू आहे."

पतितपावन मंदिरांत गणेशोत्सवांत सहभोजन हा एक प्रमुख कार्यक्रम असे. मी या समारंभांत सर्व कांही काम करीत असे. पण सहभोजनाचें जेवण



जेवणें टाळीत असे. त्याचें कारण माझे वडील कडवे सनातनी होते. या सहभोजनांत जी मंडळी भाग घेत त्यांचीं नांवें दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलीं जात. मी सहभोजनांत भाग घेत नाही हें सावरकरांच्या लक्षांत आल्यावर ते मला म्हणाले, "तें कांही चालायचें नाही. तू जेवायला बैस. जेवला नाहींस तरी मी जेवल्याबद्दल वृत्तपत्रांत तुझें नांव प्रसिद्ध करीन." मी घाबरून त्यांना म्हणालों, "मी जेवतों, पण माझें नांव वर्तमानपत्रांत देऊं नका. माझे वडील मला फार रागे भरतील." सावरकर म्हणाले, "तुझ्या वडिलांना यामुळे मानसिक त्रास होत असेल तर मी तुला आग्रह करीत नाही; पण तू जर सहभोजन मान्य नाही असें म्हणत असशील तर मला तें चालायचें नाही."

भाषाशुद्धीविषयी सावरकरांचा कटाक्ष असल्याने मला त्यांच्याशीं बोलतांना मोठी पंचाईत पडे. मी 'दवाखाना' म्हटलें की, ते म्हणायचे 'औषधालय' म्हण. एकदा 'जंगी बुक डेपो,' आणि 'डॉक्टर' असे शब्द मी उच्चारले. ते म्हणाले "प्रचंड पुस्तक भांडार, आणि वैद्य हे शब्द लक्षांत ठेव."

—अ. शं. जोशी, रत्नागिरी.

✦ ✦ ✦

## ६६. प्रचारक नाही, मीच येतों

स्वातंत्र्यवीर सावरकर १९२४ मध्ये रत्नागिरी शहरांत स्थानबद्धतेंत होते. पुढे त्यांच्यावरचा हा निर्बंध थोडा दूर होऊन रत्नागिरी जिल्ह्यांत फिरण्याची अनुज्ञा त्यांना मिळाली. त्यांनी फक्त राजकीय विषय सोडून भाषणें दिलीं तरी चालतील अशी सवलत सरकारने दिली होती. त्यांच्यावरील निर्बंध दूर होतांच आम्हा गव्हें ग्रामस्थांना आनंद झाला. गव्हे येथील आम्ही कांही मंडळींनी वीर सावरकरांना पुढीलप्रमाणे एक पत्र लिहिलें, "रत्नागिरीहून एखादा चांगला प्रचारक कार्यकर्ता इकडे आपण पाठवू शकाल का?"

आमच्या या पत्राला वीर सावरकरांनी विद्युत्संदेशाने उत्तर पाठवून लिहिलें की, "प्रचारक न पाठवितां स्वत: कार्याकरितां मीच येत आहे." तें झाल्यानंतर आमचे कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडले. श्री. गोखले यांनी सहभोजन ग्रामस्थांना घातलें. ब्राह्मण मंडळींनी आपल्याला मिळणारी दक्षिणा वीर सावरकरांच्या कार्याला दिली. या लहानशा गावांतून वीर सावरकरांच्या आगमनाने हिंदुसभेच्या कार्याला ५०० रुपये अगदी सहज मिळाले.

हर्णे-मुरुड या गावांत वीर सावरकरांचें 'अस्पृश्यता निवारण' या विषयावर वैयरत्नचूडामणि विनायकराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली, सडेतोड व बिनतोड असें भाषण झालें. त्यांच्या या भाषणाला गावांतले सर्व ब्रह्मवृंद उपस्थित होते. सभेनंतर वाद व चर्चा झाली. विनायकराव जोशी अखेर वीर सावरकरांना म्हणाले, "तुम्ही म्हणतां ती विचारसरणी आम्हांस पटते, परंतु आमच्याकडून चालत आलेली रूढि एकदम बदलण्याचें कार्य होणार नाही."

दापोली येथे वीर सावरकरांचें भाषण 'अफझुलखानाचा वध' या विषयावर झालें. या भाषणाचा त्यांचा वेग इतका जोरदार होता की, सरकारी कुशल लघुलेखकाला तें समग्र लिहून घेणें शक्य झालें नाही. दापोली मुक्कामात वीर सावरकरांना सरकारी वरिष्ठ व कनिष्ठ नोकर लोक भेटून जात.

—स. प. करंदीकर, गव्हें.

\+ \+ \+

## ६७. गोवंश हत्याविरोधी आंदोलन

वीर सावरकर रत्नागिरीला स्थानबद्धतेंत असतांना किर्लोस्कर मासिकांत लेख लिहीत. हिंदु जनतेच्या भोळ्या धार्मिक भावनेवर हल्ला करणारे ते



लेख असत. त्यांत त्यांनी हिंदु गायीला पवित्र मानतो, तिला गोमाता म्हणतो या गोष्टीवर कडाडून टीका केली होती. त्यांची प्रखर टीका वाचून असें वाटे की, बुद्धिवाद व भावना यांचें वांकडें आहे काय? वीर सावरकरांना भावना नाहीत काय? असाहि मला कधी कधी भ्रम पडे; परंतु त्यांच्या भारतभूमीवरचें अलोट प्रेम दर्शविणाऱ्या "सागरा प्राण तळमळला" या काव्यावरून अलोट भावना त्यांच्या अंत:करणांत आहे हें सत्य दृष्टीआड होत नसे. त्यांची समक्ष भेट घेऊन हा गायीचा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रसंग गायकवाडवाड्यांत १९३७ मध्ये ते रत्नागिरीच्या निर्बंधांतून मुक्त झाल्यावर आला. मी त्यांना म्हणालों, "आज अनंत कालापासून हिंदु हे गाईला ३३ कोटी देवांचें रूप मानीत आले आहेत. गाय ही इतर पशूसारखी ताकिक दृष्ट्या पशु असेल. पण असा राष्ट्रध्वज इतर कापडासारखे कापड असलें तरीही; आपण राष्ट्रध्वजाचें रक्षण करतों. त्या टिचभर फडक्यासाठी बलिदान काय करतोस असें कोणीहि तर्ककर्कश बुद्धिनिष्ठ आपणांस म्हणू शकणार नाही. त्याप्रमाणे गाय ही एक पशु असेल, परंतु तोच पशु हिंदु राष्ट्राचा मानबिंदु होऊन गोमाता बनला आहे. बाल शिवाजीने क्रूर कसायाचा हात कलम केलेला आहे, असें असतांना आपण हिंदु मनावर गाय ही केवळ पशु आहे असा आघात कां करता? माझें हें सर्व निवेदन ऐकून वीर सावरकर शांतपणें म्हणाले "मी लिहिलेले लेख अंधश्रद्धेवर आघात करण्याकरितां होते."

त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने याच दृष्टीने गोवंशहत्याविरोधी आंदोलन केलें, त्याला त्यांनी आपला आशीर्वाद पाठविला होता.

—न. गो. अभ्यंकर, पुणें.

\+ \+ \+

## ६८. इंडिया नव्हे, हिंदुस्थान

सुमारें १९३९ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयांत प्रा. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्यवीर सावरकरांचें 'जपान आणि हिंदुस्थान' या विषया-

वर इंग्रजीत भाषण झालें. इंग्रजीत भाषण चालू असतांना ते हिंदुस्थानचा निर्देश इंडिया म्हणून करीत नव्हते. त्यांच्या अगोदरच्या दोघा वक्त्यांनी व खुद्द अध्यक्ष महाजनींनी आपल्या इंग्रजी भाषणांत हिंदुस्थानाला इंडियाच म्हटलें. वीर सावरकर हे इंग्रजींत भाषण करून हिंदुस्थानला इंडिया म्हणत नाहीत ही त्यांची इंग्रजी भाषेतील फार मोठी गंभीर चूक विद्यार्थ्यांना वाटून एका विद्यार्थ्याने त्यांना प्रश्न केला की, आपलें "भाषण इंग्रजीमध्ये असतां आपण इंडिया हा शब्द कां वापरला नाही ?" वीर सावरकर म्हणाले, "हिंदुस्थान हा शब्द विशेषनाम आहे. तो कोणत्याहि भाषेंत हिंदुस्थानच राहणार. इंग्लंड, जर्मनी हीं नांवें, इतर भाषेंत बदलतात काय? मग हिंदुस्थान हें नांव कां बदलावें ? इंडिया हा शब्द अपभ्रष्ट असून परकीयांनी योजलेला आहे. तसेच हिंदूंचा देश तो हिंदुस्थान; इंडिया नव्हे."

—गो. वि. आठल्ये

* * *

## ६९. मातृभाषेचा अभिमान

(१) स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यास आले असतांना मी त्यांना माझ्या घरीं येण्याचें निमंत्रण केलें. त्याप्रमाणे ते आले. बंगल्याच्या फाटकांतून आंत प्रवेश करतांना फाटकावरील माझ्या नांवाच्या पाटीकडे त्यांचें लक्ष गेलें. ते क्षणभर थांबून मला म्हणाले, "अजून इंग्रजी पाटी का ? मराठी का नाही ?"

(२) वीर सावरकर आमच्या बंगल्यांत पाहुणचार घेत असतांना सौ. कुमुदिनी मोघे या शिक्षिका त्यांची स्वाक्षरी घेण्यास पुढे आल्या. सावरकर म्हणाले, "तुम्ही शाळेंत विद्यार्थ्यांना मराठी, हिन्दी शुद्ध शिकविता का नाही ? तें सांगत असाल तर मी स्वाक्षरी देतों."

(३) पुण्याचे महापौर भाऊसाहेब शिरोळे वीर सावरकरांना भेटावयास आले होते. सावरकरांनी त्यांच्या मुलाबाळांचें कुशल विचारलें. शिरोळे



उत्तर देतांना म्हणाले, "आता मी संततिनियमन केलें आहे." सावरकर म्हणाले, "आपल्यासारख्या सामर्थ्यवान् माणसाने संततिनियमन कशाला करायला पाहिजे ? तें काम दुबळ्यांचें !"

(४) १९५८ मध्यें माझी षष्ट्यब्दी झाली. त्या समारंभाचें वृत्त वीर सावरकरांनी केसरींत वाचलें. त्यांनी विलंब न करतां मला अभिनंदनपत्र लिहिण्यास घेतलें. माझा पुण्याचा पत्ता त्यांच्याजवळ नव्हता. अशा प्रसंगांत त्यांनी तें पत्र मला मिळावें म्हणून श्री. वासुदेवराव गोगटे यांच्या नांवावर लिहिलेलें आहे. तें वाचण्यासारखें आहे. ते आपल्या पत्रांत लिहितात :—

२४-६-१९५८

श्री. वासुदेवराव गोगटे, विधिज्ञ यांसी,

महाशय, आज केसरी चाळीत असतां सहज वाचनांत आलें की, श्री. गणेश महादेव उपाख्य अण्णाराव आपटे यांचा षष्ठ्यब्दी (पूर्ति) समारंभ रविवार दि. २२ जुलैला झाला. त्या बातमीने 'वाटलेलें समाधान व्यक्तवावें म्हणून पत्र लिहिण्यास बसलों. तों आठवलें की, त्यांचा पत्ता ठिकाणा मात्र माहीत नाही ! ! तरी पण तेवढ्यासाठी बेत लांबणीवर टाकावा तर पुन्हा तो योग न येण्याचाच संभव अधिक. म्हणून विचार करतां आठवलें की आपटे महाशयांची ओळख मला गोगटे महाशयांनी करून दिली. तर मग गोगट्यांनाच त्याचें प्रायश्चित्त देणें युक्त. यासाठी आपल्या पत्त्यावरून मी हें पत्र टाकीत आहे. संदेश की, :—श्री. अण्णाराव आपटे यांच्या वयाला साठ वर्षें पुरीं होऊन त्यांना ६१ वें वर्ष लागलें याविषयी मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करीत आहें. ज्या राष्ट्रांतील बहुसंख्य सामान्य जनांतच असामान्य कर्तृत्वशक्ति नि कर्तव्यबुद्धि विकसित झालेली असते तीं राष्ट्रेंच इतरांहून बहुधा बळकट, चिवट नि भरभराटलेली असतात. यास्तव श्री. अण्णारावांच्या कर्तृत्वाचें नि उद्योगशीलतेचें मला विशेष कौतुक वाटतें."

हा संदेश नि माझे नमस्कार त्यांना पोचवाल अशी आशा असलेला आपला आगाऊ आभार मानणारा

—वि. दा. सावरकर.

(५) स्वातंत्र्यवीर सावरकर दि. १४-१-१९६१ ला पुण्यास आले. पुणें स्थानकावरून तडक रात्रीं ९ च्या 'उत्तरक्रिया' या त्यांनी लिहिलेल्या नाटकाला उपस्थित राहिले. नाटकाच्या प्रारंभीच्या अंकाचा प्रवेश सुरू झाला. त्या प्रवेशांत एक वेडी 'पानपताचा सूड' असा आक्रोश करीत थोरल्या माधवरावांच्या दरबारांत प्रवेश करते. हा प्रवेश पाहतांना वीर सावरकरांच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहू लागले.

वीर सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेंत १९२४ मध्ये होते. त्याच वर्षी रत्नागिरींत प्लेग उद्भवल्याने ते तीन महिने नाशिक येथे सरकारच्या परवानगीने आले होते. ही संधि साधून येवल्याच्या राष्ट्रीय शाळेने त्यांना निमंत्रण केलें. त्याप्रमाणे ते येवल्यास आले. विद्यार्थ्यांनी त्यांची मोठ्या उत्साहाने मिरवणूक काढली. राष्ट्रीय शाळेचे मुख्याध्यापक कै. पां. वी. आपटे गुरुजींनी सावरकरांचा हात धरून त्यांना व्यासपीठावर नेलें. बाळू दातार या छोट्या विद्यार्थ्याने सावरकरांच्या गळ्यांत पुष्पहार घालून छोटेसें भाषण केलें. तो म्हणाला, 'आम्ही राष्ट्रीय शाळेची मुलें प्रेमाची, आदराची खूण म्हणून आपल्याला ही पुष्पकमळें अर्पण करीत आहोंत. मी असें ऐकलें आहे की, सावरकरांना शिरकमळें हवीं आहेत. देशाकरिता जें आम्हांस करतां येईल तें आम्ही करूं." हे त्या छोट्या विद्यार्थ्याचें भाषण ऐकतांच सावरकर गहिंवरून म्हणाले "अशीं मुलें पाहिलीं म्हणजे या वठलेल्या वेलीला नवी पालवी फुटूं लागली आहे हें पाहून समाधान वाटतें." असें म्हणून त्यांनी या विद्यार्थ्याच्या पाठीवर कौतुकाने हात फिरविला.

—ग. म. आपटे, इंजिनियर.

✦ ✦ ✦

## ७०. 'झिंदाबाद' नव्हे 'अमर रहे'

१९४९-५० सालची ही गोष्ट आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर कलकत्ता अधिवेशनाला निघाले होते. नागपूर स्थानकावर नागपूरकरांनी त्यांचें



स्वागत केलें. प्रचंड गर्दी जमली होती. त्यांना त्या गर्दीतून उतरून एका उंच व्यासपीठावर बसविलें. अनेकांनी त्यांना पुष्पमाला अर्पण करण्याकरिता आणल्या होत्या. मीहि स्वतः एक पुष्पहार आणला होता. त्यांना या रेटारेटींत पुष्पहार घालणें शक्य होईना. माझा प्रयत्न स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पाहिला. त्यांनी माझ्या हातांतील तुटकाच हार काढून घेतला आणि आपल्या गळ्यांत घालून घेतला. 'अखंड भारत झिंदाबाद' अशी मी घोषणा करतांच त्यांनी माझ्याकडे विशेष नेत्रकटाक्षाने पाहिलें. "काय चुकलं" असें मी विचारतांच "अखंड भारत अमर रहे" अशी घोषणा स्वतः वीर सावरकरांनी केली. आम्ही त्यांच्या घोषणेचें अनुकरण करून नागपूर स्थानक दणाणून सोडलें.

—हरि सीताराम करमरकर, नागपूर.

✦ ✦ ✦

## ७१. भारत सरकारच्या समितीकरिता लेख.

भारत सरकारने १९५३ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास लिहिण्यास एक समिति नेमली होती. त्यापैकी मराठी भाषी प्रदेशाच्या-वतीने या समितीवर महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांची नियुक्ति झाली. भारत सरकारच्या या समितीद्वारा सावरकरविषयक इतिहासाचे लेखक म्हणून माझी योजना झाली. या कार्यास अनुसरून स्वातंत्र्यवीर सावरकरांची मी १ जून १९५४ या दिवशीं त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. सुमारे २॥ तास त्यांच्याशीं या निमित्ताने चर्चा झाली.

अगदी कांही पूर्वपरिचय अशा दृष्टीने त्यांनी प्रेमपूर्वक माझें स्वागत केलें. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "तुम्हांला प्रवासाचा शीण आला असेल तर तुम्हांला चहा पाहिजे की ताक देऊं?" मी म्हणालों 'चहाच बरा." पांचसात मिनिटांत घरांतून मला चहा आला आणि त्याबरोबर हापूस

आंब्याच्या भरपूर फोडीहि माझ्यापुढें एका बशींत आल्या. चहा पीत असतांना सावरकरांनी मला विचारलें, "पुण्याचें तपमान काय आहे? तपमान हा शब्द एकदम माझ्या लक्षांत आला नाही. पण लगेच तपमान म्हणजे उष्णतामान इंग्रजींतील 'टेंपरेचर' हा शब्द माझ्या लक्षांत आला आणि "पुण्याचें तपमान मध्यम आहे." असें मी उत्तर दिलें. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भेटीला जाण्यापूर्वी सावरकरविषयक जे लेख मी भारत सरकारच्या समिती-करिता लिहिले होते त्यांच्या प्रती त्यांच्याकडे पाठविल्या होत्या. सावरकर मला म्हणाले, "तुम्ही माझ्या सार्वजनिक कार्याबद्दल जे लेख लिहिले आहेत ते वाचून मला अतिशय समाधान झालें. माझ्याविषयींच्या घटना जशाच्या तशा व त्याहि परिणामकारक रीतीने मांडल्या आहेत. तसेंच तुम्ही माझ्या काव्यरचनेचें एका लेखांत समीक्षण केलें आहे. तेंहि फार सहृदयतेने केलें आहे. यावरून तुम्ही या बाबतींत पुष्कळच परिश्रम करीत आहांत." त्यांच्या या प्रशंसोद्‌गारांनी मला धन्यता वाटली. नंतर सावरकर म्हणाले, "तुम्ही भारतसरकारच्या समितीकरिता हें लेखन करीत आहांत खरें; पण तुमच्या या साहित्याचा उपयोग सरकारकडून जो शेवटीं इतिहास प्रसिद्ध होणार आहे तो निःपक्षपातीपणाने नि पूर्वग्रहरहित लिहिला जाणार आहे काय?" मी म्हणालों, "सरकारने या कामाकरिता नेमलेल्या समितींत नामांकित इतिहाससंशोधक आणि प्रथितयश इतिहासज्ञ आहेत. आपण भारताच्या स्वातंत्र्याकरिता जें महत्कार्य केलें आहे तें इतिहासांत ठळकपणें नमूद केलें जाणार आहे. शक्य तीं सर्व साधनें एकत्रित करून सत्य घटनां-वर आधारित असा इतिहास लिहिण्याचें काम चालू आहे.

## ७२. आवेशाने बोलणें

माझ्याकडून प्रास्ताविक खुलासा झाल्यानंतर वीर सावरकर पुढे जवळ जवळ २॥ तास भारतीय राजकारणावर तल्लीन होऊन बोलत होते. या प्रसंगीं त्यांचें प्रभावी व्यक्तिमत्त्व मला दिसलें, तें सर्वांना सांगण्यासारखें आहे. त्यांचें वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षांत पदार्पण झालें होतें. भयंकर मानसिक यातना नि अनन्वित शारीरिक हालअपेष्टा यांनी त्यांचा देह जर्जर झालेला दिसत होता. तरी पण त्यांची अंगकांति अद्यापिहि तेजःपुंज दिसत होती.



शरीरांत विजेसारखें चापल्य भासमान होत होतें. पण या सर्वांपेक्षाहि त्यांचे भेदक, शोधक नि तेजस्वी डोळे आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्व हें प्रत्येकावर विलक्षण छाप पाडणारें असेंच होतें. आपल्या आयुष्यांतील ज्या घटनांचें भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यांत विशेष महत्त्व आहे त्यावर ते जोर देत होते. या घटनांचा इतिहास सांगतांना ते खुर्चीवर बसले होते. जणू कांही त्यांच्या सभेला नेहमींच लोटत असलेल्या अफाट जनसागरापुढें ते बोलत आहेत असें वाटे. विचारांची सडेतोड, तर्कशुद्ध मांडणी आणि भावनाशीलता यांचा आश्चर्यकारक संयोग हें त्यांच्या भाषणाचें वैशिष्ट्य दिसून आलें. मधून ते आवेशाने खुर्चीवरून उठून उभे राहत. या आवेशयुक्त भाषणाने त्यांना इतका थकवा येई की ते मटकन खुर्चीवर बसत! हें त्यांचें बोलणें कधी कधी इतकें क्षीण खोल स्वरांत होई की, मला तें नीट ऐकूंहि येत नसे! मग जरा वेळ बोलणें बंद होई आणि मग पुन्हा आवेशयुक्त होऊन बोलूं लागत. अंती हा अखंड भारत कसा खंडित झाला याचें हृदयद्रावक वर्णन करतांना सावरकरांच्या डोळ्यांत अश्रु आले.

## ७३. क्रिप्स काय म्हणाले ?

सन १९४२ सालीं सर स्टॅफर्ड क्रिप्स व वीर सावरकर यांच्या वाटाघाटी झाल्या. त्यांचा उल्लेख करून ते म्हणाले, "क्रिप्स यांनी माझ्यापुढे दोन मुद्दे निर्माण केले. (१) इंडियन युनियन निर्माण करणें. (२) या युनियनमधून फुटून जाण्याची कोणत्याहि घटक राज्याला मुभा असणें. यांपैकीं पहिला मुद्दा मान्य झाला. दुसरा मुद्दा मला सर्वस्वी अमान्य होता. मी स्टॅफर्डना म्हणालों, "हिंदुस्थान हें आधीच मुळी एक संयुक्त संघराष्ट्र आहे. हिंदूंना तर सांस्कृतिक दृष्ट्या पितृभू व पुण्यभू म्हणून हिंदुस्थान हें एक अखंड, अविभाज्य राष्ट्र आहे असा दृढ विश्वास आहे. परंतु ही सांस्कृ-तिक दृष्टि बाजूला ठेवली तरी सुद्धा आतापर्यंत ब्रिटिश सरकारने राजकीय दृष्टीने व राज्यकारभाराच्या दृष्टीने हिंदुस्थानचें अखंडत्व मान्य केलें आहे. कारण या सर्व हिंदुस्थानची एकच इंडियन आर्मी, एकच इंडियन नेव्ही, सरकारहि एकच म्हणजे इंडियन गव्हर्नमेंट आहे व सोईकरिता त्याचे अनेक प्रांत पाडलेले आहेत. 'स्वयंनिर्णय' या गोड नांवाखाली प्रांतांना फुटून

जाण्याचा हक्क देणें म्हणजे पाकिस्तानच्या निर्मितीलाच मान्यता देणें होय. परंतु स्टेट म्हणून हिंदुस्थानचें अखंडत्व एकदा सिद्ध झाल्यानंतर असा स्वयंनिर्णयाचा हक्क त्या हिंदुस्थान देशाच्या एका भागाला म्हणजे एक तुकडा पाडून त्या तुकड्याला देतां येणार नाही. स्वयंनिर्णयाचा हक्क द्यावयाचा असेल तर तो संबंध देशालाच द्यावयाचा असतो. ब्रिटिश साम्राज्यांतून फुटून जाण्याचा हा स्वयंनिर्णयाचा सर्व देशाला हक्क आहे. एका देशांतल्या एखाद्या प्रांताला फुटून जाण्याचा हक्क म्हणजे स्वयंनिर्णय हक्क नव्हे" असें सांगून वीर सावरकर मला म्हणाले, "माझ्या बिनतोड युक्तिवादानें क्रिप्ससाहेब अगदी निरुत्तर झाले."

## ७४. स्वातंत्र्य मिळाल्याचें श्रेय सर्वांनाच आहे.

स्वातंत्र्याच्या श्रेयासंबंधी ते मला म्हणाले, "एखाद्या कार्याच्या यशाचें सगळें श्रेय आपल्याकडेच ओढून घेण्यासाठी इतरांशीं भांडत बसणाऱ्या माणसाबद्दल मला आश्चर्य वाटतें. स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सारे-सारेच झटले आहेत. देशाला ज्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिलें त्यांत ज्ञात नि अज्ञात, क्रांतिकारक, अन्य राजकीय पुढारी आणि त्यांचे अनुयायी यांचाच केवळ समावेश होतो असें नव्हे, तर देशाच्या स्वातंत्र्याकरिता ज्यांनी घरांत राहूनहि परमेश्वराची प्रार्थना केली त्यांनाहि स्वातंत्र्यप्राप्तीचें श्रेय आहे. एखाद्या महान् प्रयत्नाचें यश हें कधीहि एकांगी नसतें. त्या यशाचा उगम बहुविध चळवळींत असतो. आपल्यांतले कांही लोक म्हणतात की, 'हें स्वातंत्र्य आपल्याला रक्त सांडल्याशिवाय म्हणजे केवळ अहिंसा मार्गानें मिळालें आहे.' ठीक आहे!!! कांही लोकांच्या अंगांतल्या कपड्यांवर रक्ताचे थेंब कधीहि सांडले नसतील! पण ज्यांनी युद्धाच्या आघाडीवर जाऊन आपलें रक्त सांडलें, जे मोडले पण वांकले नाहींत, आणि अंती संग्रामांत ज्यांनी मृत्युहि पत्करला अशा शेकडो वीरांना आपण विसरणार काय? या वीरांच्या देहपतनामुळे त्यांच्या मागून येणाऱ्यांचा मार्ग बराच संकटरहित नि निष्कंटक झाला. अशा मार्गावरून येणाऱ्यांना मात्र हा विजय सुलभ झाला. आणि हे जगांत स्वातंत्र्यवीर म्हणून गाजले. पण मागाहून येणाऱ्यांचीच आपणाला स्मृति रहावी, आणि मग त्या संग्रामाच्या आघाडीवर पूर्वीच



गेलेल्या शूर बहाद्दरांच्या आठवणी आपण ठेवणार नाही काय? ज्या कोवळ्या मुलांनी, ज्या युवकांनी, ज्या क्रांतिवीरांनी आपले देह फांसावर अर्पण केले, आणि देशबांधवांकरिता आपल्या जीवनाची आहुति दिली त्या हुतात्म्यांचें काय? त्यांचें हें मरण व्यर्थच झालें काय? अंतिम विजय हा कांही अहिंसेने मिळविला नाही. तर तो विजय तेव्हाच मिळाला की, ज्या वेळीं क्रांतीच्या भावनेने प्रेरित झालेली आणि देशभक्तीने उचंबळलेली भारतांतील सारी सेना जागृत झाली, आणि ज्या वेळीं महान् ध्येयाच्या सिद्धीसाठी मोठ्या उत्साहानें सज्ज झालेल्या भारतीय सैनिकांनी ब्रिटिशसत्तेच्या विरुद्ध रास बिहारी घोष आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड आंदोलनाचा झेंडा उभारला!

## ७५. सैन्यांतील राजनिष्ठा लोपली तर!

सैनिकीकरणासंबंधाने ते मला म्हणाले, "कांही भारतीय पुढारी बोलत असत की 'सावरकर हे ब्रिटिशांचे रिक्रूटिंग ऑफिसर आहेत.' पण त्यांचें हें बोलणें दिशाभूल करणारें होतें. आमच्या सैनिकीकरणाचें खरें मर्म नि रहस्य मुसलमान समाज नि ब्रिटिश सरकार यांच्याच लक्षांत चांगलें आलें होतें. ते पुरतेपणीं जाणून होते की, भारतीय सैन्यांतील राजनिष्ठा लोपली तर त्यांना हिंदुस्थानावर राज्य चालविणें कठीण होईल आणि मग फार काळ ब्रिटिशांची सत्ता टिकविणें अशक्य होईल."

## ७६. सुभाषबाबूंनाहि मान्य झालें.

सुभाषचंद्र बोस यांच्याशीं जें सावरकर बोलले तें सांगतांना ते मला म्हणाले, "स्वातंत्र्याचा हा लढा यशस्वी होण्यासाठी, दोनतीन गोष्टी तावडतोब करणें अवश्य आहे. एक ही की भारताच्या सैन्यदलांत आपण आपले राजकीय स्वातंत्र्याचे विचार प्रसृत केले पाहिजेत. दुसरें या सैन्यदलात अधिकाधिक सैनिक सामील होतील याविषयी सर्व देशभर प्रचार केला पाहिजे आणि मग अशा या सशस्त्र नि सुसज्ज सैनिकांच्या द्वारा हिंदुस्थानच्या बाहेरूनच ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव केला पाहिजे. क्रांतीच्या भावनेने प्रेरित झालेला असा एकेक सैनिक इतर अनेक सैनिकांना आपलेसे करील. तुम्ही

हिंदुस्थानच्या बाहेर जाऊन अशी सेना उभारण्यास प्रारंभ करा, आणि आम्ही आतून भारतीय सैन्यांत असा कांही राजकीय प्रचार करूं की त्यामुळे सर्वत्र ब्रिटिश साम्राज्यसत्तेविषयी बेदिली निर्माण होईल आणि कालांतराने त्यांतील बरेचसे सैनिक तुम्हांस येऊन मिळतील, आणि बाकीचे सैनिक तुम्ही हिंदुस्थानांत याल त्या वेळीं तुमचें स्वागत करून तुमच्या सध्येच सामील होण्याकरिता तुमची उत्सुकतेने वाट पाहतील." असें सांगून ते पुढे सुभाषबाबूंना म्हणाले, "हिंदुस्थानच्या बाहेर जाऊन स्वातंत्र्यसैनिकांची उभारणी करण्याची पात्रता व सामर्थ्य सांप्रत भारतांत सुभाषबाबू, मला तुमच्याशिवाय कोणाहि अन्य पुढाऱ्यांत दिसत नाही. सैनिकीकरणाविषयी मी जो वेळोवेळीं जोर देत आलों आहें, त्यामागे माझा राजकीय हेतु नि विश्वास हाच की अखंड हिंदुस्थानला स्वातंत्र्य नि खरें सामर्थ्य याच मार्गानें प्राप्त होईल" असें सांगून सावरकर पुढे मला म्हणाले, "माझ्या या सूचनेचा सुभाषबाबूंवर एवढा प्रभाव पडला की त्यांनी ती सूचना तत्काळ मान्य केली.

## ७७. हिंदुसंघटन आणि हिंदुसभा.

हिंदुसभेच्या कार्यासंबंधी खुलासा करतांना ते मला म्हणाले, "कोणी मला असें विचारतात की, तुम्ही राजकीय नि सामाजिक सुधारणेचें कार्य करीत होता तें बाजूला सारून १९३७ सालापासून हिंदुसंघटन आणि हिंदुसभा हीं कार्यें कां सुरू केलीं ? त्याला माझें उत्तर असें की, मी तरुणवयांत संपूर्ण स्वातंत्र्यसंपादनाची शपथ घेतली ही एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट म्हणजे रत्नागिरींत स्थानबद्ध असतांना १९३७ सालापर्यंत केलेलें कार्य व कार्यवाहींत आणलेल्या सुधारणा या दोन्हीहि गोष्टींचा हिंदुसंघटन नि हिंदुसभा यांच्या कार्याशीं निकटचा संबंध आहे किंवा पहिल्या दोन चळवळींचा स्वाभाविक परिपाक म्हणजेच हिंदुसभेची चळवळ होय. भारताच्या स्वातंत्र्य-प्राप्तीचा विचार करतांना राजकीय कार्य नि सामाजिक सुधारणा आणि हिंदुसंघटन या तिन्ही गोष्टी मी एकमेकांपासून अलग समजत नाही. लंडन, अंदमान नि रत्नागिरी या ठिकाणीं केलेलीं कार्यें जितकीं आवश्यक नि महत्त्वाचीं होतीं, तितकाच महत्त्वाचा नि आवश्यक असा हिंदुसभेचा कार्यक्रम होता. रत्नागिरीला सामाजिक कार्य करीत असतांनाहि माझ्या घराची



झडती पोलिसांनी कितीक वेळां घेतली आणि राजकीय चळवळींत मी भाग घेतो या संशयावरून मला ब्रिटिश सरकारने अनेक वेळां अडचणींत आणलें."

## ७८. अत्याचारी नव्हे, शस्त्राचारी

स्वातंत्र्यवीर सावरकर मला म्हणाले, "कोणी समजतात क्रांतिकारक हे मार्थेफिरू आहेत. ठीक आहे! त्यांना, 'माथें' होतें म्हणून तर तें फिरलें असेंच मी म्हणेन. क्रांतिकारक हे अत्याचारी होते हा समजहि खोटा आहे. क्रांतिकारक हे शस्त्राचारी होते. शस्त्राचार म्हणजे अत्याचार नव्हे." समारोप करतांना ते अखेर मला म्हणाले, "तुम्हांला भारताच्या स्वातंत्र्याचा माझ्याशीं संबंध येणारा इतिहास लिहीत असतांना कांही माहिती अधिक हवी असल्यास मी तुम्हांला अवश्य पुरवीन." आणखीहि बोलणें चालू राहिलें असतें परंतु सावरकरांची मुलगी साडेचारा वाजता बैठकीचे खोलीत डोकावून गेली, तिने सावरकरांना आंत येण्याबद्दल सुचविलें. तेव्हा सावरकरांनी घड्याळाकडे पाहिलें, "इतका वेळ झाला काय ?" भेट दिल्याबद्दल माझा आनंद व कृतज्ञता व्यक्त करून मी बाहेर पडलों.

—अ. ग. करंबीकर, वार्शी

◆ ◆ ◆

## ७९. औषधें मात्र न चुकतां घतात

१९४४ मध्ये दिल्लीला अखंड भारत परिषद भरली होती. या परिषदेचे प्रमुख सूत्रधार स्वातंत्र्यवीर सावरकर होते. त्यांच्याबरोबर महाराष्ट्रांतून बरेच प्रतिनिधि निघाले. त्यामध्ये बाबासाहेब खापर्डे, शेठ गुलाबचंद इत्यादि मंडळी होती. पहिल्या वर्गांतील एक पुढारी वेळेवर येऊ न शकल्याने मला त्यांची जागा मिळाली आणि माझा वीर सावरकरांच्या बरोबर प्रवास झाला. प्रवासांत सावरकर सारखे विचारांत गढलेले होते. मध्येच चर्चा करीत अस-

तांना त्यांनी आपली उशी आणि उशीचा अभ्रा यामध्ये हात घालून पांच पंचवीस इंग्रजी, मराठी, गुजराथी वृत्तपत्रांतील कात्रणें काढलीं. तीं कात्रणें जुळविण्यांत आणि नंतर वाचण्यांत ते गढून गेले. वाचनाच्या विचारात असतांना कांही वेळा ते क्रुद्ध झाल्यासारखे दिसत. त्यांच्या गोरटेपणाच्या मुखावरील भाव त्यांच्या अंतःकरणांतले विचार स्पष्ट करीत. एखादे वेळीं त्यांचे डोळे बारीक होत. विचारांची दाहकता झाली म्हणजे क्षणभर बाहेर पाहत आणि अशा वेळीं त्यांच्या कपाळावरील शिरा थडथडत आहेत असें वाटे. पुन्हा ते निग्रहाने कागद पाहत आणि शांत होत. त्यांच्या भोवती उत्तमोत्तम फळें होतीं, पण त्याकडे त्यांचें लक्ष नव्हतें. अधून मधून वेळेचा अंदाज घेत. बंगमधील औषधें मात्र न चुकतां स्वतःच घेत. दुपारीं एक कप चहा, पावाचा तुकडा, एक अंडें एवढाच त्यांचा आहार दिसला.

## ८०. डोळे मिटून स्वस्थ बसले

सवाई माधवपूर या स्थानकावर आमची गाडी थांबली. या गांवाला सवाई माधवपूर हें नांव कां पडलें ही माहिती सांगत असतां आमच्या डब्यांत एक भलें दांडगें वानर शिरलें. आमच्या सभोवती विविध फळें पडलेलीं होतीं. त्यांतला एक केळ्यांचा मोठा घड त्या वानराने झटकन पळविला. शेजारच्या झाडावर तसेच लहान मोठे वानर बसले होते. त्यांनी या वानराने पळविलेला केळ्यांचा घड पाहिल्याबरोबर त्याच्यावर हल्ला केला. स्थानकाच्या फलाटावर त्या सर्व वानरांत मारामारी जुंपली. त्या मोठ्या वानराची मादी त्याच्या मदतीला आली. एकमेकांचें रक्त निघावें इतकी मारामारी जुंपली. त्या वानराने केळ्यांचा घोट एका वानराच्या पाठींत असा हाणला की, तो वानर झाडावरून खाली पडला. त्या घडाचीं सर्व केळीं बाकीच्या वानरांनी पळविलीं. मी त्याला आणखी चार केळीं डब्यांतून टाकून वीर सावरकरांना म्हणालों "तात्या, पाहिलंत हें. पळविलेल्या केळ्यांवर स्वतःचा अधिकार मानून जिवापाड झगडणारीं हीं वानरं पाहून आश्चर्य वाटतं." वीर सावरकर किंचित् रागावलेल्या स्वरांत म्हणाले, " आश्चर्य कसलं ? माकडांना जें समजतं, तें माणसांना समजलं तरी पुष्कळ होईल." त्यांच्या या बोलण्याचा अर्थ मला उमगला नाही. मी त्यांच्याकडे न समजलेल्या दृष्टीने पाहिलें. तेव्हा



सावरकर म्हणाले, "वानर हे माणसाचे पूर्वज असें डार्विन म्हणतो. कदाचित् पाश्चात्त्यांच्या बाबतींत तें खरं असेल. पण हिंदूंच्या बाबतीत हा सिद्धान्त लागू पडत नाही. पळविलेल्या चार केळ्यांसाठी ही दोन वानरं एवढी भांडली, पण हिंदुस्थानची हजारो मैलांची भूमि फुकटांत लुटणाऱ्या मुसलमानांबरोबर भांडायला हिंदूंची तयारी नाही." एवढें म्हणून सावरकर डोळे मिटून मागे टेकून बसले.

## ८१. हिरवा रंग मुसलमानांची मिरास नव्हे.

मथुरेच्या स्थानकावर गोरे लठ्ठसे एक युरोपियन गृहस्थ आमच्या डब्यांत शिरले. गाडी सुरू झाल्यावर ते गृहस्थ वीर सावरकरांशीं बोलण्याच्या विचारांत दिसले. सावरकरांच्या गळ्याभोवती हिरव्या रंगाचा मफलर गुंडाळलेला होता. ते गृहस्थ सावरकरांना म्हणाले, " तुम्ही मुसलमानांचा द्वेष करतां, तर हिरव्या रंगाचा मफलर कां वापरतां ?" वीर सावरकर त्या गृहस्थांना सौम्य शब्दांत उत्तर देतांना म्हणाले, "त्या झाडांकडे पहा. तीं हिरवीं आहेत. त्या गवताकडे पहा, तें हिरवें आहे. हिरवा रंग ही काय मुसलमानांचीच मिरास आहे काय ?"

—एक सावरकरभक्त

* * *

## ८२. त्यांना शिवाजी पचायचा नाही !

मी १९२६ मध्ये लोकमान्य टिळक जन्मतिथीच्या व्याख्यानासाठी रत्नागिरीस गेलों होतों. त्या वेळीं वीर सावरकर रत्नागिरीत होते. मी माझे मित्र श्री. आर. आर. बापट यांच्या समवेत त्यांना भेटावयास गेलों. समर्थ विद्यालय, इतिहाससंशोधक मंडळ, केसरी, सह्याद्रि मासिक, शिवचरित्र इत्यादि विषयांसंबंधी त्यांच्याशी आमचें बोलणें झालें. त्या वेळची चर्चा तपशिलाने

याता स्मरत नाही. परंतु शिवछत्रपतींविषयी बोलतांना वीर सावरकर म्हणाले, " लोक शिवाजीच्या इतिहासाचें संशोधन करतील, समारंभ करतील, पण त्यांना शिवाजी पचायचा नाही. "

—वि. वि. काळे, पुणें.

◆ ◆ ◆

## ८३. क्रांतिकारक भेटला नाही.

१९३४ साली आमच्या मासिकाचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा संबंध जुळून आला. त्या वेळीं सावरकर हे रत्नागिरीत स्थानबद्ध होते. त्यांच्या-कडून आपल्या मासिकासाठी लेख मिळू शकतील तर मोठा लाभ होईल या कल्पनेने मी १९३४ मध्ये मुद्दाम रत्नागिरीस जाऊन त्यांची भेट घेतली. ते मला म्हणाले, " तुम्ही विलायतेला गेला होता ना? मग आमचे कांही क्रांति-कारक मित्र तुम्हाला तेथे भेटले होते काय ? " मी म्हणालों, " माझा राज-कारणाशीं पूर्वीपासून संबंध आला नाही. मी माझ्या व्यवसायानिमित्त विला-यतेला जाऊन आलों. मला क्रांतिकारकांपैकी कोणी भेटलें नाही. " यानंतर मी आमच्या मासिकाविषयी सांगून बुद्धिवादी विचारसरणीचे लेख लिहिण्याची त्यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली.

## ८४. विचारांनी आणि शब्दांनी प्रभावित होत असूं.

वीर सावरकरांच्या लेखाची हस्तलिखितें वाचणें म्हणजे खरोखरच आमची एका बाजूने सत्वपरीक्षा होती. कसल्या तरी मळक्या, पाठकोऱ्या कागदावर कसल्या तरी शाईने ते लेख लिहिलेले असत. त्यातच ठिकठिकाणीं काकणदें खोडून ज्यादा शब्द आणि मजकूर लिहिलेला असे. असें असलें तरी साव-करांचे विचारच मुळांत इतके तेजस्वी असत की, त्यामुळे त्यांच्या अनुसंधानाने त्यांच्या शब्दांची संगति बरोबर लागत असे. ज्या दिवशीं टपालांतून साव-



करांचा लेख यायचा त्या दिवशीं आम्ही संपादक मंडळी त्या लेखाचें मोठ्याने वाचन करीत असूं आणि वाचतांना त्यांतल्या विचारांनी आणि शब्दांनी प्रभावित होत असूं.

—शं. वा. किर्लोस्कर, पुणें.

◆ ◆ ◆

## ८५. शस्त्र नाही, म्हणून निःशस्त्र आहोंत.

भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनाची योजना करण्याकरिता केसरी सभागृहांत १९३८ साली वीर सावरकरांच्या उपस्थितीत बैठक झाली. हें आंदोलन चिरडावें म्हणून निजामाचा आटोकाट प्रयत्न होता व हें आंदोलन असफल व्हावें म्हणून कांग्रेसवाले धडपडत होते. निजाम – राज्यात प्रवेश करणें अवघड व धोक्याचें होतें. निजाम – राज्यांत प्रवेश करावा यावर सर्वजण खल करीत होते. मी म्हणालों, " आगगाडीच्या निरनिराळ्या डब्यांत वेष पालटून प्रतिकारकांनी बसावें. विविध मार्गांनी इच्छित स्थानीं सर्वांनी एकत्र यावें. तबले, डग्गे, गाद्या व उशातून पत्रकें आंत न्यावींत. " माझ्या या सूचनेला कांही मंडळींचा सत्याग्रह व सत्याग्रही या तत्त्वाला धरून बराच विरोध झाला. हा मार्ग कपटनीतीचा आहे असें सर्वांना वाटून बैठकीत चर्चेचा गोंधळ उडाला. तेवढ्यांत स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, " ज्या सूचना श्री. कुलकर्णी करीत आहेत त्याच खरोखर निःशस्त्र प्रतिकाराच्या द्योतक आहेत. सत्याग्रहाच्या भ्रांत समजुतीने आपणाला त्या किरकोळ, अशिष्ट व निरर्थक वाटत असतील; पण खऱ्या अर्थाने त्या परिणामकारक व उपयुक्त आहेत. शस्त्र हातीं नाही म्हणूनच आम्ही निःशस्त्र आहोंत. आम्ही शस्त्राचे, शक्तीचे उपासक आहोत आणि म्हणूनच या सत्याग्रहाला निःशस्त्र असें नांव दिलें आहे. तसेंच प्रतिकार म्हणजे विरोध. तो ज्या मार्गांनी व ज्या पद्धतीने परिणामकारक करतां येईल त्या मार्गांनी केला पाहिजे. " वीर सावरकरांच्या

या सूचनेमुळे प्रतिकारक निजामींत पोचू शकले आणि त्यामुळें निःशस्त्र प्रतिकार प्रभावी व सफल झाला.

## ८६. हिंदुस्थानी भाषावाद्यांचा पराभव

प्रांत हिंदुस्थानी भाषावाद्यांचा १९४० सालीं पुण्यांत पराभव झाला. पुढे १९४२ सालीं अ. भा. हिंदी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनास आम्ही निघालों. वाटेंत मुंबईला वीर सावरकरांच्या दर्शनालाहि गेलों. ते आम्हांला म्हणाले, " आपण फार मोठें कार्य करीत आहांत. राष्ट्रभाषा, राष्ट्रलिपी, राष्ट्रधर्म, राष्ट्रइतिहास, राष्ट्रीय आचार व विचार यांच्या संवर्धनांतच खरें राष्ट्रीयत्व आहे. राष्ट्रभाषा हें राष्ट्रीयतेचें एक लक्षण आहे. या लक्षणाचें पोषण संस्कृतनिष्ठेनेच होणार. संस्कृतनिष्ठ हिंदी हीच खरी आमची राष्ट्रभाषा आहे."

डिसेंबर १९४७ मध्ये मुंबई येथे अ. भा. हिंदी साहित्य संमेलनाचें अधिवेशन पं. राहुल सांकृत्यायन यांचे अध्यक्षतेखाली भरलें होतें. चार दिवसांच्या कालावधींत बराच काळ बाबू पुरुषोत्तमदास टंडन यांच्या सहवासांत मला राहावें लागलें. हिंदींविषयीं सावरकरांच्या भूमिकेबद्दल बोलतांना टंडन बाबूंनी मला विचारलें, " मला सावरकर भेटतील का ? " त्यांच्या इच्छेप्रमाणें मी सावरकरांना समक्ष जाऊन विचारलें. त्यांनी मोठ्या आनंदानें अनुज्ञा दिली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीं भेट निश्चित झाली. सुमारें दोन तास ' हिंदुत्व ' या विषयावर या दोघांची चर्चा झाली. शेवटीं टंडनबाबूजी सावरकरांचा निरोप घेतांना म्हणाले, " हिंदुत्वाचें विशाल नि शुद्ध दर्शन घडविलेंत याविषयीं आपला मी कृतज्ञ आहें."

—म. बु. कुलकर्णी, पुणें.

* * *



## ८७. ओडवायरचा खून

आमचा मुक्काम दि. १४-३-१९४० ला नंदुरबार येथे होता. स्वातंत्र्यवीर सावरकर तेथल्या हरिजन विद्यालयाला भेट देण्यासाठी सकाळीं ९ च्या सुमारास गेले. विद्यालयाच्या आवारापाशीच कोणीतरी त्यांना ताजें वर्तमानपत्र आणून दिलें. त्या वर्तमानपत्रांत उधमसिंगानें सर मायकेल ओडवायरचा खून केल्याची बातमी होती. ती बातमी वीर सावरकर वाचीत असतांना मी त्यांच्या अगदी जवळच होतों. ते त्या बातमीबद्दल तोंडाने एक शब्दहि बोलले नाहीत. परंतु त्यांच्या चर्येवर समाधानाची झाक स्पष्टपणें उमटलेली होती. किंचित काल ते अगदी स्वस्थ आणि निःशब्द राहिले. त्यानंतर त्या विषयाबद्दल मी कांही बोलण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी खुणेनेच म्हणजे तोंडासमोर बोट ठेवून मला गप्प राहण्यास सांगितलें. भारतावर तेव्हा इंग्रजांचें राज्य होतें. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यावरचे निर्बंध नुकतेच निघालेले होते. सोबत दहा पंधरा माणसें होतीं. त्यांच्या देखत ओडवायरच्या खुनाची चर्चा करणें सुरक्षितपणाचें नव्हतें हें माझ्या लक्षांत आलें. ही बातमी वाचल्याबरोबर जी समाधानाची ऊर्मि त्या वेळीं त्यांच्या चर्येवर उमटली ती लपविणें त्यांनाहि अशक्य होतें.

— त्र्यंबक व्यंकटेश कुलकर्णी, पुणें.

* * *

## ८८. तात्याराव केळकरांपासून आरंभ करा.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा ६१ वा वाढदिवस दि. २८ मे १९४३ या दिवशीं पुण्यांत थाटाने साजरा झाला. श्री. अण्णाराव भोपटकर यांचे घरीं त्याच दिवशीं वीर सावरकरांना थाटाची मेजवानी देण्यांत आली. अण्णाराव भोपटकर स्वतः पंक्तींत येऊन पक्वान्नाचा आग्रह करीत होते. श्री. तात्याराव केळकर यांस ते पक्वान्नाचा आग्रह करूं लागले. केळकर म्हणाले,

" आजचे मुख्य पाहुणे सावरकर आहेत. त्यांचा समाचार घेणें हेंच अधिक उचित." त्याप्रमाणे अण्णाराव सावरकरांना आग्रह करूं लागले. सावरकर म्हणाले, " मी आज मुख्य पाहुणा खरा, पण आपणा सर्वांना तात्याराव गुरुस्थानीं आहेत. तेव्हा आग्रह करावयाचा असेल तर त्याचा प्रारंभ त्यांच्यापासून झाला पाहिजे."

## ८९. न जेवतां तसेच पुण्यास आले.

दि. १४-१०-१९४७ रोजीं श्री. तात्याराव केळकर निवर्तल्याची वार्ता समजल्याबरोबर वीर सावरकर यांना अतिशय दुःख झालें. त्यांचें स्नान-भोजन वगैरे सर्व व्हावयाचें होतें. पण तो विचार मनांत न आणतां केळकरांचें अंत्य-दर्शन व्हावें म्हणून सावरकरांनी तडक स्टेशन गाठलें व पुण्यास आले. पुणें शहरावर दुःखाची दाट छाया पसरली होती. केळकरांच्या शवयात्रेस अफाट गर्दी लोटली. मिरवणूक महाराष्ट्र मंडळावरून जात असतांनाच वीर सावर-कर त्या ठिकाणीं आले. मिरवणूक किंचित् काळ थांबविली. सावरकरांनी त्यांच्या शवास पुष्पहार घातला. सावरकरांना गहिंवरून आले व नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. ते या यात्रेबरोबर कांही अंतर चालले. पण त्यांची प्रकृति लक्षांत घेऊन त्यांना गायकवाडवाड्यांत पोहोचविण्यांत आलें. केळकरांच्या मृत्यूनें त्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला दिसत होता. सकाळपासून त्यांनी कांहीच खाल्लें नसल्यामुळे ते फारच थकून गेलेले दिसले. सावरकरांनी कांही खावें, चहा इत्यादि घ्यावें असा आग्रह त्यांना करावा लागला. त्यांचे चहा इत्यादि पदार्थ घेण्यांत अजिबात चित्त नव्हतें. सायंकाळीं ओंकारेश्वर स्मशानभूमींत दुःखित जनतेसमोर वीर सावरकरांचें झालेलें भाषण हृदयस्पर्शी होतें.

—ना. बा. केळकर, पुणें.

* * *



## ९०. व्रताचरणामुळे शत्रूचा फायदा होऊं नये.

दि. २७ मे १९४७ रोजीं पुणें येथे लोकशाही स्वराज्य पक्ष स्त्रीशाखेच्या वतीने डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली वीर सावरकरांचा सत्कार करण्यांत आला. त्या वेळीं उत्तरादाखल केलेल्या भाषणांत सावरकर स्त्रियांना म्हणाले, " स्त्रियांना आता मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. तेव्हा हिंदुहितास जो हटकून जपेल त्यासच स्त्रियांनी आपलीं मतें देऊन निवडून आणावें. तसेंच धार्मिक व्रतें, वैकल्यें स्त्रिया मोठ्या आस्थेने व निष्ठेने करीत असतात; तथापि ज्या व्रताचरणामुळे आपलें नुकसान होण्याचा अत्यल्पहि संभव वाटला व मुख्यतः आपला शत्रु प्रबळ होण्याची यत्किंचित् जर शंका आली तर अशीं व्रतें वैकल्यें स्त्रियांनी कधीहि करूं नयेत."

—सौ. लक्ष्मीबाई केळकर, पुणें.

* * *

## ९१. ही सर्वोत्तम गोष्ट आहे.

१९४३ सालीं स्वातंत्र्यवीर सावरकरांची षष्ट्यब्दी पुण्यांत साजरी झाली. या गर्दीतच आम्ही नाशिकच्या भगिनी त्यांना भेटलों. मला पाहतांच ते म्हणाले, "तुम्ही माझ्या वडील बंधूंच्या सांगण्यावरून हिंदुमहासभेचें काम करतां असें समजलें. तुमचे वडील कै. बाबाराव खरे हे थोर देशभक्त होते. त्यांच्या मागें आपण नाशिकच्या सार्वजनिक क्षेत्रांत आणि विशेषतः हिंदु-सभेचें प्रचार काम करतां ही सर्वोत्तम गोष्ट आहे." त्यांनी माझ्या वडि-लांची स्मृति देऊन मला उत्तेजन दिल्याने मला अतिशय आनंद वाटला.

## ९२. बालमित्रांचीं घरें पाहून चौकशी करीत.

१९५३ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे हस्तें अभिनव भारत या संस्थेच्या इमारतीचें उद्घाटन झालें. त्यानंतर त्यांनी नाशिक शहरांतून

मिरवणूक काढली होती. ही मिरवणूक अपूर्व होती. विशेषतः वीर सावरकर या मिरवणुकीत पायीं चालत होते. त्यांची प्रकृति क्षीण व कृश दिसत होती. परंतु त्यांचा उत्साह, हास्य, उत्सुकता हीं मनोवेधक होतीं. ज्या भागांतून त्यांची मिरवणूक जात होती त्या भागांत त्यांच्या बालमित्रांची घरें होतीं. त्यांना त्या वेळच्या आठवणी येऊन ते मध्येंच थांबून सभोवतीच्या सहकाऱ्यांजवळ बालमित्रांची चौकशी करीत आणि त्या वेळच्या हकिगती सांगू लागत.

## ९३. हुतात्मा देशपांडे

माझ्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्यवीर सावरकरांचें भाषण नाशिकच्या विजयानंद थिएटरांत झालें. हें थिएटर म्हणजे हुतात्मा कान्हेरे यांचे स्मृति-स्मारक आहे. कलेक्टर जॅक्सन यांचा वध कान्हेरेने या थिएटरांत केला होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सत्कार सुरू झाला. ते पहिला पुष्पहार स्वीकारण्यापूर्वी एकदम उठून उभे राहिले. आम्हा कार्यकर्त्यांना कांहीं लक्षांत येईना. त्यांनी मागच्या रांगेंतील श्रीमती देशपांडेबाई यांना समोर बोलावून घेतलें. त्यांना तो पहिला पुष्पहार घालून त्यांची ओळख करून देतांना सावरकर म्हणाले, "या सत्काराचा पहिला मान त्यांचा आहे. जॅक्सनच्या वधांतील हुतात्मा देशपांडे यांच्या या वीरपत्नी आहेत."

—गोखुभाई खरे, नाशिक.

* * *

## ९४. माझ्या कार्याचा गौरव केला.

१९३७ मध्ये मी मध्यप्रदेशाचा मुख्यमंत्री झालों. कांहीं जप्त वाङ्मयावरची मी बंदी उठविली. त्यांत वीर सावरकरलिखित कांहीं वाङ्मय होतें. त्याचबरोबर प्रशाला व महाविद्यालयांतून रायफल् क्लब काढण्याचा व तरुणांना नेमबाजीचें शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला. पहिला



रायफल क्लब वर्धा येथील ऑंडांक प्रशालेंत सुरू केला. माझा उपक्रम ऐकून वीर सावरकरांना अतिशय आनंद झाला. त्यांची माझी समक्ष भेट झालेली नव्हती. त्यांनी मला पत्र पाठवून या माझ्या कार्याचा गौरव केला.

## ९५. आमच्या हृदयाचे मुख्य प्रधान

१९३८ मध्ये माझी मुख्यमंत्रिपदावरून पदच्युति झाली. त्याचबरोबर कॉंग्रेसमधूनहि हकालपट्टी झाली. त्यानंतर लोकरथ धंतोली येथील पटवर्धन मैदानावर हिंदुमहासभेचें वार्षिक अधिवेशन झालें. या अधिवेशनाचे अध्यक्ष वीर सावरकर होते. या अधिवेशनाला मी सहज प्रेक्षक म्हणून गेलों. वीर सावरकरांनी मला पाहतांच आपल्याजवळ बोलावून व्यास-पीठावर बसविलें आणि सर्वांश्रोत्यांकडे पहात म्हणाले " हे आमच्या हृदयाचे मुख्य प्रधान आहेत."

## ९६. सावरकरांच्या अत्याग्रहामुळे अध्यक्ष झालों.

१९४९ मध्ये श्री न. चि. केळकर, त्यावेळचे केसरीचे संपादक यांच्या ५१ च्या वाढदिवस समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें मला निमंत्रण आलें. तें काम उरकून परत नागपूरला जातांना मी मुंबईस वीर सावरकरांची भेट घेतली. या वेळेस त्यांनी माझ्याकडून खरे प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली. ती माहिती ऐकल्यानंतर त्यांनी मला अत्यंत प्रेमाने व आपुलकीने अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाची धुरा उचलण्याचा आग्रह केला. माझ्या वृद्धावस्थेंतहि हें पद ग्रहण करण्यास सावरकरांच्या अत्याग्रहामुळे मी कबूल झालों.

## ९७. भोपटकर येतील, तेव्हाच मिरवणूक निघेल.

१९४९ च्या डिसेंबरमध्ये कलकत्ता येथे माझ्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचें अधिवेशन भरलें. त्याचे उद्घाटक म्हणून वीर सावरकरहि आले होते. कलकत्त्याच्या कार्यकर्त्यांनी माजी अध्यक्ष भोपटकर, नवीन अध्यक्ष मी आणि उद्घाटक वीर सावरकर यांची एका भव्य रथांतून मिरवणूक

काढण्याचें ठरविलें. स्थानकावर प्रचंड गर्दी झाली. स्थानकांतून बाहेर पडतांना जी धकाबुकी झाली, त्यांत भोपटकर कुठेतरी मागे राहिले. वीर सावरकर आणि मी रथांत बसलों आणि कार्यकर्ते रथ चालू करावयाला लागले. सावरकरांनी त्या कार्यकर्त्यांना बजावलें की, कितीहि वेळ लागो, भोपटकर आल्याशिवाय मिरवणूक निघणार नाही. अखेरीस भोपटकर आले तेव्हांच मिरवणूक सुरू झाली.

—डॉ. ना. भा. खरे, नागपूर.

* * *

## ९८. क्रांतिकारकांचें एक महत्त्वाचें सूत्र

फर्ग्युसन महाविद्यालयांत शिकत असतांना क्रांतिकारक संघटनांशीं माझा संबंध आलेला होता. त्या वेळच्या आम्हा तरुणांची ध्येयमूर्ति रत्नागिरींत स्थानबद्धतेंत असलेले स्वातंत्र्यवीर सावरकर ही होती. विलायतेंतील त्यांच्या एका छायाचित्राच्या १०० प्रति करून आम्ही फर्ग्युसन महाविद्यालयांत वाटलेल्या होत्या. सरकारनें जप्त केलेलें क्रांतिकारक वाङ्मय मिळवून तेंहि वाचण्याचा व्यासंग लागलेला होता. अशा या मनाच्या प्रेरक अवस्थेमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचें रानडेकृत चरित्र मी इंग्रजी पांचवींत असतानांच वाचून त्यापासून स्फूर्ति घेतलेली होती. फर्ग्युसनकॉलेजमध्येच असतांना त्यांना समक्ष भेटण्यासाठी आपण रत्नागिरीला जावें असा विचार त्या वेळीं मनांत आला आणि म्हणून तावडतोब एकटेंच रत्नागिरीस जाण्याचें मी ठरविलें. तो काळ जून १९३० चा असावा. पुण्याहून निघून थेट रत्नागिरीस गेलों. त्यांची नि माझी कसलीहि ओळख नव्हती. मात्र त्यांचे बंधु बाबाराव सावरकर यांची ओळख होती. वीर सावरकर हे रत्नागिरीस श्री. पटवर्धन यांच्या घरांत राहत होते. त्या घरावर सतत भगवा ध्वज फडकवीत ठेवलेला असे. ज्या घरावर तुम्हाला भगवा ध्वज दिसेल तें सावरकरांचें घर अशी



खूण मला माझ्या मित्रानें सांगितलेली होती. भगवा ध्वज दिसला त्या घरांत मी सरळ आंत गेलों. वीर सावरकर गादीवर बसले होते. विचारपूस केल्यावर त्यांनी विचारलें 'तू कुठे उतरलास?' मी म्हटलें 'माझी येथे कोणीहि ओळखीचें नाही. मी तुमच्या इथेंच उतरणार आहे. बाबांची नि माझी ओळख आहे" त्यांनी विचारलें "सामान कोठें आहे." मी म्हटलें "ही काय माझी लहानशी पिशवी. त्यांत एक धोतर नि लंगोट आहे." आश्चर्य असें की, त्यांनी मला त्यांच्या येथेंच उतरण्याची परवानगी दिली. मी पोहोंचलों ती वेळ संध्याकाळची होती. रात्रीं त्यांच्याबरोबर जेवलों. थोड्याशा गप्पागोष्टी झाल्यानंतर मी झोपलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ९ च्या सुमारास स्नान वगैरे आटोपल्यानंतर त्यांनी मला आंतल्या खोलींत बोलाविलें. त्या ठिकाणीं स्वतः सावरकर, त्यांचे जवळच डॉ. म. ग. शिंदे नि वामनराव चव्हाण अशी मंडळी बसली होती. मी त्यांना विचारलें "आम्ही तरुण विद्यार्थ्यांनीं देशाच्या स्वातंत्र्यासाठी काय करावें ?" सावरकर उत्तर देतांना म्हणाले, "प्रथम आपण कोण व्हायचें तें ध्येय तुम्ही निश्चित करा. केसरीच्या संपादकासारखे संपादक व्हायचें का लेखक व्हायचें का वक्ता व्हायचें, की राजगुरु भगतसिंग यांच्याप्रमाणे हुतात्मा व्हायचें ? शंभर संपादक किंवा व्याख्याते किंवा काँग्रेसचीं १० अधिवेशनें यांनी जी राजकीय जागृति होत नाही, ती राजगुरु भगतसिंगांच्या हौतात्म्यानें होते. त्यांचा त्याग कधींहि वाया जात नाहीं. आणि मला विचाराल तर बापू गेनूच्या हौतात्म्यापेक्षा राजगुरु भगतसिंगाचें आक्रमक हौतात्म्य हेंच राष्ट्राला उपकारक अशी जागृति आणतें. मारितां मारितां मरावें ही समर्थांची हौतात्म्यामागील भूमिका महाराष्ट्रानें तरी विसरू नये." मी मध्येंच पुन्हा विचारलें, "एखाद्या इंग्रज गव्हर्नर माणसावर गोळी झाडून काय होणार?" सावरकर म्हणाले, "ज्या कारणासाठी तुम्ही गोळी झाडतां तें कारण जर योग्य असेल तर त्याचाहि उपयोग होतो. उदाहरणार्थ, चाफेकर बंधूंनी ज्या प्लेग कमिशनरचा वध केला त्याचा परिणाम ब्रिटिश राज्यसत्तेनें धडा घेण्याइतका निश्चित झाला. शिवाय आम्हा क्रांतिकारकांचें एक सूत्रवाक्य आहे. "Every English man who is bad enough to rule India is bad enough to be killed."

जो जो इंग्रज मनुष्य हिंदुस्थानवर राज्य करण्याइतका पापी आहे तो तो इंग्रज मनुष्य भारतीयांकडून वधार्ह आहे" त्यानंतर सोलापूरमध्ये झालेल्या मार्शल लॉच्या संबंधानें सहज कांही बोलणें झालें. मी म्हणालों, "हत्यारें कोठून मिळवावयाचीं ?" सावरकर चटकन म्हणाले, "इच्छा असेल तर मार्ग सापडतो. मातींतून सुद्धा हत्यारें मिळतील. गोव्याला शस्त्रबंदीचा कायदा नाही. हिंदुस्थानांतहि पिस्तुलें मिळूं शकतात. फक्त तसा प्रयत्न हवा. अशा गोष्टी या कोणी कोणाला सांगून होत नसतात. ज्याच्या अंगात हिंमत नसेल त्याच्या सावरकर जरी पाया पडले तरी त्याच्या हातून अशा गोष्टी होणार नाहीत. आणि ज्याच्या मनाला क्रांतिकारकांचा मार्ग पटला असेल व ज्याच्या मनाची तयारी झाली असेल त्याला सावरकर नको म्हणाले तरी तो आपला निश्चय पार पाडल्याशिवाय राहणार नाही. तें रक्तच इतकें तापावें लागतें आणि तें स्वयंस्फूर्तीनें तापतें. कोणी कोणाला सांगून आणि उपदेश करून अशा गोष्टी घडत नसतात." एवढा संवाद झाल्यानंतर दुपारी मी त्यांच्याबरोबर जेवण केलें आणि परत रत्नागिरीहून पुण्यास जाण्यास निघालों.

—वासुदेव बळवंत गोगटे, पुणें

* * *

## ९९. उंच व सरळ तट कसा चढलों.

१९३८ मध्यें वीर सावरकर बडोद्याला वाङ्मय परिषदेचे अध्यक्ष म्हणून आले होते. भोजन समारंभानंतर गप्पागोष्टी, थट्टाविनोद चालू असतांना मी सावरकरांना म्हणालों, "आपण कांही आम्हाला सांगावें." सावरकर म्हणाले, "वाङ्मय परिषदेचा अध्यक्ष या नात्यानें मला जें सांगावयाचें होतें तें अगोदरच सांगितलें आहे." मी म्हणालों, "तसें नव्हे, तुमच्या आयुष्यांतील संस्मरणीय प्रसंगांचे व त्यांतल्या त्यांत तुम्ही मार्सेलिसला बोटीवरून समुद्रांत उडी मारली त्या प्रसंगाचें वर्णन प्रत्यक्ष तुमच्या तोंडून ऐकण्याची इच्छा आहे." सावरकरांनी मोकळेपणानें आम्हांस त्या प्रसंगाचें वर्णन ऐकविलें. त्यांची सांगावयाची शैली इतकी साधी व परिणामकारक



होती की, प्रत्येकास असें वाटत होतें की, आपण जणू काय सावरकरांबरोबर त्या प्रसंगांतून जातों आहोंत. त्यांनी हकीगत सांगितल्यावर मी म्हणालों, "तुम्ही इतके दमले असतां त्या सरळ तटावरून कसें चढून गेलांत ?" सावरकर म्हणाले, "आमच्या अभिनव भारत संस्थेंत तटावर चढण्याचें थोडेसें शिक्षण दिलें जात होतें, परंतु त्या वेळीं मी एवढा उंच व सरळ तट कसा चढलों हें माझें मलाच सांगतां येत नाही. जीवनमरणाचा प्रश्न असल्यामुळ मी चढलों खरा ! इतकेंच काय पण पुन्हां असा चढूं शकेन की नाही हें सांगता येत नाही. प्रत्येकाच्या आयुष्यांत अशा कांही गोष्टी वेळेनुसार घडतात की मागाहून आपलें आपल्यालाच त्याचें आश्चर्य वाटतें."

—न. का. घारपुरे, पुणें.

* * *

## १००. अंडें घेण्याचा सल्ला दिला.

स्वातंत्र्यवीर सावरकर १९४६ मध्यें वालचंदनगर येथे खूप आजारी होते. तेथे त्यांना थोडें बरें वाटल्यावर वालचंद शेटजींनी पुण्यास आपल्या चतुःशृंगीजवळील बंगल्यांत त्यांना आणून ठेविलें. सावरकरांना औषधोपचार करण्याची संधि मला मिळाली. सुमारें एक महिन्यानंतर त्यांना चांगलें बरें वाटूं लागलें. फक्त अशक्तपणा होता. त्यांची शक्ति वाढावी म्हणून मी त्यांना रोज एक अंडें घेण्याचा सल्ला दिला. अंडें नाकारतांना ते मला म्हणाले, "मी ज्यांच्या घरीं राहात आहे, त्या ठिकाणीं हा आहार मी घेतल्यास त्यांच्या भावना दुखावतील."

## १०१. मिशन हाच शब्द कायम ठेवा.

मी लष्करी नोकरींतून परत आल्यावर "ज्ञानेश्वर तुकाराम मिशन" या नांवाची एक सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रांत काम करणारी संस्था

काढण्याचें ठरविलें. ज्ञानेश्वर तुकाराम या शब्दांपुढे मिशन हा शब्द अनेकांना खटकू लागला. त्याच वेळी वीर सावरकरांना औषधोपचार करण्याकरितां मी त्यांच्याकडे वारंवार जात असे. त्यांना मी माझी ही अडचण सांगितली. कांही वेळ विचार करून ते म्हणाले, "मिशन हाच शब्द कायम ठेवा. चिकाटी, त्याग, कार्याचें सातत्य, सेवा, ध्येय इतके अर्थ समावेश करणारा मिशन हा शब्द आहे. हा शब्दच कायम ठेवा. त्याला पर्यायी दुसरा मराठी शब्द नाही." त्यांच्या सूचनेनुसार मी तोच शब्द माझ्या संस्थेला कायम केला. माझ्या त्या संस्थेचे पहिले पेट्रन त्यांनाच केलें. त्यांनी पेट्रन या शब्दाला 'पोषक' हा शब्द सुचविला तो शब्द मी वापरतों.

## १०२. सांगाल त्याप्रमाणे वागेन.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना औषधोपचार करणें मोठेंच जबाबदारीचें काम होतें. ते न्युमोनियांतून नुकतेच बरे होत होते. अशक्तपणा अतोनात होता. पहिल्या दिवशीं त्यांची संपूर्ण तपासणी केली आणि औषधयोजना केली. पहिल्या दोन दिवसांतच मला आढळून आलें की, सावरकर हे एक आदर्श रुग्ण आहेत. आम्ही डॉक्टर रोग्याला तपासल्यावर उपचाराची एक दिशा (Line of treatment) ठरवीत असतों. कांही रोगी किंवा त्यांचे हितचिंतक डॉक्टरला अनेक गोष्टी सुचवीत असतात. परंतु सावरकरांनी मला प्रथम सांगितलें की, तुमच्यावर पूर्ण भरंवसा ठेवूनच मी तुम्हांला बोलावलें आहे आणि तुम्ही सांगाल त्याप्रमाणे मी वागेन. त्याप्रमाणें मी दिलेलीं औषधें, पथ्यपाणी हें सारें त्यांनी कसोशीने पाळलें. चालू असलेल्या चिकित्सेंत त्यांनी कधीहि व्यत्यय आणला नाही. ते दीड महिन्यांत पूर्ण बरे झाले.

— नारायण गंगाधर चाफेकर, पुणें,

* * *



## १०३. चाफेकरांनी हार घालावयाचा नाही.

१९३७ मध्ये वीर सावरकर रत्नागिरीच्या स्थानबद्धतेंतून मुक्त झाल्या-वर पुण्यास आले. पुणें स्थानकापासून त्यांची प्रचंड मिरवणूक निघाली. ती मिरवणूक आमच्या वर्गावरून गायकवाडवाड्याकडे निघाली. त्यांची मोटार माझ्या वर्गापाशीं येतांच मी त्यांच्या गळ्यांत पुष्पहार घालूं लागलों. वीर सावरकर म्हणाले, 'आपलें उपनांव काय?' मी म्हणालों, 'चाफेकर.' तें ऐकतांच सावरकर उभे राहून म्हणाले, "नाही, चाफेकरांनी सावरकरांना हार घालायचा नाही; तर सावरकरांनी चाफेकरांना हार घातला पाहिजे. कारण आमच्या कार्याची स्फूर्ति आम्ही चाफेकरांपासून घेतली आहे" असें म्हणून स्वतःच्या गळ्यांतला पुष्पहार काढून तो त्यांनी माझ्या गळ्यांत घातला.

## १०४. एकशेदोन ताप असतांना व्याख्यान

त्याच सायंकाळीं वीर सावरकरांचें प्रकट व्याख्यान शिवाजी आखाड्यांत होतें. त्या दिवशीं त्यांच्या अंगात १०२ पर्यंत ताप होता. माझे बंधु डॉक्टर चाफेकर यांनी त्यांची प्रकृति तपासून आज व्याख्यानाची दगदग न घेतां विश्रांति घ्यावी असें सांगितलें. सावरकर म्हणाले, "ब्रिटिशांच्या कारागृहांत मी क्षयरोगाने तिळ तिळ झिजलों. ज्यांच्याकरितां हा देह झिजविला ते लोक लाखोंच्या संख्येने व्याख्यान ऐकण्यास येतील. त्यांना मी निराश कर-णार नाही. त्यांची सेवा करतांना माझी प्रकृति जास्त बिघडली तरी हरकत नाही. या स्थितींत त्यांनी एक तासभर व्याख्यान दिलें. अति उत्कृष्ट असें त्यांचें व्याख्यान झालें.

—शंकर गंगाधर चाफेकर, पुणें.

* * *

## १०५. पंचगव्याऐवजी तुळशीपत्र वापरावें.

मी महाराष्ट्रांत शुद्धीचें कार्य निष्ठेने करतों ही गोष्ट रत्नागिरींत वीर सावरकर असतां त्यांच्या कानीं गेली होती. त्यांना बाहेर जाण्यास प्रतिबंध

असल्यानें त्यांना भेटण्यास पुष्कळ प्रमुख लोक रत्नागिरीस जात. सावरकर कांहींना मुद्दाम बोलावूनहि घेत. मलाहि गणेशोत्सवांत व्याख्यानाच्या निमित्तानें व इतर कांही प्रसंगीं बोलावून त्यांनीं विचारविनिमय केला. त्यांत माझा नवीनच तयार केलेला शुद्धिविधि समग्र वाचून त्यांनी सूचना केल्या. त्यांत पंचगव्याऐवजी तुळशीपत्राची सूचना मला फार महत्त्वाची वाटली. ते सूचना करतांना म्हणाले, "पंचगव्यांत गाईचें शेण व गोमूत्र मिसळलेलें असतें. ते पदार्थ सवयीनें आपणांस अयोग्य वाटत नसले तरी शुद्धीच्या निमित्तानें ज्या परधर्मीयांशीं आपला संबंध येणार आहे त्यांना तितकेसे योग्य वाटणार नाहीत. याकरितां तुळशीपत्र घेऊन पंचगव्याचें काम करावें." त्यांच्या या सूचनेचा मी प्रसंगीं उपयोगहि केला.

—सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणें.

✦ ✦ ✦

## १०६. आपलें नातें चोरून ठेवीत

दि. १ फेब्रुवारी १९४३ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर शिरढोण येथील स्वातंत्र्यशाहीर 'वासुदेव बळवंत फडके' यांच्या स्मारकाचें दर्शन घेण्यास आले होते. वाटेंत माझ्या गांवीं पळस्पें येथें त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या वेळीं वीर सावरकरांशीं गांवांतील कांही प्रतिष्ठित ग्रामस्थांचा परिचय करून देण्यांत आला. ग्रामस्थ कै. गोपाळराव फाटक यांनी स्वतःची ओळख करून देतांना म्हटलें, "मी वासुदेव बळवंत यांचा नातजावई आहे." यानंतर वीर सावरकरांचें भाषण झालें. ते म्हणाले, "आतां काळ किती बदलला पहा. आज आपण वासुदेव बळवंताच्या नांवाचा प्रकट जयजयकार करीत आहांत. त्यांच्याशीं लांबलांबचें नातें जोडण्यांत आज धन्यता वाटू लागली आहे. आपण वासुदेव बळवंतांचे वंशज आहोंत हें सांगणें अभिमानास्पद आहे यांत संकोच नाही. पण ज्या वेळीं फडके हे प्रत्यक्ष क्रांतीचें कार्य करीत होते, त्या वेळीं त्यांचे जवळचे आप्तसुद्धा आपलें नातें चोरून ठेवीत होते.

—के. कृ. जायडेकर

✦ ✦ ✦



## १०७. अस्पृश्यता प्रथम घालवा

१९३८ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर चाळिसगांव येथें बलराम व्यायाम मंदिराच्या सैनिकी शिक्षक वर्गाचा समारोप करण्याकरितां आले होते. तेथील हरिजनांनी त्यांना सत्कार केला. त्या सभेंत हरिजन चिटणिसांनी भाषण करतांना म्हटलें, "स्पृश्य समाजाची सहानुभूतिशून्य वर्तणूक हा अस्पृश्यता निवारण्याच्या मार्गांतील धोंड आहे." नंतर वीर सावरकर उत्तरादाखल भाषण करण्यास उठले. प्रथम त्यांनी एका भंग्याकडून पाण्याचा पेला भरून आणून तो मेजावर ठेवून ते सभेला म्हणाले, "हरिजनांपैकी कोणीहि पुढे येऊन या पेल्यांतील पाणी प्यावें." कोणीहि पुढें आलें नाही. सावरकर स्वतः तें पाणी प्याले आणि म्हणाले, "स्पृश्य समाजांतील व्यक्तींबद्दल उगाच ओरड कां करतां? मी हें पाणी भंग्याचे हातचें प्यालों म्हणून जोगळेकर मला वाळींत टाकणार नाहीत. ते माझ्या पंक्तीला बसूनच जेवतील. अस्पृश्य जमाती अनेक आहेत. त्यांतील अस्पृश्यता प्रथम घालवा. स्पृश्य समाज तुम्हाला जवळ करील, मदतहि करील."

## १०८. केवळ धर्मांत आणून काम पुरें होत नाही.

चाळिसगांवापासून ४ मैलांवर कोलगांव येथें कांही शुद्धीकृत राहतात असें कळतांच वीर सावरकरांनी स्थानिक खाजगी पाहुणचाराचे समारंभ रद्द करून ते तडक कोलगांवी गेले. तेथील आदिवासी व अस्पृश्य ख्रिस्ती झाले होते. त्यानंतर त्यांना शुद्ध करून पुन्हा हिंदु जमातींत घेण्यांत आलें होतें. त्या सर्व लोकांना सावरकर भेटले, धीर दिला. हिंदुधर्माचें महत्त्व त्यांना सांगितलें. या सर्व शुद्धीकृतांना त्यांच्या आगतानें संतोष वाटला. वीर सावरकर मला म्हणाले, "या लोकांची आपण नेहमी विचारपूस केली पाहिजे. केवळ धर्मांत आणून काम भागत नाही."

## १०९. इतिहास जगवला पाहिजे.

भागलपूर येथील हिंदुसभेच्या अधिवेशनावर बिहार सरकारनें बंदी घातली. ही बंदी मोडून अधिवेशन भरविण्याचा प्रयत्न अपूर्व लढ्यांत झाला. आम्ही अनेक कार्यकर्ते तुरुंगांत टाकले गेलों. त्याठिकाणीं बॅ. एन्. सी. चटर्जी यांनी

"भागलपूरचा लढा' हा निबंध २४ तासांत लिहून द्यावा. प्रथम क्रमांकास ५० रु. बक्षीस दिलें जाईल असें प्रकट केलें. मी आजारी असतांना हा निबंध लिहिला आणि मला पहिल्या क्रमांकाचें बक्षीस मिळालें. पुढे या निबंधाची हकीकत वीर सावरकरांना कळली. त्यांनी मला पत्र लिहिलें. ते म्हणतात, "हा निबंध विस्तारपूर्वक पुस्तकरूपाने लिहा. या लढ्यांतील आपला विजय इतिहासांत नोंद झाला पाहिजे. इतिहास जगविला पाहिजे." त्यांनी दिलेल्या या प्रोत्साहनाने मी सविस्तर पुस्तक लिहिलें.

—प्रों. के. जोगळेकर, चाळिसगाव.

* * *

## ११०. खून नव्हे, वध म्हणा !

१९५२मध्ये अभिनव भारत सांगता समारंभात लो.टिळक स्मारक मंदिरांत क्रांतिकारकांच्या कार्याबद्दल माहिती सांगणारें छायाचित्रांचे प्रदर्शन भरविलें होतें. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. प्रदर्शन पहातांना कोणी तरी एक प्रेक्षक एका चित्राकडे बोट दाखवून म्हणाला, "हा पहा रँडचा खून." वीर सावरकरांच्या कानांवर खून हा शब्द जातांच ते त्या व्यक्तीकडे वळून म्हणाले, "क्रांतिकारकांनी कोणाचेहि खून केलेले नाहीत. वध म्हणा. शब्दाला फार महत्त्व असतें."

## १११. भगतसिंगांची वृद्ध माता

१८५७ च्या शताब्दी निमित्ताने दिल्लीच्या रामलीला मैदानावर वीर सावरकरांचें १९५७ मध्ये भाषण झालें. या सभेला प्रचंड गर्दी होती. स्वातंत्र्य कोणी मिळविलें या मुद्द्यावर वीर सावरकर बोलतांना भाषणांत म्हणाले, "कुणी म्हणतात स्वातंत्र्य आम्ही मिळविलें. इतकें खोटें बोलू नका. सर्वांच्या संघर्षाचें तें फळ आहे. या उपरहि हें स्वातंत्र्य कोणी मिळविलें याचें तुम्हांला उत्तर पाहिजेच असेल तर व्यासपीठाच्या एका बाजूला बोट दाखवून ते पुढे म्हणाले, "तें या मातेला, विचारा" माता म्हणजे हुतात्मा भगतसिंगांची वृद्ध माता होती.



## ११२. दयानंदांची खरी स्मृति जिवंत राहूं द्या

१८५७ च्या शताब्दी समारंभाला वीर सावरकर १९५७ मध्ये दिल्लीला आले असतांना आर्य समाजाने त्यांचें स्वागत केलें. सावरकर उत्तरादाखल भाषणांत म्हणाले, "हे दयानंद भवन केवळ एक समाधि म्हणून उभं पाहात आहे. आज दयानंदांचें कार्य कुठे आहे? हिंदुत्वाचा प्रचार नाही, राष्ट्रीय प्रखरता नाही आणि शुद्धीहि नाही. शुद्धीचें कार्य फार महत्त्वाचें आहे. दयानंदांचें खरें कार्य मी करतों. मी त्यांचा वारसदार आहे. आर्यसमाज आज राज्यकर्त्यांच्या इच्छेनुसार वागूं पहात आहे. दयानंदांचें थोर कार्य सोडून आर्यसमाज जिवंत राहू पहात असेल तर तें धडाचें अस्तित्व ठरेल. तत्त्वावर अडळ रहा आणि दयानंदांची खरी स्मृति जिवंत राहूं द्या."

## ११३. क्यों रोकते हो ?

१९५७ मध्ये दिल्लीला वीर सावरकरांनी सर्व लहानमोठ्या कार्यकर्त्यांना जनपद विश्रांतिगृहांत चहापानास निमंत्रित केलें होतें. सावरकर प्रत्येकाची ओळख करून घेऊं लागले. त्यांची प्रकृति अशक्त आहे हें लक्षांत घेऊन महंत दिग्विजयनाथ सावरकरांना म्हणाले, "बस बस रहने दो. जादा तकलीफ मत लेना." वीर सावरकर म्हणाले, "अरे बोलने दो ना. बोलता नही तो बोलता नहीं कहते है. बोलता हूं तो क्यू रोकते हो !" सावरकरांच्या या हिन्दी प्रत्युत्तराने खूपच हंशा पिकला.

## ११४. ढाली–तलवारी सरहद्दीकडे पाठवा.

मुंबई महानगरपालिकेने वीर सावरकरांच्या ७५ व्या वाढदिवशी अमृतमहोत्सवाच्या निमित्त त्यांचा सन्मान केला. त्या प्रसंगीं नागपूर अमृत महोत्सव समितीच्या वतीनें त्यांना 'सुरसेविनी सिंधु नदी'चें स्तोत्र असलेली चांदीची ढाल अर्पण करण्यांत आली. त्या ढालीकडे पाहात सावरकर म्हणाले, "या ढाली-तलवारी मला कशाला ? त्या सरहद्दीकडे पाठवा. तिकडे त्यांची गरज आहे."

—क. मु. तांबेकर, नागपूर.

* * *

## ११५. सिंह अध्यक्ष कसा होणार ?

१९३७ च्या मे मध्ये कूपर मंत्रिमंडळाने वीर सावरकर यांच्यावरील स्थानबद्धतेचे निर्बंध काढून टाकल्यावर ते प्रथम पुणें येथें आले. त्यावेळीं पुणें नगरपालिकेने त्यांना मानपत्र समर्पण केले. मानपत्राच्या या सभेंत मानपत्र समर्पणाच्या समारंभानंतर उत्तराचें भाषण करण्यास सावरकर उभे राहिले. पुण्यांतील हें त्यांचें पहिलेंच भाषण असल्याने श्रोते अत्यंत उत्सुकतेने हें भाषण ऐकत होते. मुख्य व्यासपीठाच्या मागे छत्रपति शिवाजी महाराज यांचें तैलचित्र मध्ये आणि दोन्ही बाजूस नामदार गोखले व लोकमान्य टिळक यांचीं तैलचित्रें होतीं. भाषणास प्रारंभ करतांना छत्रपतींच्या तैलचित्राकडे अंगुलिनिर्देश करून सावरकर म्हणाले — " अखिल हिंदुस्थानांत ' राष्ट्रीय नगरपालिका ' हें नांव सार्थपणें केवळ पुण्याच्याच नगरपालिकेला शोभतें. राष्ट्रीय याचा अर्थ केवळ राष्ट्रीय विचारांचीच नव्हे, तर अखिल हिंदुस्थान हें एक नगर व तिची एकमेव नगरपालिका — कारण या नगरपालिकेचे पहिले नागरिक छत्रपति शिवाजी महाराज हे होत. छत्रपतींच्या एका बाजूला नामदार गोखल्यांचें तैलचित्र आहे. ते थोर पुढारी व देशभक्त होते. क्वचित् आमचा त्यांचा मतभेद असला तरी देशभक्तींत ते कांकणभरहि कमी नव्हते. साहजिकच ते या नगरपालिकेचे सभासदहि होते व अध्यक्षहि होते. छत्रपतींच्या दुसऱ्या बाजूला असलेले लोकमान्य टिळक हे अर्वाचीन काळचे सर्वांत थोर देशभक्त. प्रयत्नांत शिवाजी महाराजांहून यत्किंचितहि कमी नाहीत. त्यांच्या प्रयत्नांना यश आलें नसलें, तर तो दोष त्यांचा नसून तुमच्या आमच्यासारख्या नालायक अनुयायांचा होय. तेहि या नगरपालिकेचे सभासदहि होते व अध्यक्षहि होते. "

सावरकरांना मध्येच अडवून त्या वेळचे नगराध्यक्ष म्हणाले, " लोकमान्य टिळक या नगरपालिकेचे अध्यक्ष नव्हते. फक्त सभासद होते. "

चटदिशी वीर सावरकर उत्तरले, " अध्यक्ष महाशय सांगतात की लोकमान्य या नगरपालिकेचे अध्यक्ष नव्हते, केवळ सभासद होते. बरोबरच आहे. मेंढरांच्या कळपाचा सिंह कसा अध्यक्ष होणार ? ते सभासद होते हा तुमचा सन्मान व अध्यक्ष नव्हते हा त्यांचा सन्मान." स्वातंत्र्यवीर



सावरकर यांच्या समयसूचक उत्तराने आनंदित झालेलें तें सभागृह दीर्घकालपर्यंत प्रचंड टाळ्यांनी निनादित झालें.

—रा. स. भट

✦ ✦ ✦

## ११६. बंदुका उलट्या चालवाव्या.

आम्ही गेल्या महायुद्धाच्या वेळीं सैनिकीकरण मंडळ स्थापन केलें. मंडळाच्या वतीने सैन्यांत भरती होण्याचा आम्ही प्रचार करीत असू. या कार्याला उठाव मिळावा म्हणून आम्ही वीर सावरकरांना बेळगावच्या आखाड्याच्या उद्‌घाटनासाठी बोलाविलें. सैन्यभरतीवर सावरकर बोलणार म्हणून मंडळांत गर्दी झाली होती. कांही युरोपियन अधिकारी व सैनिकहि या व्याख्यानास आले होते. सावरकर सैन्यांत शिरण्याचा जोरदार प्रचार करतांना म्हणाले, " बंदुका खांद्यावर घ्या. त्याचा उपयोग उलटाहि करता येतो हें ध्यानांत धरा. " वीर सावरकरांचें हें भाषण ऐकतांना युरोपियन अधिकारी एकमेकांच्या चेहऱ्याकडे बघावयास लागले. कांही दिवसांनंतर असेच एक युरोपियन अधिकारी मला म्हणाले, " तुमचा प्रचार चांगला आहे. पण बंदुका उलट्या चालविण्यास तुम्ही उघड उघड सांगतां. यामुळे आमचा तुमच्यावर विश्वास नाही. "

## ११७. हत्यारांची ऊब कांही वेगळी असते.

वीर सावरकर रत्नागिरीहून सुटल्यावर पुण्यास आले. आमच्या महाराष्ट्र मंडळाच्या तरुणांनी त्यांना बंदुका हातीं घेऊन मानवंदना दिली. या तरुणांच्या हातीं असलेल्या बंदुका खोट्या होत्या. ही लष्करी मानवंदना पाहून ते आनंद व्यक्त करून मला म्हणाले, " दामले, खऱ्या हत्यारांची ऊब कांही वेगळी असते; तरी खरीं हत्यारें रायफल क्लबच्या नांवाखाली गोळा करा. "

### ११८. आमची चालती – बोलती जाहिरात.

स्वातंत्र्यवीर सावरकर १९४९ मध्ये कलकत्त्याच्या अधिवेशनाला जात होते. त्यांच्या डब्यांत श्री. ल. ब. भोपटकरहि होते. मी रिक्रुटिंग ऑफिसर होतों. मला मूर्तिजापुराहून दुसऱ्या गांवीं जायचें होतें. मी स्टेशनवर उभा होतों. सावरकरांचें स्टेशनवर स्वागत झालें. मला लष्करी गणवेषांत पाहिल्याबरोबर सावरकरांना इतका आनंद झाला की, माझ्या खांद्यावर हात ठेवून स्वागतास उत्तर देतांना ते म्हणाले, " माझा संदेश हाच. कॅप्टन दामले ही आमची चालती बोलती जाहिरात आहे. आमच्या विचारसरणीचे तरुण सैन्यांत घुसले की ते काय कामगिरी करूं शकतात हें सांगण्याची गरज नाही.

### ११९. सैन्यांत घुसा.

आमच्या सैनिकीकरण कार्यालयास वीर सावरकरांनी मुद्दाम भेट देऊन ते म्हणाले, " या कार्याला द्रव्य कमी पडत असेल तर मला निःसंकोचपणाने सांगा. हिंदुसभेचे कडवे अभिमानी तरुण बहुसंख्येने सैन्यांत घुसल्याशिवाय आपल्या देशाला चांगले दिवस यायचे नाहीत. यासाठीं तरतरीत बुद्धीच्या आरोग्यसंपन्न तरुणांनी संघटना करून लष्कराच्या सर्व विभागांत शिरलें पाहिजे."

### १२०. बंदुका, तोफा, विमानें हीं खेळणीं द्या.

मी मुंबईस सैनिकीकरणावर व्याख्यान देण्यास गेलों असतांना वीर सावरकरांना भेटलों. ते मला म्हणाले, ' गणपति उत्सव, शारदोत्सव जोरांत चालू आहेत. त्या ठिकाणीं अनेक विषयांवर व्याख्यानें चालू आहेत-पण त्या उत्सवांत सैनिकीकरणावर एकहि व्याख्यान होत नाही. या विषयावर व्याख्यानें ठेवली पाहिजेत." असें सांगून ते मला पुढे म्हणाले, "सैन्यामध्ये मर्दुमकी गाजविलेल्या अधिकाऱ्यांची व सैनिकांची चरित्रें मला लापून दे म्हणजे मी माझ्या दौऱ्यांत त्यांचा प्रचार भरपूर करीन. मुलांना खेळणीं द्यावयाचीं असली तर बंदुका, तोफा, विमानें हीं द्यावीत."

—शि. चि. दामले, पुणें.

✦ ✦ ✦



### १२१. भेटल्याशिवाय कसा जाऊं ?

मी पुण्यांत आजारी असतांना स्वातंत्र्यवीर सावरकर माझ्या समाचारास आले होते. (दि. ७-११-१९५८) मी त्यांना म्हणालों, " आपण येथपर्यंत येण्याचे श्रम घेण्याचें कारण नव्हतें. " त्यावर वीर सावरकर म्हणाले, " ज्या चार महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी म. गांधींच्या कार्यक्रमाला प्रकट विरोध करून राष्ट्रीयसभेस कौन्सिल-सन्मुख केलें त्यांतले तुम्ही एक आहांत. आपण टिळक पक्षाची ध्वजा निर्भयपणें फडकावली होती. तेव्हा पुण्यास आल्यावर आपण आजारी असल्याचें समजल्यावर मी आपणांस भेटल्याशिवाय कसा जाऊं शकेन ? " हे उद्‌गार ऐकतांच मला धन्यता वाटली. मी त्यांना आदराने निजल्या निजल्या नमस्कार केला व माझ्या नातवाच्या हातून त्यांच्या गळ्यांत पुष्पहार घातला.

—मा. श्री. अणे, नागपूर.

✦ ✦ ✦

### १२२. स्वातंत्र्यलक्ष्मी की जय

स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीहून सुटून मुंबईला आल्यावर त्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. या मिरवणुकींत "इन्किलाब झिंदाबाद" अशा घोषणा चालू होत्या. वीर सावरकरांनी एका प्रमुख स्वयंसेवकास जवळ बोलावून कानांत कांहीतरी सांगितलें. कांही क्षणांत ' स्वातंत्र्य लक्ष्मी की जय ' या घोषणा सुरू झालेल्या ऐकू येऊं लागल्या.

### १२३. कमरेंतील पट्ट्यामध्ये रिव्हॉल्व्हर.

त्यांच्या प्रकट सत्काराच्या उत्तरादाखलच्या भाषणांत ते तरुण वर्गाला उद्देशून म्हणाले, " सध्यांचे तरुण आपला भांग सुव्यवस्थित राहावा म्हणून मधून मधून हात लावून डोक्यावरील केस नीट करतात. त्याप्रमाणे

कमरेंतील पट्ट्यामध्ये असणारे रिव्हॉल्व्हर सुव्यवस्थित आहे की नाही हें पाहणारे तरुण आढळले पाहिजेत."

—अनभिज्ञ

* * *

## १२४. 'शीख गुरु'वर पुस्तकें पाहिजेत.

स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदुमहासभेच्या अधिवेशनासाठीं १९३८ मध्ये नागपूरला जात असतांना त्यांचा मुक्काम वर्धा येथे झाला. या मुक्कामांत मी लिहिलेली 'शीख–गुरु'ही लेखमाला दाखविली. या पुस्तकावर आपली प्रस्तावना असावी अशी इच्छा मीं व्यक्त केली. शीख इतिहासावरची माझ्या हातांतील कात्रणें पाहून त्यांना इंग्लंड–फ्रान्समधील ग्रंथालयांत त्यांनी लिहिलेल्या शीख इतिहासाची आठवण होऊन त्यांच्या भावना उचंबळून आल्या. माझीं कात्रणें चाळीत वीर सावरकर मला म्हणाले, "उपासनी, मी विलायतेंत असतांना शीख इतिहासाचीं टिपणें लिहिलीं पण तीं सर्व टिपणें सरकारजमा होऊन पुन: सूर्यप्रकाश पाहूं शकलीं नाहीत. माझ्या या टिपणानंतर मराठींत तरी मी तुमचेंच 'शीख–गुरु' हें पुस्तक पाहत आहे. हिंदुधर्म रक्षणार्थ शिखांचें हौतात्म्य उज्ज्वल आहे. त्यांचा इतिहास आपल्या मराठी भाषेंत अवश्य प्रसिद्ध झाला पाहिजे. आपण जर माझ्या-जवळ सहा महिने राहाल तर मी आजहि प्रत्येक शीख गुरुवर ग्रंथ होईल इतकी माहिती स्मरणांतून देऊं शकेन. तुमचा हा प्रयत्न मला आवडला."

—र. ल. उपासनी, नागपूर.

* * *



## १२५. हिंदुजातीचीं लेकरें.

सन १९५८ मध्ये वीर सावरकरांची भेट झाली. त्या भेटीत मी म्हणालों, "पंजाबांतील शीख हे आपणांस हिंदु जातींत समाविष्ट मानण्यास तयार नाहीत. तेव्हा आपल्या हिंदूच्या व्याख्येंत कांही अंतर करणें आपणांस युक्त वाटतें काय?" वीर सावरकर ताडकन म्हणाले, "नाही. त्या व्याख्येंत फरक करणें शक्य नाही. ती ऐतिहासिक नि वस्तुनिष्ठ व्याख्या आहे. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' शिखांना म्हणू द्या की हिंदुजाति आमची माता नव्हे; पण ही हिंदुजाति 'शीख ही माझीं लेकरें नाहीत" असें म्हणू शकत नाही. कारण आईस हें ज्ञात असतें की हा माझाच मुलगा."

—नरसिंह गणेश जोशी, ग्वाल्हेर.

* * *

## १२६. नोकरी करणें राष्ट्रसेवाच आहे.

१९५३ मध्ये मी मुंबईस गेलों असतांना स्वातंत्र्यवीर सावरकरांना भेटलों. "नोकरी सोडून हिंदुसभेचें कार्य करावें अशी इच्छा असून माझें धैर्य मात्र होत नाही" असें मी सावरकरांना म्हणालों. त्यावर सावरकर म्हणाले, "चिंता नाही. स्वातंत्र्यपूर्वकालाप्रमाणें राष्ट्रसेवा करण्याचा आता फक्त एकच मार्ग आहे असें नाही. आज स्वातंत्र्याच्या काळांत सरकारी नोकरी प्रामाणिकपणें करणें ही एक राष्ट्रसेवाच आहे. त्याहि ठिकाणीं राहून तुम्हाला हिंदुहिताचें रक्षण करता येईल."

—भी. ज्ञा. जोशी, पुणें

* * *

## १२७. अधिवेशन भरवा, मगच अटकी व्हा.

भागलपूरला हिंदुसभेच्या अधिवेशनाला बिहार सरकारनें बंदी घातली. अधिवेशनाच्या वेळींच मुसलमानांचा ईदचा सण होता. त्यांच्या धार्मिक भावना दुखविल्या जातील म्हणून हा हुकूम सरकारनें काढला. वीर सावरकर हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यांना ही गोष्ट सहन होणें शक्यच नव्हतें. त्यावेळचे बिहार प्रांताचे गव्हर्नर व वीर सावरकर यांच्या-मध्ये जो पत्रव्यवहार झाला तो वाचनीय असून वीर सावरकरांनी आपलें म्हणणें किती यथार्थ रीतीनें मांडलें आहे तें मुळांतच वाचण्यासारखें आहे. असो. बिहार सरकारचा हा हुकूम मोडावयाचा हें ठरलेंच. किंबहुना भागल-पूरला अधिवेशन कोणत्याहि परिस्थितींत भरवावयाचेंच हा निश्चय झाला. महाराष्ट्रांतून शेंकडो कार्यकर्ते भागलपूरला निघाले. बरोबर वीर सावरकर होतेच. उत्साहाला सीमा नव्हती. कल्याण स्थानकावर माझा आगगाडीचा डबा चुकला. कोणत्या तरी डब्यांत चढलें पाहिजे म्हणून ज्या डब्यांत मी चढून बसलों त्याच डब्यांत वीर सावरकर होते. त्यांनी मला पहातांच माझी आस्थेनें ओळख करून घेतली. ते म्हणाले, "तुम्ही आता सत्याग्रहास निघाला आहांत याचा अर्थ भागलपुरास तुम्ही काय करणार?" मी म्हणालों, "भागलपूर स्थानकावर आम्हांला अटक करतील आणि आम्ही तुरुंगांत जाऊं." सावरकर म्हणाले, "असें नाही; तेवढ्यानें काम भागणार नाही. तुमच्यासारख्या तरुणांनी चटकन अटक करून घेऊन तुरुंगात जाणें इष्ट नाही. तो तुमचा मार्ग नव्हे. भागलपूर स्थानकावर उतरल्यावर भागलपूर शहरांत कसें जातां येईल तें पहा. सरकारने जसे गुप्त पोलीस त्या ठिकाणीं असतील तसे आपलेहि गुप्तपद्धतीनें काम करणारे स्वयंसेवक आहेतच. त्यांच्या खुणांनुसार काम करा. अधिवेशन भरवावयाचें आणि नंतरच अटकी व्हावयाचें हें लक्षांत घ्या. सभा भरवा. भगवा ध्वज फडकवा. हें करीत असतांना पोलीसांचा लाठीमार होईल. त्या घटनेची, अत्याचाराची तुम्हांला चीड येईल. मग पाहा कसा संचार होतो तो तुमच्यांत. सभा भयाला वाजेसेच झालें पाहिजे."



## १२८. देवस्थानें स्फूर्तिस्थानें आहेत.

१९४२ या वर्षी वीर सावरकर आमच्या निमंत्रणानुसार तुळशीबागेंत रामदर्शनाला आले होते. तुळशीबाग हें ऐतिहासिक मंदिर त्यांनी आस्थेनें व चौकस बुद्धीनें पाहिलें. तुळशीबागेंत नगारखाना आहे. खर्ड्याच्या लढाईंत मराठ्यांना अपूर्व विजय मिळाला. त्या दिवसापासून पेशव्यांनी हा नगारखाना सुरू केला ही हकीकत त्यांना आम्ही सांगितल्यावर ते म्हणाले, "आपल्या पिढीनें हा ज्वलंत इतिहास सतत डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. तुळशीबागेसारखीं देवस्थानें हीं आपलीं स्फूर्तिस्थानें आहेत."

—म. रा. तुळशीबागवाले, पुणें

✦ ✦ ✦

## १२९. सभा होईपर्यंत दाढी काढूं नका.

श्री. अण्णाराव भोपटकर भागानगर निःशस्त्र प्रतिकार आंदोलनाचा निजामाचा कारावास भोगून पुण्यास आले. त्यांच्या स्वागताला पुणें स्थान-कावरअलोट गर्दी जमली. त्यामध्ये वीर सावरकर उपस्थित होते. पुणें स्थानकावर अण्णारावांची गाडी आली. त्याचें स्वागत करतांना श्री. भोपटकर वीर सावरकरांना म्हणाले, "आतां प्रथम घरीं गेल्यावर ही वाढलेली दाढी काढून टाकणार!" पण त्यावर वीर सावरकर हळूच म्हणाले, "नको अशीच राहूं दे." दुपारीं सावरकर अण्णारावांकडे गेले. अण्णारावांना पाहतांच सावरकर पुन्हा म्हणाले, "सायंकाळची शनिवारवाड्यासमोरील सभा होईतोंपर्यंत दाढी काढू नका बरं का." त्या दिवशीं अण्णा-रावांच्या सत्काराची प्रचंड सभा शनिवारवाड्यासमोर झाली. वीर सावरकरांचें भाषण सुरू झालें. ते आपल्या स्फूर्तिदायक भाषणांत म्हणाले, "वा! निजामा! तुझे या आंदोलनानें एक कोट रुपये खर्च झाले ही गोष्ट सत्य असेल तर मला आनंद आहे. कारण त्यामुळे आमची चौथाई

आणि सरदेशमुखी वसूल झाली (टाळ्या). आज अण्णारावांचें वजन जितक्या पौंडांनी कमी झालें आहे, तितक्याच पौंडांनी महासभेचें वजन वाढलेलें आहे" (प्रचंड टाळ्या). असें म्हणून वीर सावरकर पुढे म्हणाले, "आणि आज अण्णारावांची जेवढी दाढी वाढलेली आहे, तेवढीच निजामाची दाढी छाटली गेलेली आहे हें आपण विसरूं नका." (दीर्घकाल प्रचंड टाळ्या पडल्या).

सकाळपासून वीर सावरकर अण्णारावांना दाढी काढूं नका हें आग्रहपूर्वक कां सांगत होते याचा उलगडा मला या वेळीं झाला.

## १३०. गोणपाटाच्या जाडीचे कपडे.

वीर सावरकर १९४६ मध्ये अतिशय आजारी पडले. त्यांना रुग्णालयांत नेण्यांत आलें. त्यांच्या सेवेंत पं. नथूराम गोडसे, नाना आपटे व मी होतों. पहाटेच्या सुमारास मी त्यांच्या बिछान्यापाशीं बसलों होतों. त्या वेळीं ते बेशुद्धीतून नुकतेच शुद्धीवर आले होते. आपल्या क्षीण आवाजांत ते म्हणाले "कोण आहे पलीकडे" मी चटकन् त्यांच्याजवळ गेलों. त्यांच्या अंगाला हात लावून म्हणालों "तात्या, आपल्या अंगाला खूपच घाम आला आहे. रुग्णालयाचा अंगरखा काढतों. कारण तो ओला झाला असून खरखरीत आहे." वीर सावरकर क्षीण आवाजांत म्हणाले, "अंगरखा कशाला काढतोस. असूं दे. अरे अंदमानमध्ये असतांना आम्ही गोणपाटाच्या जाडीचे कपडे घातले आहेत. ते आम्ही फाडूं नयेत म्हणून आमच्या अंगामोवती शिवून टाकीत. त्या अंगरख्यापेक्षा हा रुग्णालयाचा अंगरखा चांगला नाही का ?"

—राम रानडे, पुणें

* * *



## १३१. त्यांचें शरीर तजेलदार होतें.

वीर सावरकरांना मी प्रथम पाहिलें ते १९०५ मध्यें. त्या वेळीं मी शाळेंत जाणारा १५ वर्षांचा विद्यार्थी होतों. पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या माडीवर दिवाणखान्यांत विद्यार्थ्यांची सभा भरली होती. लो. टिळक या सभेंत उपस्थित होते. या सभेंत प्रामुख्याने सावरकरांचें भाषण झालें. त्यांचें भाषण मनाचा ठाव घेण्यासारखें झालें. त्या वेळचें त्यांचें व्यक्तिमत्त्व मला अजून जसेंच्या तसें दिसतें. एखाद्या पिवळ्याधमक नागासारखें त्यांचें शरीर तजेलदार दिसत होतें. त्यांचा चेहरा केतकीच्या पात्याप्रमाणे गोरा, तकतकीत, तेजस्वी आणि दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेणारा दिसत होता. विशेष गंमत अशी की, लो. टिळक या विद्यार्थ्यांच्या सभेंत म्हणाले, "मी सुद्धा नुकताच मिशा आलेला विद्यार्थी आहे."

## १३२. आमच्या अंगावरचे व्रण आहेत.

१९३६ चें जळगावचें साहित्यसंमेलन झाल्यानंतर मी रत्नागिरीस गेलों, त्या वेळीं पहिल्यांदाच मी मुद्दाम जाऊन सावरकरांची भेट घेतली. जळगाव येथे झालेल्या भाषाशुद्धीच्या वादासंबंधाने त्यांचें माझें संभाषण झालें. जें जळगावला मी म्हणालों होतों तेंच त्यांना म्हणालों, "आम्ही जे परकीय शब्द आत्मसात् केले आणि पचवून टाकले ती आमचीं विजयचिन्हें आहेत." सावरकर ताडकन् म्हणाले, "तीं आमचीं विजयचिन्हें नव्हेत दत्तोपंत; ते आमच्या अंगावरचे व्रण आहेत.

## १३३. सावरकरांची तोफ उडेल.

दि. ३ मे १९३८ मध्ये पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत वीर सावरकरांचें १८५७ या विषयावर भाषण झालें. मी त्या सभेचा अध्यक्ष होतों. सभा दहा वाजता सुरू होऊन १२ वाजता संपली. सभेला २० हजार जनसमुदाय होता. मी प्रास्ताविक भाषणांत वक्ते सावरकर यांच्यासंबंधाने म्हणालों, "कोणत्याहि महत्कार्याच्या प्रारंभी तोफा उडत, तशी वसंत व्याख्यानमालेच्या सुरवातीस सावरकरांची तोफ उडेल." माझ्या प्रास्ताविक भाषणानंतर

सावरकरांचे भाषण अगदी तसेंच झालें. त्यांचा १८५७ या विषयावरचा अभ्यास उल्लेखनीय होता. अनेक अज्ञात व गैरसमजुती असलेल्या प्रश्नावर त्यांनी आपल्या भाषणांत प्रकाश टाकला. १८५७ वर इंग्रज राज्यकर्त्यांनी बंड हा हीन आरोप केला होता तो त्यांनी पूर्णतया उखडून तें स्वातंत्र्य-युद्ध होतें हें सिद्ध केलें.

– दत्तो वामन पोतदार, पुणे

✦ ✦ ✦

## १३४. अर्वाचीन सावित्री

रत्नागिरीला काही दिवस विश्रांति घेऊन १९२४ मध्ये सावरकर त्र्यंबकेश्वरीं आले होते. त्यांचें व्यक्तिमत्त्व विलक्षण आकर्षक होतें. तेजस्वी गौरवर्ण, लोखंडाच्या कांबीसारखी कमावलेली भरीव, दंड आणि धाटदार छातीची पिळदार देहयष्टि पाहून ते अंदमानच्या यातना कशाच्या जोरावर सहन करूं शकले असतील याची मला कल्पना आली. मी त्यांच्या घरीं विहिरीवर स्नान करून माझें धोतर धुऊं लागलों तोंच सावरकर तेथे आले व धोतर धुण्याची व्यवस्था आहे, तुम्ही धुऊं नका असें सांगून त्यांनी माझ्या हातांतून धोतर काढून घेतलें. दुपारीं त्यांच्या पंक्तीला भोजन केलें. त्या वेळीं त्यांची साध्वी पत्नी पंक्तीला वाढीत होती. आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्याने यमराजाच्या मुखांतून आपल्या पतीला परत आणणारी प्राचीन सावित्री जशी, तशीच ही स्त्री नव्हे का?

## १३५. ब्राह्मणांनीच पुढाकार घेतला पाहिजे

दुपारच्या विश्रांतीनंतर सायंकाळपर्यंत अनेक सामाजिक व साहित्यिक विषयांवरील त्यांची मतें मीं समजावून घेतलीं. हिंदुसंघटनेच्या दृष्टीने अनिष्ट असणारा ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद कसा नाहीसा करतां येईल असें मी त्यांना विचारलें. त्यांनी सांगितलें कीं, "हिंदुसमाजांतील जन्मजात



उच्चनीचता नाहीशी करण्यांत ब्राह्मणांनीच पुढाकार घेतला पाहिजे आणि या दृष्टीने ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दोघांनीहि पोसलेल्या अस्पृश्यतेचें उच्चाटन करण्याचें धैर्य ब्राह्मणांनी दाखविलें पाहिजे. हिंदुसमाजांतील स्पृश्य-अस्पृश्य भेद जर आपण नाहीसा करूं शकलों तर ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा त्याच्या पोटांतील भेदहि आपोआपच नाहीसा होईल."

## १३६. अत्याचारी नव्हे, शस्त्राचारी

१९३७ मध्ये वीर सावरकरांनी नागपूरला भेट दिली. चिटणीस पार्कवर बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा प्रचंड सत्कार करण्यांत आला. वीर सावरकरांनी आपल्या वक्तृत्वपूर्ण आणि तर्कशुद्ध भाषणात लोकांना एक नवा दृष्टिकोन सांगितला. ते म्हणाले, "क्रांतिकारकांना नेहमी अत्याचारी म्हटलें जातें तें बरोबर नाही. अन्यायाचा सशस्त्र प्रतिकार हा अत्याचार होऊं शकत नाही. एवढेंच नव्हे तर तो गीतेने धर्म्य ठरविला आहे. म्हणून क्रांतिकारकांना अत्याचारी न म्हणतां शस्त्राचारी म्हणणेंच योग्य होईल.

## १३७. मला तरी निराशा वाटत नाही.

१९४० च्या सुमारास मी मुंबईत वीर सावरकरांना भेटलों होतों. त्या वेळीं हिंदुराष्ट्रध्वजावर कृपाण कुंडलिनीचीं प्रतीकें कां आहेत याचें त्यांनी विवेचन केलें व हिंदु संस्कृतीच्या भौतिक आणि आध्यात्मिक साधनसंपदेची तीं समन्वयात्मक प्रतीकें आहेत हा मुद्दा विशद केला. संभाषणाच्या शेवटी मी त्यांना विचारलें, "हिंदु जाति आतां वृद्ध झालेली दिसते. अटकेपासून रामेश्वरापर्यंत या देशाचा विस्तार असून हिंदुस्थान हा हिंदूंचाच आहे या दोन्ही गोष्टी आजचे हिंदू मानीत नाहीत. यावर हिंदुजातीचें भवितव्य आपणांस निराशाजनक वाटत नाही काय?" तेव्हा आजारीपणामुळे पडून असलेले वीर सावरकर ताडकन उठून बसले व म्हणाले, "मुळीच नाही. राष्ट्रीय सभेची पन्नास पंचावन्न वर्षांची कामगिरी आणि हिंदुमहासभेची गेल्या पांच सहा वर्षांची कामगिरी पहा. मी दिलेल्या जाणिवेप्रमाणे हिंदुस्थान चालत आहे. निजलेले उठत आहेत, चळवळ करीत आहेत. तसेंच

तें आणखी कांही काळ चाललें तर सर्व कांही ठीक होईल. मला तरी निराशा वाटत नाही.

## १३८. हें कुरुक्षेत्र आहे.

यानंतर १९२६साली १४ जानेवारीला पानिपतच्या रणसंग्रामावर पुण्याच्या शिवाजीमंदिरांत श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मी व्याख्यान दिलें. 'पानिपतचे धर्मवीर' असा मथळा या व्याख्यानाला मी दिला होता. मराठ्यांचें राजकारण धर्मकारणाकरिता होतें काय ? हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. म्हणून मी पानिपतावर आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांना 'धर्मवीर' म्हणणें योग्य होईल काय ? असें पत्रानें सावरकरांना विचारलें. त्यावर त्यांनी रत्नागिरीहून पुढीलप्रमाणें आपलें मत कळविलें. " आपलें पत्र पावलें. मी घाईत असल्यामुळे कार्ड टाकीत आहे. आपण ' धर्मवीर ' ही पदवी पानिपतच्या वीरांना दिलीत ती योग्य होती. शेवटच्या दिवशीं ' हें कुरुक्षेत्र आहे. येथे मेलियास त्याहून उत्तम गति तो वीरास कोठून मिळणार आहे ? ' अशा अर्थाचें स्वतः पानपताच्या विक्रमशाली सेनानींचें — त्या भाऊंचें वाक्य प्रसिद्ध आहे. तीच प्रेरकशक्ति होती. त्याचें राजकारण धर्मकारणास अनुकूल होतें म्हणून आणि दुसऱ्याची प्रेरकशक्ति पहिल्यास आणि पहिल्याची दुसऱ्यास असें गुतागुंतीचें तें होतें म्हणून दुसऱ्या पक्षाची दिशाभूल होते. धर्मकारणासाठी राजकारण आणि राजकारणासाठी धर्मकारण असें जेव्हा जेव्हा होतें तेव्हा तेव्हा त्या संग्रामास धर्मसंग्राम म्हणावयास हरकत नाही. निदान भाऊ आणि तत्सम शेकडो वीर धर्मवीर होतेच होते. पण ते धर्मोन्मत्त नव्हते. धर्मवीर(martyr) व धर्मोन्मत्त(Fanatics) ह्यांत फरक आहे. आणि इतर इतिहासकारांची मराठ्यांच्या राजकारणाच्या व्यापामुळे धर्मकारण नव्हतेंच अशी समजूत होते ती यामुळेच. मराठ्यांच्या इतिहासांत उच्चनीच, धार्मिक अधार्मिक दोन्हीहि प्रवृत्ति आढळतात. त्यायोगें एक त्यास धर्मवीर तर दुसरे स्वार्थी म्हणतात. हा घोटाळा शक्य तितका निवडून सत्यदृष्टीनें त्यांविरुद्ध प्रवृत्तींचा मेळ माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या " Review of Marathi History " या पुस्तकांत मी घातला आहे. आपण तें पुस्तक अवश्य वाचावें " हें पत्र १९२६ मध्ये जानेवारीच्या शेवटच्या



आठवड्यांत लिहिलेलें आहे. वरील पुस्तकाचें नांव " हिंदुपदपादशाही " हें अथवा " ए क्रिटिकल् रिव्ह्यू ऑफ हिंदु एम्पायर ऑफ महाराष्ट्र " असें आहे.

—प्रा. शं. दा. पेंडसे, नागपूर.

✦ ✦ ✦

## १३९. आठल्ये, असें करूं नका.

स्वातंत्र्यवीर सावरकर रत्नागिरीस स्थानबद्ध होते. त्या काळांत मी रत्नागिरीस तेथील एक प्रसिद्ध मांत्रिक श्री. आठल्ये यांच्याकडे सर्पदंशावरील मंत्र त्यांजकडून घेण्यासाठी गेलों होतों. मंत्र घेतेवेळीं बेतला व श्री. आठल्ये यांचेसह बॅ. सावरकर यांच्या भेटीस गेलों. आमच्या भेटींत सहजच सर्पमंत्राच्या खरेखोटेपणाविषयी बोलणें निघालें. मी म्हणालों, ' पुण्यास श्री. रामभाऊ गोखले म्हणून एक गुप्त चिकित्सामंडळाचे चालक आहेत. त्यांची रा. आठल्ये यांस अशी विनंति आहे की, त्यांनी मुंबईस परळ येथील लॅबोरेटरींत यावें. तेथे एका जनावराला खुद्द विषारी नागाकडून आम्ही दंश करवूं. दंशांत विषाचा संपूर्ण डोस उतरला आहे असें आम्ही पाहूं. विषबाधेची खात्री झाली की श्री. आठल्ये यांनी मंत्र घालावा म्हणजे मंत्राच्या परिणामकारकतेची खरी शहानिशा होईल. ' यावर आठल्ये यांचें म्हणणें पडलें की, ' अशा मुद्दाम दंश केलेल्या प्राण्यावर मंत्रोपचार करण्यास आपल्याला गुरूची आज्ञा नाही. आतां आपण होऊन आला तर आमच्या कारुण्यबुद्धीची उपज होते व मंत्र परिणामकारक होतो.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी दोन्हीहि बाजू नीट ऐकल्या व आपल्या ठायींच्या प्रखर बुद्धिनिष्ठेला अनुसरून ते म्हणाले, 'आठल्ये, असें करूं नका. हें आव्हान स्वीकारा. मंत्रांत खरोखर वस्तुनिष्ठ सामर्थ्य असेल तर आपण यशस्वी व्हाल. तसें नसेल तर एक भ्रम तरी दूर होईल. त्यांत बिघडलें काय ? '

## १४०. दत्तक नसून औरस आहे.

१९४५ च्या ३० मे या तारखेस रात्रीं दादर येथील किर्ते भंडारी हॉलमध्ये माझें सावरकर-काव्यावर व्याख्यान झालें. दुसरे दिवशीं सावरकर-सदनांत बॅरिस्टर सावरकरांच्या भेटीस मी गेलों. गेल्याबरोबर मला ते म्हणाले 'कालच्या तुमच्या व्याख्यानाचीच चर्चा येथे बराच वेळ चालली होती. ते चांगलें झालें असें मंडळी म्हणत होती. आम्हांला त्यांतलें तुमचें एक वाक्य फार आवडलें आणि पटलें. तें म्हणजे 'सावरकरांची काव्यानुभूति दत्तक नसून औरस आहे.' खुद्द कवीला आपल्या काव्याचें वैशिष्ट्य काय वाटतें हें त्यांच्या तोंडूनच कळल्याने मला समाधान वाटलें.

## १४१. मी कांहीच उत्तर दिलें नाही.

१९४७ सालीं माझा 'संस्कृत काव्याचे पञ्चप्राण' हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्याची एक प्रत मी बॅ. सावरकर यांना भेट म्हणून धाडली होती. कांही महिन्यांनी मी दादर येथे गेलों असतां बॅरिस्टर सावरकरांस भेटलों व ग्रंथाबद्दल त्यांचें मत विचारलें. ते म्हणाले, "पुस्तक उत्तम आहे पण त्यांत परकीय शब्द कारण नसतांना आपण कां राहूं दिले? आपल्यासारख्यांनी मनांत आणलें तर 'नजर' 'नफा' 'जमीन' अशा साध्या शब्दांऐवजी संस्कृत सोपे शब्द घालता आले नसते काय?"

मी कांहीच उत्तर दिलें नाही. पण भाषाशुद्धीच्या आपल्या मताबद्दल सावरकर किती जागरूक असतात याची मला खात्री पटली.

—डॉ. के. ना. वाटवे, पुणें.

✦ ✦ ✦

## १४२. मी तुम्हाला आई म्हणूं का

१९४८ मध्ये गांधींचा वध नथुराम गोडसे, नारायणराव आपटे यांनी केला म्हणून त्यांना पकडलें. त्याचप्रमाणें वीर सावरकरांनाही पकडून दिल्लीच्या सुप्रसिद्ध लाल किल्ल्यांत ठेविलें होतें. न्यायालयांतील सावरकरांतर्फेचें काम



अण्णाराव भोपटकर म्हणजे माझे पति पाहत होते. मीहि त्यांच्याबरोबर दिल्लीला हिंदुसभाभवनामध्ये राहूं लागलें. अण्णाराव भोपटकर सावरकरांना लालकिल्ल्यांत भेटावयास जात असत. त्या वेळीं कांही प्रसंगीं मीही बरोबर जात असे. सावरकरांना कांही विशेष आवडणारे खाण्याचे पदार्थ मी नेत असे. सावरकरांना शेव आवडते असें मला कळलें. मी त्यांच्याकरिता अतिशय चवकर व कुरकुरीत शेव करून समक्ष नेऊन दिली. शेवेचा डबा हातीं भेत असतांना त्यांना गहिंवरून आलें. ते संकोचून म्हणाले, "मी तुम्हांला आई म्हणूं का? म्हणूं तरी काय? माझ्या आवडी-निवडीच्या सर्व गोष्टी आपण पुरवितां." मी म्हणालें, "त्यांत विशेष तें काय केलें." सावरकर म्हणाले, "नाही कसें? अण्णारावांसारख्या थोर गृहस्थांच्या पत्नीने या दिल्लीच्या थंडीत दोन प्रहरीं शेगडीशी बसून आमच्याकरता जिन्नस तयार करावयाचे यांत कांहीच कसें नाही? आपल्यासारख्या माता निपजतात म्हणून आम्ही तरी संकटाला पाठमोरे कां म्हणून व्हावें?"

## १४३. लहान मुलांच्या अवखळपणाने म्हणाले.

१९५६ मध्यें लोकमान्य टिळक जन्मशताब्दीच्या महोत्सवाला वीर सावरकर पुण्यांत आले असतांना ते आमच्या घरीं अण्णाराव भोपटकरांना भेटावयास आले होते. दोघेहि एकमेकांचें स्वागत करून गळ्यांत पुष्पहार घालूं लागले. अण्णारावांनीं सावरकरांच्या गळ्यांत पुष्पहार घातला. सावरकर त्यांच्या गळ्यांत पुष्पहार घालूं लागले. परंतु अण्णाराव पुष्पहार घालूं देईनात. तेव्हा काय युक्ति करावी अशा विचारांत सावरकर एखाद्या लहान मुलाच्या अवखळपणाने म्हणाले, "अण्णाराव, तुमच्या बोटाला काय लागलें आहे हो." अण्णारावांनीं लक्ष बोटाकडे नेयलें जातांच सावरकरांनी त्यांच्या गळ्यांत पुष्पहार घातला.

## १४४. पारिजातक तो पारिजातक

वीर सावरकरांचा एकसष्टी समारंभ पुण्यांत झाला. त्या वेळीं ते आमच्या घरीं उतरले होते. त्यांच्या आठवड्या दिवसांच्या या मुक्कामांत त्यांच्या स्वागताच्या विविध पुष्पहारांनी आमचा दिवाणखाना भरून गेला होता.

सावरकर एका पहाटे वरच्या दिवाणखान्यांतून खालच्या सज्ज्यांत आले. मधल्या अंगणांत पारिजातकाचें झाड आहे. त्या झाडावरची सहस्रों शुभ्र फुलें अंगणांत पडलीं होतीं. पहाटेच्या रम्य वेळीं वीर सावरकर त्या फुलांकडे पाहून मोहित झाले. त्यांनी माझ्या मुलीला त्यांतलीं ओंजळभर फुलें आणावयास सांगितलीं. मी त्यांना म्हणालें, "आपल्याला मिळालेल्या सुगंधित हारांपुढे याचें काय एवढें ?" सावरकर म्हणाले, "पारिजातक तो पारिजातक ! फारच मोह पडतो मला या फुलाचा. उगीच नाहीं भगवान् कृष्णांनी आपल्या बायकोकरिता त्याला स्वर्गांतून पृथ्वीवर आणलें !

—यशोदाबाई भोपटकर, पुणें.

* * *

## १४५. प्रेमभराने कडकडून आलिंगन दिलें.

१९४२ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचा काश्मीर प्रांतांत दौरा झाला. त्यांच्याबरोबर मी, पं. नथुराम गोडसे व भाई परमानंद होतों. अबोटाबाद रेल्वेस्थानकावरच्या खानावळींत आम्ही वीर सावरकरांसह भोजनास बसलों. त्या वेळी दरवाज्यांत उभा असलेला एक माणूस सावरकरांच्याकडे सारखा टक लावून पाहत होता. त्याची ही उत्सुकता माझ्या लक्षांत आली. मी सावरकरांना हळूच म्हणालों, "हा माणूस आपल्याकडे इतक्या कटाक्षाने कां बघतो ? त्याचा आपला परिचय आहे का ?" सावरकर म्हणाले, "त्याला कोठेतरी पाहिल्यासारखा वाटतो खरा." असें म्हणून त्यांनी त्या माणसाला जवळ बोलावून विचारलें, तो म्हणाला, "मी आपल्याबरोबर अंदमानांत होतों." हें ऐकताच सावरकरांनी त्याला प्रेमभराने कडकडून आलिंगन दिलें. त्याला जवळ घेऊन त्याच्या समवेत जेवण घेतलें.

## १४६. मग मीही जेवणार नाही.

१९४० मध्ये हिंदुसभेच्या कार्यकारिणींत प्रत्यक्ष प्रतिकाराच्या ठरावावर खूप चर्चा झाली. त्यामध्ये वीर सावरकर नि भाई परमानंद असे दोन गट



पडले. भाई परमानंद या वादचर्चेंत रागावून बैठक सोडून बाहेर गेले. एवढेंच काय पण ते जेवणहि घेण्यास तयार होईनात. त्यांना अनेकांनी जेवणाची विनंति केली पण ते कोणाचें ऐकेनात. अखेर सावरकरच त्यांना म्हणाले, "मग मीही जेवण घेणार नाही " असें त्यांनी म्हणतांच भाई परमानंद तयार झाले.

## १४७. भाविकाप्रमाणें देवदर्शन घेतलें

स्वातंत्र्यवीर सावरकर उठून कोठे देवदर्शनाला जात नाहीत. परंतु भगूर या आपल्या गांवी ते १९५२ मध्ये आले असतांना स्मरणपूर्वक तेथील देवाच्या मंदिरांत अनवाणी आले. पायांतले बुट काढून मंदिरांतील घंटा वाजवून भाविकाप्रमाणें देवदर्शन घेतलें.

—हरिभाऊ भागवत, मुंबई.

* * *

## १४८. महाराजांचे न्हावी श्री. वाघ

स्वातंत्र्यवीर सावरकर बडोद्यास आले होते. त्यांना दाढी करावयाची होती. बडोद्यातील सुप्रसिद्ध आणि हिंदुत्वनिष्ठ केशकर्तक श्री. मूळजीभाई शर्मांना बोलावून घेतलें. शर्मांना अतिशय आनंद वाटला. सावरकरांची दाढी करतांना शर्मा म्हणाले, "लोक आम्हांला हजाम म्हणतात हा आमचा अपमान आहे असं मला वाटतं." सावरकर म्हणाले, "मग लोकांनी कोणता शब्द वापरावा असें तुम्ही सुचवितां ?" शर्मा म्हणाले, "आम्ही धंद्याने न्हावी आहोंत. आमच्या मंडळानं हाच शब्द स्वीकारला आहे." सावरकर म्हणाले, "धंदा कोणताहि असो, त्यांत कमीपणा नाही. आपण सारे हिंदु आहोंत" असें सांगून सावरकर शर्मांना पुढे म्हणाले, "आता तुम्हांला म्हणून सांगतों. तुमच्या सयाजीराव महाराजांचा न्हावी आमच्या लोकांच्या फार उपयोगी पडला. आम्हांला महाराजांच्या कानीं कांही गुप्त बातमी घालायची असली किंवा महाराजांचें म्हणणें कळून घ्यायचें असलें म्हणजे त्या न्हाव्याच्या

द्वारा तें काम व्हायचं. कारण राजवाड्यांतील स्वतंत्र श्मश्रूगृहांत महाराज नि न्हावी या दोघां व्यतिरिक्त कोणीच नसायचं. (श्री. वाघ महाराजांचे न्हावी होते त्यांचप्रमाणें पुण्याच्या फर्ग्युसनकॉलेजमध्ये सावरकर असतांना वाघ हे त्यांचे मित्र होते.)

### १४९. अंदमान हेंच आमचें घर

वीर सावरकरांच्या सत्कार–व्यासपीठावर एका भव्य फलकावर अखंड हिंदुस्थानचें मानचित्र लाविलें होतें. त्या मानचित्रांत सावरकरांचें जन्मगांव भगूर हें दर्शविलें होतें. व्यासपीठावर चढत असतांना वीर सावरकर तो भव्य फलक निरीक्षण करीत असतांना म्हणाले, "अहो हें इथे भगुर कशाला? इकडे हें अंदमान आहे ना, तेंच आमचं खरं गांव."

### १५०. तुम्ही नसून कसें चालेल.

स्वातंत्र्यवीर सावरकरांसह स्थानिक कार्यकर्त्यांचें एक छायाचित्र व्हायचें ठरलें. छायाचित्रासाठी सर्व मंडळी उभी राहिली. स्वतः प्रोफेसर माणिकराव झटकन बाजूला जाऊं लागले. सावरकर त्यांचा हात धरून म्हणाले, "वा, वा तुम्ही नसून कसें चालेल? तुम्ही होतां म्हणून तर आम्हां मंडळींना बडोद्यांत थारा होता." पूर्वी प्रो. माणिकराव अभिनव भारताचे सभासद होते. त्यांच्यामुळे सयाजीराव महाराजांकडे क्रांतिकारकांना बडोद्यास आश्रय मिळे.

— ह. त्र्यं. देसाई, बडोदें

* * *

### १५१. पालजी, ही सर्व मंडळी आपलीच आहेत

१९५३।५४ सालची गोष्ट असेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अभिनव भारतसंस्थेचे एक जुने सहकारी निरंजन पाल हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें दर्शन घ्यावे म्हणून आपल्या मुलास घेऊन आले होते. वेळ सकाळी



साडे दहाची असावी. आम्हीही त्यांचे दर्शनासाठी पुण्याहून गेलो होतों. त्या वेळीं त्यांचें दोघांचें संभाषण आम्ही ऐकलें. एकूण बोलणी व गप्पागोष्टी झाल्यावर निरंजन पाल म्हणाले "अभिनव भारत या संस्थेचे क्रांतिकारक, हिंदुस्थान संपूर्ण स्वतंत्र करणार व त्या स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून वीर सावरकर राहणार ही आमची सर्व क्रांतिकारांची प्रतिज्ञा व मनीषा! आतां हिंदुस्थान स्वतंत्र झाला खरा पण वीर सावरकर हे एका लहानशा घरांत कालक्रमण करीत आहेत व कोणीहि कल्पना केली नाही व कोणाच्याही ध्यानीमनी नव्हती ती मंडळी आज या स्वतंत्र हिंदुस्थानचे राज्यकर्ती आहेत. अरेरे!" त्यावर सावरकर म्हणाले, "पालजी आज अधिकारावर मंडळी आहेत ती सर्व आपलीच आहेत. इंग्रज किंवा इतर पाश्चिमात्य लोकांपैकी कोणी नाही ना? त्यांचें स्वातंत्र्य टिकविण्याचें किंवा देशहिताचें कार्य योग्य न वाटल्यास त्यांना बदलणें फार सोपें आहे व तें म्हणजे मताची चिठ्ठी! मला आनंद होत आहे तो एवढाच की मी याच देही याच डोळा स्वातंत्र्य पाहिलें. तें आतां टिकविण्यासाठी पराकाष्ठा केली पाहिजे."

या त्यांच्या भेटीनंतर वीर सावरकर, मि. विल्सन, बॅ. निरंजन पाल व त्यांचा मुलगा यांचे चित्र सावरकरसदनाचे पटांगणांत काढण्यांत आलें.

### १५२. सावरकर आणि जिना यांची भेट

१९४० किंवा १९४१ साल असावें. १९३८ सालच्या कांग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा दिला होता व सिंध, बंगाल, पंजाब या ठिकाणीं संमिश्र मंत्रिमंडळें होती. त्यांपैकी सिंधमध्ये मुस्लिमलीग व हिंदुमहासभा या दोन राजकीय पक्षांचें संमिश्र मंत्रिमंडळ होतें. त्याच सुमारास हिंदुमहासभेचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर सिंधच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या त्या दौऱ्यांत कराचीस त्या मंत्रिमंडळाने स्वातंत्र्यवीर सावरकरांना चहासाठी बोलाविलें. मुख्यमंत्रि मुस्लिम लीगचा होता. त्या वेळीं राजकीय गप्पागोष्टी निघाल्या नि त्या स्वाभाविकच होत्या. मुख्यमंत्री म्हणाले, 'आमचे पुढारी बॅरिस्टर महंमद अली जिना हे आपणांस भेटू इच्छितात.' स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले 'मलाही त्यांना एकदा भेटायचें आहे.' त्याप्रमाणें त्या मंत्रिमंडळांतील हिंदुमंत्री भा. आडवाणी हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बरोबरच

मुंबईस आले व त्यांनी जिनांची भेट घेतली व वीर सावरकर आपणास आपण म्हणाल्याप्रमाणे भेटण्यास तयार आहेत असें सांगितलें. बॅरिस्टर जिना म्हणाले, " घेऊन या. मी त्यांच्या भेटीची नि आदरातिथ्याची व्यवस्था करतो." नंतर ना० आडवाणी स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट घेऊन म्हणाले, "सावरकरजी, चला जिनांना भेटण्यासाठी. त्यांनी सर्व तयारी करून ठेवली आहे.' स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "बॅरिस्टर जिना हे वयानें माझ्या-पेक्षा मोठे आहेत. त्यांनी माझ्या घरीं भेटण्यासाठी यावें. मी त्यांचा चांगला आदर सत्कार करतो." नंतर सदर आडवाणी बॅरिस्टर जिनांकडे गेले व सावर-करांचें म्हणणें त्यांना सांगितलें. यावर जिना म्हणाले " मी सावरकरांकडे आलों असतों पण आमचा मुसलमान समाज भारी धार्मिक आहे. आतापर्यंत गांधी, नेहरू, पटेल वगैरे पुढारी माझ्या घरी मला भेटण्यासाठी आलेले आहेत. त्यामुळे माझें वजन वाढलें व मुसलमान समाजात मी एक प्रकारें चांगलें वजन पाडलें आहे. तेव्हा सावरकरांचे घरी जर मी गेलों तर माझें वजन जाईल व मुसलमान समाज हा धार्मिक आहे व तो माझें नेतृत्व झुगारून देईल. म्हणून सावरकरांनाच आपण माझ्या घरी भेटण्यासाठी घेऊन या."

ना. आडवाणी सावरकर सदनांत पुन्हा आले व झालेली हकीकत सावर-करांना त्यांनी सांगितली. सावरकर म्हणाले, " इतके दिवस हिंदुसमाज अगदी भोळा नि अडाणी होता व सहिष्णु होता. पण आतां तो सापेक्ष सहिष्णु झाला आहे व तो माझ्या समजुतीप्रमाणे धार्मिकच बनला आहे. तेव्हा माझें वजन नाही का त्या समाजावरचें कमी होणार. तोहि समाज आतां शहाणा झाला आहे. तेव्हा जिनांनीच मला माझे घरी भेटावें. त्यांना घेऊन या." ना० आडवाणी पुन्हा जिनांकडे गेले व सावरकरांनी सांगितलेला निरोप त्यांनी जिनांना सांगितला. बॅरिस्टर जिना म्हणाले, "हें सावरकरांचें म्हणणें बरोबर आहे. तेव्हा यातून एक मार्ग आपण काढू. बॅ. सावरकरांना आणण्यासाठी मी माझी मोटार पाठवितो. त्यांनी माझ्या घरी फक्त चहा प्यावा आणि बोलणीं करण्यासाठी आपण त्याच मोटारींतून सावरकर सदनात जाऊं!" ना. आडवाणी यांनी बॅरिस्टर जिनांचा निरोप सावरकरांना सांगितला. तेव्हा सावरकर आडवाणींस म्हणाले; "अहो तुमचें



राजकीय ज्ञान किती कमी आहे! मी समजा जिनांचे घरीं चहा घेण्या-साठी गेलों व चहा वगैरे झाल्यावर बोलणीं करण्यासाठी माझे घरीं (सावर-करसदनावर ठरल्याप्रमाणें) चला असें जेव्हा मी म्हणेन तेव्हा जिना म्हणतील माझ्या पोटांत कळ आली आहे, पोट दुखू लागलें आहे. आतां आपण येथेच थांबू. नंतर बोलणीं केव्हातरी पुढे तुमच्या घरीं येऊन करीन. त्यानंतर वृत्तपत्रांत बातमी काय येईल? की, सावरकर बॅरिस्टर जिना यांचे घरीं त्यांना भेटण्यासाठी व राजकीय बोलणीं करण्यासाठी गेले होते. त्याचा परिणाम असा होईल की, माझी पाकिस्तानची मागणी योग्य आहे म्हणूनच हे सर्व हिंदु पुढारी मला भेटण्यासाठीं व माझी मनधरणी करण्या-साठी माझ्याकडेच येत आहेत असें जिना सरकारला सांगतील. त्यांच्या घरी मी प्रथम जाण्याचा विपर्यास होईल."

मी स्वत: त्या वेळीं सावरकर सदनांत होतो व हा घोळ तीन दिवस चालला होता. वृत्तपत्रात तीनही दिवस अशाच बातम्या येत होत्या की, सात अर्वा तासांतच सावरकर–जिना भेट होणार! पण स्वातंत्र्यवीर सावरकर आणि बॅ. जिना यांची भेट अशा हुलकावण्यांनी झालीच नाही.

## १५३. श्यामाप्रसाद यांना स्वातंत्र्यवीरांचें पत्र

काश्मीरचा मुख्यमंत्री शेख अबदुल्ला याच्या हिंदुस्थानद्रोही कारवाया चालू झाल्या. काश्मीर भारतांतून तोडण्याचा त्याचा प्रयत्न सुरू झाला. म्हणून काश्मीर हा भारतांतच ताबडतोब सामील करून घ्यावा यासाठी सत्याग्रह सुरू झाला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी त्या लढ्याचें नेतृत्व स्वीकारलें होतें. त्या समितीत शा. वि. घ देशपांडे, श्री. रामसिंग वगैरे हिंदुमहासभेचे पुढारी त्यांचेबरोबर होतेच. एके दिवशीं अशी बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली की, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे स्वत: काश्मिरांत सत्याग्रह करण्यासाठीं जाणार! ही बातमी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वाचली. ते बेचैन झाले व लगेच एका इसमास त्यांनी स्वत: दे. न. श्यामा-प्रसादांच्याकडे पत्र देऊन पाठविलें. त्या पत्रांत असा मजकूर होता की, "तुम्ही स्वत: इतक्यांत सत्याग्रहासाठी काश्मिरांत जाऊं नये. शेख अबदुल्ला या अत्यंत दुष्ट माणसाचे हातात राज्यसत्ता आहे. आपणास

असें वाटत असेल की, मी आता पं. नेहरूनंतर हिंदुस्थानचा पंतप्रधान होणार म्हणून. खरोखरच तुम्ही हिंदुस्थानचा पंतप्रधान झाल्यास तुम्हास जो आनंद होईल त्यापेक्षा मला जास्त आनंद होईल. मी नेहमी जें भाकीत करतों तेंच खरें ठरतें. तें खोटें ठरावें ही वेळ जेव्हा येईल तो सुदीन. तुम्ही काश्मिरांत गेल्यावर तुमचा निश्चितपणें घात होईल व तो तसा झाला म्हणजे फक्त तुमच्या संबंधीच्या दुखवटयाच्या नि अबदुल्लाच्या निषेधाच्या सभा होतील. तुमची मला व राष्ट्राला फार मोठी गरज आहे. तेव्हा तुम्ही काश्मिरांत जाण्याची घाई करूं नका. केलेले प्रकट निवेदन परत घ्या व दुसऱ्या कोणास तरी तुमच्या बदली पाठवा :

या पत्रास डॉ. मुखर्जी यांचा निरोप आला की, शेख अबदुल्ला हा सुसंस्कृत असून नेहरू मंत्रिमंडळांतील मी एक माजी मंत्री आहे. शिवाय जनसंघाचे दहा हजार स्वयंसेवक माझे नंतर येणार आहेत. तेव्हा माझ्या-केसालाहि धक्का लागणार नाही याची खात्री बाळगा.

पण पु. डॉ. श्यामाप्रसाद गेल्यानंतर दहा हजार स्वयंसेवकही गेले नाहीत नि स्वातंत्र्यवीर म्हणाले तेंच शेवटीं खरें झालें !!

## १५४. ते फक्त हिंदुत्वनिष्ठ असावेत

१९३५ च्या घटना कायद्याप्रमाणें १९३७ सालीं प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका झाल्या. त्यांत कॉंग्रेसला आठ प्रांतांत बहुमत मिळालें व आठही प्रांतांत कॉंग्रेसने आपली मंत्रिमंडळें स्थापन केली. पण कोणत्याही मंत्रि-मंडळांत १९३२ साली झालेल्या पुणेकराराप्रमाणे एकही हरिजन मंत्री घेण्यांत आला नव्हता. म्हणून आम्ही राष्ट्रीय हरिजनांनी म. गांधींचे दारापुढे प्रत्येक इसमाने २४ तास या प्रमाणे उपोषण आरंभलें. त्याचें नेतृत्व श्री. हेमचंद्र-राव खांडेकरांनी केलें होतें. आम्ही सर्व त्यांचे सहकारी होतों. प्रत्यक्ष गांधीजींची भेट घेतली पण त्यांनी स्वतः सांगितलें की, 'तुम्ही प्रत्येक मंत्रि-मंडळांत एक हरिजन मंत्री मागता आहांत यावरून तुम्ही स्वार्थी आहात असें लोक म्हणतील. मी स्वतःच हरिजन आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. पण आम्ही त्यांचें म्हणणें मानलें नाही. आमचा सत्याग्रह चालूच ठेवला. त्याचबरोबर आम्ही स्वातंत्र्यवीर सावरकरांचें मत घेण्यासाठी त्यांचीही



भेट घेतली. कारण ते अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते. स्वातंत्र्य-वीर सावरकरांनी या संबंधाने लेखी पत्रक काढलें की, कॉंग्रेसमंत्रिमंडळांत पूर्वास्पृश्य मंत्री नाही म्हणून ही मंडळी सत्याग्रह करीत आहेत. पूर्वास्पृश्य मंडळींचे म्हणणें रास्त आहे. जर हिंदुमहासभेचें मंत्रिमंडळ आलें तर आम्ही एकच मंत्री मंत्रिमंडळांत काय म्हणून घेऊं! सर्वच्या सर्वच मंत्री पूर्वास्पृश्य असल्यास काय हरकत आहे! अट एकच राहील की ते जे मंत्री असतील ते फक्त हिंदुत्वनिष्ठ असले म्हणजे झालें!

## १५५. बिर्लाशेटजींचें चहासाठी निमंत्रण

१९४८ च्या ३० जानेवारीला म. गांधींना वध झाला. त्यामुळे स्वातंत्र्य-वीर सावरकर नि हिंदुमहासभा यांच्यावर सरकारची अतिशय अवकृपा झाली. स्वातंत्र्यवीर सावरकरांना तर एक आरोपी म्हणून गुदाम डांब-ण्यांत आलें. आमच्यासारखे शेकडों हिंदुमहासभेचे कार्यकर्ते यांना विना-मुदत कारागृहांत कोंडून ठेवले. पण सरकारचा न्यायदेवतेनेंच पराभव केल्याने स्वातंत्र्यवीर सावरकर निष्कलंक सुटले. हिंदुसभा कार्यकर्त्यांनाही क्रमाक्रमाने सोडून देण्यांत आलें. यानंतर डिसेंबर १९४९ मधे कलकत्ता येथे अखिल भारतीय हिंदुमहासभेचें अधिवेशन डॉ. खरे यांच्या अध्यक्षते-खाली भरून त्याचें उद्घाटन स्वातंत्र्य वीर सावरकर यांच्या हस्तें करण्यांत आलें. सन १९४८ ते १९५० पर्यंतच्या दोन वर्षांच्या कालखंडांत पक्षीय मोठ-मोठे विद्वान् आणि श्रीमंत लोक सरकारी दडपणाला किंवा जनतेला भिऊन हिंदुमहासभेला सोडून गेले, ते या अधिवेशनाला आले होते नि स्वातंत्र्यवीर सावरकर ज्या ठिकाणीं उतरले होते, त्याचे भोवती भोवती घुटमळत होते. आणि मोठ्या गोष्टी बोलून स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्तुति त्यांचे तोंडावर करीत. त्यांत श्रीमंत शेठ जुगुलकिशोर बिरलाजीही चटयापटयाचा मोठा फेटा बांधून आले व त्यांना भेटले. शेटजी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे निवासस्थानीं आले नि अत्यंत नम्रभावाने त्यांनी साष्टांगपणें दर्शन घेतलें. दर्शन घेत असतां स्वातंत्र्यवीरांनी त्यांच्या डोक्याला हात लावून " ऐसा नहीं करना शेटजी " असे उद्गारले व म्हणाले " आपका धंदा वगैरे अच्छा चल रहा है ना ? " त्यावर बिरला शेटजी म्हणाले "आपकी कृपासे ठीक चल

रहा है." इतकेंच संभाषण झालें. दोन तास शेटजी तेथेंच बसून राहिले; पण सावरकर इतर लोकांबरोबर राजकारणावर बोलत होते. शेवटीं एका प्रमुख कार्यकर्त्यानें तात्यारावांना असें सांगितलें कीं 'श्रीमंत जुगलकिशोरजी बिरला आपणास त्यांचे घरीं चहाचें निमंत्रण देण्यासाठीं आलेले आहेत तेव्हां त्यांना वेळ द्यावी.' लगेच सावरकर म्हणाले, 'आशुबाबू १०।१५ कप चहांहि चाय लाव' नंतर वीर सावरकरांनीं शेटजींसह नि सर्वांसह चहा घेतला व म्हणाले, "अच्छा शेटजी आपल्याबरोबर मी चहा घ्यावा असेंच आपणास वाटत होतें ना? ठीक आहे. आपण बरोबर चहा घेतला."

या नंतर शेट बिरलाजी तेथून गेल्यावर आंगण्यातील मोठे कार्यकर्ते म्हणू लागले कीं, तात्यारावांनी हिंदुसभेसाठीं पैसे देण्याकरतां आलेल्या इसमास परत पाठविलें. म. गांधींनीं असें केलें नसतें. त्यावर सावरकर उद्गारले कीं, 'मी हिंदुसभेचा अधिकृत पदाधिकारी कोणीही नाहीं. जर त्यांना हिंदुमहासभेला पैसे द्यावयाचेच असल्यास डॉ. खरे हे अध्यक्ष आहेत, आशुतोष लाहिरी नि प्रा. वि. ग. देशपांडे हे कार्यवाह आहेत. त्यांचे जवळ पैसे द्यावेत. माझ्या हातांत कशाला?'

## १५६. असा महापुरुष अनेक शतकेंहि होणार नाही.

हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या वाटाघाटी जोरात सुरू झाल्या. ब्रिटिश सरकारनें आपलें एक शिष्टमंडळ दिल्लीस पाठविलें. त्या शिष्टमंडळाचे नेते सर स्टॅफर्ड क्रिप्स होते. त्यांनी हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या पक्षांच्या लोकांना बोलावलें. ज्या त्या पक्षाचे पुढारी दिल्लीस जमले. हिंदुमहासभेचे अध्यक्ष त्या वेळीं स्वातंत्र्यवीर सावरकर होते. त्यांनाही बोलावण्यांत आलें. शिष्टमंडळाची भेट घेऊन त्यांच्याशीं कसा नि कोणत्या प्रकारें वाटाघाटी कराव्यात याचा विचार करण्यासाठीं स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं हिंदुमहासभेच्या वर्किंग कमिटीची बैठक दिल्लीस बोलावली होती. पुढें जेव्हां क्रिप्सच्या भेटीची वेळ ठरली, त्या वेळीं स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बरोबर डॉ. मुंजे, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, श्री. इंद्रप्रकाश हे होते. भेट व्हाईसरॉय लॉजवर झाली, पण त्या भेटीत कांहींहि निष्पन्न निघालें नाहीं. हिंदुमहासभा भवनांत आल्यावर आम्ही जे लोक हिंदुसभाभवनांत होतो त्यांना



क्रीप्स भेटीची हकीगत सांगतांना कै. डॉ. मुंजे हे गहिंवरले आणि म्हणाले कीं "तात्याराव सावरकर केवढे अमाप बुद्धीच्या झेपेचे पुरुष आहेत ते मला नि श्यामाबाबूंना कळलें. ते पुढें म्हणाले कीं आम्ही क्रिप्सच्या भेटीसाठीं गेलों तेव्हां दारावर क्रिप्सच्या सेक्रेटरीनें आमचें स्वागत केलें. नंतर क्रिप्स व त्यांचे सहकारी एका बाजूस बसले नि समोर मी, डॉ. मुंजे, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी व इंद्रप्रकाश बसलों. क्रिप्सनें आमच्या हातात त्यांची जी योजना होती तिच्या टाईप केलेल्या प्रति दिल्या. एक प्रत क्रिप्सने आपल्या हातांत ठेवली. आम्ही पहिल्यापासून सर्व योजना वाचूं लागलों. पांचसात मिनिटें होतात न होतात तोंच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी एका पानावर बोट ठेवलें व क्रीप्सला विचारलें कीं, यांत कांही बदल होणार का? क्रीप्स म्हणाले मुळीच नाहीं. लगेच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तो कागद क्रिप्सकडे फेकला व उठून चालू लागले. तात्याराव निघून चालले तेव्हां आम्ही तेथेच बसणार? आम्हीही त्यांच्यामागें चालू लागलों. क्रिप्सने आपल्या सेक्रेटरीस तात्यारावांना परत बोलावून विनंती केली कीं आपण या पानाशिवाय इतर विषय जे आहेत त्या संबंधी बोलूं व वाटाघाटी करूं. वीर सावरकर म्हणाले इतर विषयांच्या वाटाघाटी करण्यांत काय अर्थ आहे? या तुमच्या योजनेंत आणि मी दाखविलेल्या पानांत स्वयंनिर्णय—प्रांतांना फुटून निघण्याचा अधिकार—असून त्यांतच पाकिस्तान निर्मिति आहे.

परत येत असतांना आम्हांस कॉंग्रेसचे अध्यक्ष अबुलकलाम आझाद वगैरे लोक भेटले. त्या दिवशीं मी व डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांना तात्यारावांच्या बुद्धीची, कर्तृत्वाची व राष्ट्रप्रेमाची झेप केवढी आहे तें कळलें. असा महापुरुष या देशांत शतकानुशतकें होणार नाही."

पुढें ही योजना कॉंग्रेसने क्रिप्सच्या तीन चार भेटी झाल्यावर फेटाळली. कारण स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लगेच पत्रक काढून ही जी क्रिप्सची योजना आहे त्यांत पाकिस्तान आहे, असें सर्वांच्या निदर्शनास आणलें व त्याचा परिणाम कॉंग्रेसपक्षावर झाला.

## १५७. हरिजनांबद्दल केवढी आस्था!

स्वातंत्र्यवीर सावरकरांना ६१ वें वर्ष लागल्यानंतर जनतेने त्यांचा ६१ वा वाढ दिवस करण्याचें आणि एक मोठी रक्कम जमवून एक थैली

त्यांना अर्पण करण्याचें ठरविलें. त्याच दिवशीं पुणें नगरपालिकेने त्यांना मानपत्र अर्पण करावयाचें ठरविलें. हरिजन समाजानेही त्यांचा सत्कार करावयाचें ठरवून सहभोजन करावयाचें ठरविलें होतें. पण रेशनिंग असल्याने व युद्ध चालू होतें म्हणून हिंदुस्थान सरकारने जेवणावळीस बंदी केली होती. म्हणून आम्ही अखिल हिंदूंचें सहचहापान करण्याचें ठरविलें होतें. त्या समारंभाचे अध्यक्ष कै. प्रो. श्री. म. तथा बापूसाहेब माटे हे होते. हा समारंभ माझ्याच घरच्या अंगणांत झाला होता. त्या समारंभास स्पृश्य नि अस्पृश्य मंडळी मिळून माझ्या कल्पनेप्रमाणे किमान हजारावर लोक होते. ठरलेल्या वेळाचे आंत कार्यक्रम आटोपणे आवश्यक होतें. परंतु भाषणें बरीच लांबलीं व शेवटीं त्यांचें भाषण व्हावयाचें होतेंच. वेळ संपला. कारण दुपारीं ठीक ४ वाजता नगरपालिकेचें मानपत्र स्वीकारावयाचें होतें. वेळ संपला म्हणून नगरपालिकेचे चीफ ऑफीसर, अध्यक्ष नि इतर सभासद आले व मला म्हणाले. 'हा तुमचा समारंभ लवकर आटोपा. नगरपालिकेचा महत्त्वाचा मानपत्राचा समारंभ आहे.' हे शब्द स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ऐकले व म्हणाले "काय? या समारंभापेक्षा नगरपालिकेचा समारंभ महत्त्वाचा ? नाही. हाच समारंभ नगरपालिकेच्या मानपत्रापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. या सर्व पददलित जनतेची होतील तितकी भाषणें झाली पाहिजेत. माझें भाषण होईल, आणि नंतर नगरपालिकेचें मानपत्र स्वीकारावयास जाईन." केवढी हरिजन समाजाबद्दल ही आस्था नि हें प्रेम !

## १५८. स्वातंत्र्यवीरांची निवड

कॉंग्रेस, मुस्लिम लीग नि ब्रिटिश सरकार यांनी कट करून देशाचीं तुकडें करण्याचा घाट घातला असून त्याप्रमाणे ते पावले टाकू लागले आहेत म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या हिंदुमहासभा अध्यक्षीय भाषणांत नि पत्रकांत वेळोवेळीं ही सूचना हिंदुस्थानांतील जनतेस दिली होती. त्यांतच त्यांनी "ॲन्टी पाकीस्तान फ्रंट" ही परीषद दिल्लीस सर राधाकुमुद मुखर्जी यांचे अध्यक्षतेखाली बोलाविली. परिषद यशस्वीरीत्या पार पडली. नंतर त्यापैकी स्थायी समिती नेमण्याचें ठरलें. त्यावर कोणा कोणास घ्यावें ही जेव्हा चर्चा सुरू झाली त्यांत कॉंग्रेसी विचाराचे एक हरिजन कार्यकर्ते यांचे नि



माझे अशी दोघांचीं नांवें आलीं. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी माझ्याच नांवास उचलून धरलें व म्हणाले, "हे कॉंग्रेसवादी जे पूर्वास्पृश्य गृहस्थ आहेत. जर उद्या कॉंग्रेसने पाकिस्तान देण्याचें ठरविले तर हे कॉंग्रेसवादी हरिजन शिस्त म्हणून पाकीस्तानलाच पाठिंबा देतील." हा युक्तिवाद सर्व सभागृहाला पटला नि माझें नांव स्थायी समितीत मान्य झालें. आज ते हरिजन गृहस्थ कॉंग्रेसी मंत्रिमंडळांत आहेत. केवढी ही स्वातंत्र्यवीर सावरकरांची दूरदृष्टि व माणसांची पारख !

## १५९. एका खिशांत गांगुर्डे, एका खिशांत डावरे

एकदा माझी व कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली होती. डॉ. बाबासाहेब मला म्हणाले, सावरकर हे कसले सुधारक नि पुरोगामी ! एका खिशांत सनातनी विश्वासराव डावरे व दुसऱ्या खिशांत गांगुर्डे ! मी स्वातंत्र्यवीर सावरकरांना डॉ. बाबासाहेब यांनी वरील काढलेले उद्गार सांगितलें तेव्हा हे कसे ? स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले यात मी कायटेंस! एका खिशांत विश्वासराव डावरे नि दुसऱ्या खिशांत कृष्णराव गांगुर्डे हेंच खरें हिंदुसंघटन; सनातनी, सुधारक, पुरोगामी, प्रतिगामी या सर्व मंडळींना राष्ट्रीय ऐक्यासाठी एकत्र आणणें फारच महत्त्वाचें आहे. ज्याचा त्याचा राष्ट्राच्या हितासाठी उपयोग करून घेणें हेंच खरें राष्ट्रीय ऐक्य व हिंदुसंघटन आहे.

## १६०. आमच्या विचारांचे म्हणून मागूनच येईन.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना रत्नागिरीतून विनशर्त ब्रिटिश सरकारने सोडलें. नंतर ते कोल्हापूरमार्गे पुण्यास आले. पुण्यास आल्यानंतर सर्व पक्षांतील, सर्व थरांतील नि सर्व जमातींतील मंडळी या देशभक्ताचें स्वागत करण्यासाठी अहमहमिकेने पुढे आली व आपापल्या पक्षातर्फे, समाजातर्फे मानपत्र देण्यासाठी म्हणून त्यांचेकडे लोकांची रीघ लागली. आम्ही राष्ट्रीय विचाराचे हरिजनही त्यांना मानपत्र द्यावें म्हणून त्यांचेकडे वेळ ठरवून घेण्यासाठी गेलों. आमच्या बरोबर कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी हेही त्यांना मानपत्र देण्यासाठी त्यांचेकडून वेळ ठरवून

घेण्यासाठी आले होते. जो तो आमच्याकडे अगोदर चला असे सांगू लागला. आमचा तर त्यांच्यावर हक्क होता. आम्ही तात्यारावांना म्हणालों, आम्ही राष्ट्रीय विचाराचे जे हरिजन आहोत त्यांना आपण अगोदर वेळ द्यावी व नंतर इतर हरिजन मंडळींना द्यावी. आम्ही दोन्ही विचाराचे लोक तात्यारावांकडे अगोदर जाणार म्हणून वादविवाद करूं लागलों. लगेच तात्याराव आम्हांस म्हणाले, " तुम्ही माझ्या विचाराचे आहांत म्हणून मी पहिल्यांदा डॉ. आंबेडकर यांचे जे अनुयायी मला बोलावण्यासाठी आले आहेत त्यांचेकडे जातो; नंतर तुमच्याकडे येतो." आम्हांस मात्र वाईट वाटलें, पण ते लगेच म्हणाले " तुम्ही जर आमच्या विचाराचे आहात तर तुमच्याकडे नंतर येणें हेंच योग्य आहे व हेंच खरें हिंदुसंघटन आहे."

## १६१. अहोरात्र तीन दिवस पंडितांची चर्चा

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ जोरांत चालू झाली होती. ब्रिटिश सरकारही तडजोडीची भाषा बोलत होतें नि कांही वसाहतीच्या दर्जाचे अधिकार हिंदुस्थानच्या जनतेस देण्यास तयार झालें. परंतु हिंदुस्थानच्या जनतेने एकमुखी मागणी करावी हें मात्र त्यांचें मुख्य सांगणें होतें. मुसलमान समाज हा स्वतंत्र मतदार मिळाल्या वाचून सहकार्यास तयार नव्हता. म्हणूनच या गोष्टीला विलंब लागला व ती तडजोड पुढे ढकलली जात होती.

हिंदुस्थानला कांही अधिकार खासच मिळणार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही वाटत होतेंच. म्हणून त्यांनीही या स्वराज्यांत आम्हा अस्पृश्यांनाही हिस्सा पाहिजे वगैरे स्वरुपाची मागणी केली. भारतांतील तथाकथित हिंदु-पुढारी अस्पृश्य हे हिंदुच आहेत मग हिंदुजनतेस जे अधिकार मिळतील त्यांतच अस्पृश्य समाजाचाही समावेश होणार म्हणून डॉ. आंबेडकरांची स्वतंत्र मागणी नकोच असे म्हणत असत. कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटीं असा दावा मांडला की, आम्ही जर हिंदुच आहोत तर मग जे हिंदुत्वाचे अधिकार म्हणजे अस्पृश्यांना मंदिरप्रवेश, हॉटेल प्रवेश, पाणवठा-प्रवेश, शैक्षणिक प्रवेश असा या मूलभूत गरजा आहेत त्या आम्हास नाहीत. इतकेंच काय पण आम्ही हिंदु असून आम्हास शिवत तर नाहीत पण कुत्र्यामांजराप्रमाणे हीन लेखून आम्हास गुलाम बनविलें आहे. याचें प्रत्यंतर



देण्यासाठी म्हणून महाड येथे सार्वजनिक पाणी भरण्याचें जें तळें होतें त्यावर पिण्याचे पाण्यासाठी सत्याग्रह केला. पर्वती नि नाशिक पंचवटी, काळाराम-मंदिर प्रवेश सत्याग्रहही केले. परंतु सवर्ण हिंदूंच्या अंतःकरणास पान्हा न फुटल्याने त्यांनी याही वेळी या सत्याग्रहास विरोध केला व पूर्वपरंपरेने, रूढीने आलेला हाच हिंदुधर्म म्हणून अस्पृश्य समाजास बंदी करून ठिक-ठिकाणीं मारझोडसुद्धा करूं लागले होते हें सर्व लक्षांत घेऊन, अस्पृश्य हे हिंदु आहेत; त्यांना हिंदुत्वाचे सर्व हक्क उपभोगण्याचा पूर्ण अधिकार आहे. अस्पृश्यता ही रूढि आहे म्हणून प्रचार करण्यास स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सुरवात केली नि अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचा सपाटा चालविला. इतकेंच काय पण अखिल हिंदुसाठी ' पतितपावन ' मंदिरही बांधलें व शेजारीच सर्व हिंदुसाठी उपहारगृहही सुरू केले.

पतितपावन मंदिर बांधले इतकेंच काय पण त्यांत असलेल्या मूर्तीची पूजा सुद्धा वेदोक्त पद्धतीने एक भंगी समाजाचे मुलाचे हस्तें करावयाचा जाहीर संकल्प त्यांनी केला. इतकें करून तात्याराव थांबले नाहीत तर बनारस, प्रयाग आदि भागांतून मोठमोठाल्या वेदशास्त्रसंपन्न शास्त्री पंडितांना त्यांनी निमंत्रणें केलीं व बोलावून घेतलें. असे शास्त्री व पंडितांना तसें आम्हा हरि-जनांनाही सर्व महाराष्ट्राच्या बहुतेक जिल्ह्यांतून बोलाविलें होतें.

याप्रमाणे वेदशास्त्रसंपन्न असे अनेक सनातनी शास्त्री पंडित व अस्पृश्य हे तर आलेच पण खुद्द शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटि) हेही उपस्थित होते. एका बाजूस स्वातंत्र्यवीर सावरकर नि दुसऱ्या बाजूस ही शास्त्री-पंडित मंडळी असा वादविवाद सुरू झाला. पूर्ण तीन दिवस नि तीन रात्री ही चर्चा चालू होती. हे सर्व धर्मग्रंथाचे आधार व संस्कृतवचनें देऊन एकमेकांचें खंडन-मंडन चाललें होतें. १००।१२५ शास्त्री पंडित एका बाजूस नि एका बाजूस स्वातंत्र्यवीर सावरकर असून त्यांना अधूनमधून डॉ. कुर्तकोटि शंकराचार्य साथ देत असत. डॉ. शिंदे नि भागूजीशेट कीर, विष्णुपंत दामले ही वीर सावरकरांची निष्ठावान् मंडळी त्यांचे दुसऱ्या बाजूस होती.

आमच्यासारख्यांना हीं संस्कृत वचनें, हा वादविवाद कसा समजणार ? कारण आम्हास कोणी शिकविलेंही नाही म्हणून आम्ही शिकलोंही नाही. पण ही सर्व चर्चा पाहूं गेल्यास स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या सर्व शास्त्री

डितांना हरविलें व हिंदुधर्मात अस्पृश्यता नाही, ती रूढीने आली आहे असें वदवून घेतलें. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा या सर्व पण महत्त्वपूर्ण वाद-विवादांत जय झाला. आमचीं अंतःकरणे सद्गदित झालीं नि केवढा हा अस्पृश्यांना कैवारी परमेश्वराने निर्माण केला असे जो तो अस्पृश्य म्हणू लागला.

शास्त्रीपंडितांनी शेवटीं स्वातंत्र्यवीर सावरकरांना असें सांगितलें की, "हें तुमचे शास्त्राच्या पद्धतीने अगदी बरोबर आहे. पण समाज अजून फार मागासलेला आहे, त्याला आपलें हें कृत्य झेपणार नाही हीच अखेरची विनंती आहे."

स्वातंत्र्यवीर सावरकर 'हसले' व 'ठीक आहे' असें उद्गारले. शेवटीं त्या पतितपावन मंदिरांतील मूर्तीची स्थापना भंगी मुलाकडून वेदोक्त पद्धतीने स्वातंत्र्यवीरांनी करून घेतली. त्या मुलास स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वेदविद्या चांगली शिकविली होती.

## १६२. सावरकर आरोपी असतां सावरकर-जयन्ती

स्वातंत्र्यवीर सावरकर हे १९३७ सालीं प्रथम अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाले. तेव्हापासून सबंध भारतांत 'सावरकर जयन्ती' हिंदुसभेच्या वतीने आणि कांहीं उत्स्फूर्त लोक करूं लागले होते. पण गांधीजींचा वध झाल्याने सरकारने त्यांना पकडून एक आरोपी केलें. पुढे त्या खटल्यांत ते निष्कलंक सुटले. १९३७ सालापासून देशांत सावरकरजयंती सुरु झाली होती व त्याप्रमाणे दिनांक २८ मे १९४९ हा दिवस जवळ येऊं लागला. तेव्हा मी व माझे मित्र श्री. रा. स. भट यांनी विचारविनिमय केला की, यंदा सावरकर जयंती आपण प्रतिवर्षाप्रमाणे केली पाहिजे. मीच अध्यक्ष झालों. ती जयंतीची शनिवारवाड्यापुढील प्रकट सभा इतकी मोठी झाली की, किमान दहा हजार तरी लोक त्या सभेस आले असावेत, असा अंदाज आहे.

या सभेचा वृत्तान्त मात्र सर्व वृत्तपत्रांत थोड्या प्रमाणांत आला आणि तो स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाचण्यांत आला होता. स्वातंत्र्य-वीर सावरकरांना जेव्हा हें सर्व कळलें तेव्हा त्यांचें अंतःकरण भरून आलें.



ते भटांना व मला म्हणाले की, एवढा विरोध असतांना कोणाच्याही विरोधास तुम्ही न जुमानतां माझी जयंती जाहीर रीत्या केलीत. धन्य तुम्ही नि धन्य तुमचें कार्य !

## १६३. शत्रूचा शत्रु तो आमचा मित्र

१९३८ साली अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर झाले तेव्हापासून हिंदुसभेला राजकीय स्वरूप प्राप्त झालें. कॉंग्रेस व गांधी यांचेकडे बहुसंख्येने जनता आकृष्ट झाली होती. त्यांचें तत्त्वज्ञान हें राष्ट्रहितासाठी खरें पोषक नव्हतें; पण गांधी यांचा प्रभावच जनतेवर इतका मोठा होता की, कोणी विरोधास धजत नसे व जो कोणी विरोध करीत असे त्यास भारतीय नेतृत्व प्राप्त होत नसे. किंबहुना त्यांचें तत्त्व-ज्ञान जरी पटत होतें तरी लोकांत या विरोधाला फारसें महत्त्व नव्हतें. स्वातंत्र्यवीर सावरकर अ. भा. हिंदुमहासभेचे जेव्हा अध्यक्ष झाले तेव्हा लोकांच्या मनावरचा गांधींच्या पुढारीपणाचा पगडा उडूं लागला व स्वातंत्र्यवीर सावरकरांचें नेतृत्व लोक दिवसेंदिवस मानूं लागले. इतकेंच काय पण ब्रिटिश सरकारलाही त्याचा हादरा बसू लागला. १९४१ डिसेंबर महिन्यांत अ. भा. हिंदुमहासभेचें अधिवेशन भागलपूरला घेण्याचें ठरविलें. हिंदुसभेला दडपण्याची ही चांगली संधि आहे म्हणून ब्रिटिश सरकारने त्या अधिवेशनावर बंदी घातली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लगेच पत्रक काढून प्रसिद्ध केलें की, ब्रिटिश सरकारने आम्हांस चिरडण्यासाठी म्हणून ही जरी बंदी घातली असली तरी हें भागलपूरला घेतलेलें अधिवेशन ठरलेल्या दिवशीं होणारच व मी तें अधिवेशन भरविणारच. त्याप्रमाणे भारतातील सर्व प्रांतांना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी चेतावणी दिली.

आम्ही पुण्याहून कै. रामभाऊ राजवाडे यांच्या नेतृत्वाखाली भागलपुरास गेलों. सुदैवानें स्वातंत्र्यवीर ज्या गाडींतून निघाले तीच सावरकरांची गाडी आम्हांस मिळाली. रात्रीं साधारण दोन वाजण्याच्या सुमारास 'गयेच्या' स्टेशनवर डी. एस. पी. यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना अत्यंत अदबीने सरकारी वारंट दाखविलें नि आपणास पकडण्याचा सरकारचा हुकूम आहे असें ते नम्रभावाने म्हणाले. तेव्हा स्वातंत्र्यवीर

सावरकर आपला भगवा ध्वज हातांत घेऊन गाडींतून खाली उतरले. नंतर डी. एस. पी. साहेबांनी त्यांना एखाद्या मोठ्या बादशाही इतमामानें आपल्या स्वतःच्या मोटार गाडींतून जेलमध्ये नेलें.

आम्ही पुढें भागलपुरास गेलों व स्टेशनबाहेर येतांच आम्हांसही सरकारनें पकडलें व जेलमध्ये नेलें. पुढे इतके प्रतिनिधि भागलपूरला येऊं लागले कीं, त्या जेलमध्ये जागा होईना. म्हणून आम्हांस तेथून पाटण्याच्या 'कॅंप' जेलमध्ये नेण्यांत आलें.

पुढे कांही दिवसांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांना सरकारने सोडलें व आम्हांसही सोडण्याचा हुकूम झाला. स्वातंत्र्यवीर सुटतांक्षणीं गयेच्या जनतेनें त्यांचें प्रचंड व्याख्यान ठेवलें.

कै. नथुराम गोडसे व कै. नानासाहेब गोखले यांचेकडे जेलमधील सर्व सत्याग्रहींच्या भेटींसाठी येणें वगैरे व्यवस्था होती.

आम्ही सुटण्याच्या दिवशीं लगेच नथुराम गोडसे व नानासाहेब गोखले आमच्या जेलसमोर येऊन उभे राहिले आणि म्हणाले तुम्ही लगेच गयेस चला. आज रात्रीं गयेला स्वातंत्र्यवीर सावरकरांचें व्याख्यान आहे. त्या सभेची व्यवस्था आपणांस करावयास पाहिजे. आम्ही एकीलेवी पाटण्यास आलों तेव्हा पाटणा शहर पहावें असाही थोडासा मोह झालाच. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांची आशा होती कीं, आम्हीं त्यांच्या सभेची व्यवस्था करण्यासाठी गयेस यावें. म्हणून कोणताही विचार न करतां आम्ही गयेला आलों. तेथे फक्त तेथील लोकांनी व्यासपीठ घातलें होतें. बाकी सर्व व्यवस्था आम्ही आमच्या पद्धतीनें केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट घेतांक्षणीं ते आम्हांस म्हणाले सभेच्या व्यवस्थेसाठी तुम्ही आलांत ना? आम्ही म्हणालों, 'होय'. ते म्हणाले, "कशी काय व्यवस्था केली?" आम्ही उद्गारलों "पुण्यासारखी." तात्याराव म्हणाले, "पुण्यासारखी?"

हें चालू असतांनाच तेथील कॉलेजचे अनेक तरुण २०।२५ च्या तुकडीनें वीर सावरकरांना भेटून त्यांचे बरोबर चर्चा करून प्रश्न विचारीत होते. त्यांत 'आपलें आंतरराष्ट्रीय धोरण कसें असावें' असा एक प्रश्न होता. तात्याराव म्हणाले, "त्या त्या वेळीं तें ठरवावें लागतें. ज्याची ज्याची जशी गरज राष्ट्राला पाहिजे ती ती त्या त्या वेळीं घेणें व देणें आवश्यक आहे. "शत्रूचा



जर असला तर शत्रूचा शत्रु तो आमचा त्यावेळचा मित्र." हें सूत्र त्यांनी त्या तरुणांना सांगितलें.

दुसरें महायुद्ध चालू होतें. सैनिकीकरण हें सूत्र या युद्धासंबंधी सावरकर लोकांना सांगत होते. कांग्रेसची वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ व युद्धविरोधी घोषणाही चालू होती. सावरकरांना विद्यार्थी म्हणूं लागले की स्वातंत्र्याची चळवळ चालू आहे. आपण त्यांत सामील कां होत नाहीं? सावरकर म्हणाले, "कांग्रेसने आपला स्वयंनिर्णयाचा ठराव मागे घ्यावा व देशाचे तुकडे कधीही होऊं देणार नाही असें जाहीर आश्वासन दिल्याशिवाय व तसा ठराव केल्याशिवाय मी त्यांच्या चळवळींत भाग घेणार नाही."

शेवटीं हें स्वातंत्र्यवीर सावरकरांचें कांग्रेसच्या धोरणाबाबतचें भाकीत कसें सत्य ठरलें हें जनतेला नंतर कळून आलेंच.

## १६४. पक्षापेक्षा देश मोठा आहे.

हिंदुमहासभा पक्षांत मुसलमान ख्रिस्ती अहिंदुही घेतले पाहिजेत, नुसत्या हिंदूंचाच पक्ष नको म्हणून हिंदुसभेतील कांही पुढाऱ्यांनी आग्रह धरला. त्यांत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी हे प्रमुख होते. तो इतका वाढला कीं, हिंदुसभा पक्षांत फार मोठ्या प्रमाणांत भांडणें उत्पन्न झालीं. इतकेंच काय पण अ. भा. कार्यकारिणीपासून तो थेट ग्रामहिंदुसभेपर्यंत याचा प्रतिध्वनि निघाला. स्वातंत्र्यवीर सावरकर मात्र हिंदुमहासभेंत मुसलमानादि अहिंदूंना घेऊं नये, कारण पाकिस्तान जोपर्यंत शेजारी शत्रु राष्ट्र म्हणून आहे तोपर्यंत व आणखीही या देशाचे तुकडे पडण्याची शक्यता निर्माण झाली असल्यानें हिंदूंसाठीं या देशांत हिंदूंचा असा राजकीय पक्ष असलाच पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादन करूं लागले. पण हिंदुसभेंतील कांही मंडळी हें त्यांचें म्हणणें मानण्यास तयार होईनात. किंबहुना विरोध अधिक वाढूं लागला. हिंदुसभा लोकशाही संघटना असल्यानें सावरकरांच्या विचारांशीं जे विरोधी होते ते म्हणूं लागले कीं, "आम्ही बहुमत करूं व हें आमचें म्हणणें संमत करून घेऊं." त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "मी पक्षापेक्षा देश मोठा मानणारा आहे. आणि जर मुसलमानादि अहिंदुंना हिंदुसभेंत प्रवेश मिळणार असेल तर मी अ. भा. हिंदुमहामंडळ स्थापीन आणि कोणीही मोठा माणूस

मला अध्यक्ष मिळाला नाही तर मी गांगुर्डे यांना अध्यक्ष करीन." शेवटीं स्वातंत्र्यवीर सावरकरांचेंच म्हणणें पक्षास मान्य करावें लागले.

### १६५. कुठे आहेत ते गांगुर्डे

ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांना अंदमानांतून परत आणून रत्नागिरीस स्थानबद्ध करून ठेवलें होतें व त्यांचेवर राजकारणांत भाग घ्यावयाचा नाही म्हणून एक बंधन घातलें होतें. स्वातंत्र्यवीर सावरकर हे अस्पृश्यतानिर्मूलन करण्याचें काम रत्नागिरी जिल्ह्यांत करू लागले. त्यांतील एक भाग म्हणून अस्पृश्यांसह अखिल हिंदुगणेशोत्सव त्यांनी सुरू केला. अशा प्रकारचा उत्सव भारतामध्ये प्रथम त्यांनीच सुरू केला असल्याने त्यास फारच महत्त्व प्राप्त झालें होतें. त्यास पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याने त्याचा रौप्य महोत्सव स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हस्तें करावा म्हणून रत्नागिरींतील मंडळींनी ठरविलें व तसें स्वातंत्र्यवीर सावरकरांना सांगितलें. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही त्या उत्सवास येण्याचें मान्य केलें आणि त्याप्रमाणे सर्व तयारी झाली.

परदेशी मिशनऱ्यांनी या देशांतून जावें म्हणून आम्ही जेसुइटांच्या मिशनवर मोर्चा नेलेला असल्याने तो मोर्चा संपवून आम्ही रत्नागिरीस आलों. उत्सव यशस्वीरीत्या पार पडला. नंतर मोर्चाचा रत्नागिरीच्या कार्यक्रमाचा संदेश सांगण्यासाठी मी व माझे मित्र श्री. रा. स. भट हे रत्नागिरीहून कराडला जावयाचें ठरविलें. पण ज्या मोटारने आम्ही कराडला येण्यासाठी निघालों ती मोटार फक्त चिपळूणपर्यंतच होती म्हणून आम्ही चिपळूणला थांबलों. तेथे शुणकाभाकर सत्यनारायण प्रवर्तक समतानंद तथा अनंत हरि गद्रे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे करवी शुणकाभाकर सत्यनारायण हा कार्यक्रम ठरविला होता नि त्याची तयारी तेथील चित्रपट गृहांत चालू होती. कर्मवीर अनंत हरि गद्रे यांनी आम्हांस पाहिल्यानंतर त्यांनी अतिशय आग्रह केला की " तुम्ही आमचा हा समारंभ पूर्ण केल्याशिवाय कराडला जाऊं नका. शिवाय स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अस्पृश्यता निर्मूलनांतीलच हा कार्यक्रम त्यांच्या प्रेरणेने मी सुरू केला आहे व ते येथे आता एक तासाने येणार आहेत." अनंतराव यांचा अतिशय आग्रह तर



झालाच पण मलाही माझा हा अत्यंत आवडीचा विषय आणि हेंच काम मी आयुष्यभर केलें त्यांतीलच एक भाग म्हणून, शिवाय स्वातंत्र्यवीर सावरकर हेही येतात म्हणून मला त्या समारंभांत भाग घेण्याचा मोह कसा आवरेल? म्हणून मी व श्री. रा. स. भट राहिलों. स्वातंत्र्यवीर सावरकरांचें, समतानंद अनंत हरि गद्रे यांचें आणि माझें भाषण झालें. समारंभ यशस्वी झाला. शेवटी फोटो काढण्याचा कार्यक्रम होता. मी फोटोसाठी उभा राहिलों नाही. पण स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "अनंतराव, गांगुर्डे कोठें आहेत" अनंतराव गद्रे म्हणाले. 'हे समोर उभे आहेत.' तेव्हा तात्याराव म्हणाले, " गांगुर्डे माझ्याबरोबर या फोटोंत असल्याशिवाय हा फोटोचा कार्यक्रम होणार नाही." नंतर मी फोटोंत उभा राहिलों आणि फोटो काढला. केवढें हें अनुयायाबद्दल प्रेम ! केवढा थोर मनाचा हा पुढारी !

### १६६. राष्ट्रपतींची भेट नाकारली.

१० मे १९५७ ला दिल्ली येथे १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा शताब्दी उत्सव करण्याचें जनतेने ठरविलें. त्या शताब्दीच्या उत्सवासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांना अध्यक्ष म्हणून बोलाविलें होतें. त्याप्रमाणे त्यांनी शताब्दी उत्सवांत अत्यंत स्फूर्तिदायक भाषण करून देशांतील जनतेस हें स्वातंत्र्य टिकविलें पाहिजे म्हणून चेतना दिली. त्याच भाषणांत स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "कोणत्याहि हिंदुस्थानच्या हितार्थ झटणाऱ्या ब्रिटिश व्हाईसरायापेक्षा माझे नि राष्ट्रपति राजेंद्रबाबूंचे कांही मतभेद असले तरी राजेंद्रप्रसादच मला माझ्या दृष्टीने अत्यंत मोठे आहेत."

या त्यांच्या भाषणानंतर दुसरे दिवशी राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें स्वातंत्र्यवीर सावरकरांना फोनोनें निमंत्रण आलें नि त्यांना राष्ट्रपतिभवनांत बोलाविलें. मी आणि माझ्याप्रमाणे इतरही आमच्यातील मोठमोठे त्यांचे जे अनुयायी होते त्यांनीं जो तो तात्यारावांच्याबरोबर राष्ट्रपतींना भेटण्यासाठी जाण्याची इच्छा स्वतःपुरतीच व्यक्त करू लागला नि आपणांस आता तात्यारावांच्या बरोबर राष्ट्रपति भवनांत राष्ट्रपतींना भेटण्याचा योग येणार अशा ऐटींत होता.

पण स्वातंत्र्यवीर सावरकरांनी चक्क सांगितलें की, "मला आपली (राष्ट्रपतींची) भेट नको आहे. माझी प्रकृतीही बरी नाही. शिवाय मी मुंबईस जाण्यासाठी निघालों असून तिकिटही रिझर्व केलें आहे."

त्यानंतर आमच्यापैकील मंडळींनी तात्यारावांना विचारलें की, आपणांस राष्ट्रपति आपल्या भेटीसाठी आपणहून बोलावीत असतां आपण ही संधि कशी वाया घालविता? या भेटीमुळे आपला किमान व्यक्तिगत तरी फायदा होईल.

त्यावर स्वातंत्र्यवीर सावरकर आम्हांस म्हणाले की, "मला त्यांची भेट घेऊन कांहीही साधावयाचें नाही. त्यांना जर मला भेटावयाचें असेल तर त्यांनी माझ्याकडे येण्याने त्यांचा असा काय तोटा होणार आहे? आपणहून ते जर विनोबांच्या भेटीस जातात तर माझ्याकडे येण्यास त्यांना काय हरकत आहे?"

केवढे हे निष्काम कर्मयोगी पुरुष! राष्ट्रपतींची आपणहून आलेली भेट किंवा तें भवन त्यांना हे व्यक्तिशः किती महत्त्व देतात हें पटवून दिलें. कारण हे स्वतः त्यापेक्षाही मोठे नाहीत काय? असा माझा सवाल आहे.

## १६७. चार कोट मुसलमानांचा प्रश्न कसा सोडविणार?

सन १९५० किंवा १९५१ असेल. मी कांही कामानिमित्ताने मुंबईस गेलों असतां स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट घेण्यासाठी सावरकरसदनांत गेलों होतों. वेळ साधारण १०-३० ची असावी. त्या वेळीं त्यांच्याबरोबर मुंबईच्या एका मराठी दैनिकाचे सहसंपादक चर्चा करताना दिसले. ते सहसंपादक महाशय स्वातंत्र्यवीर सावरकरांना म्हणाले, 'आपण पूर्वी (पाकिस्तान होण्यापूर्वी) असें म्हणाला होता की, दरडोई एकमत, मग तो जातिधर्माने कोणी का असेना? तेव्हा आता पाकिस्तान झालें आहे व या देशांत चार कोट मुसलमान आहेत. आपण लोकशाही मानतां, तेव्हा लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे आपण या चार कोट मुसलमानांचा प्रश्न कसा सोडविणार?' त्यावर स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणाले, "आपण म्हणतां त्याला उत्तर असें की, मी आपणांस भाड्यासाठी पैसे देतों, पासपोर्ट काढण्याची जबाबदारी आपली आहे. आपण आताच कराचीला (पाकिस्तान) जा आणि पाकचा मुख्यप्रधान लियाकत अल्ली यास विचारा की, पाकिस्तानांत एक कोट हिंदु आहेत. त्यांची सोय



आपण कशी लावली किंवा लावणार आहांत? लियाकत अल्ली पाकिस्तानांत असणाऱ्या हिंदूंची जशी सोय लावील तशीच सोय हिंदुस्थानांतहि आम्ही मुसलमानांची लावू. हेंच त्याचें उत्तर." ते सहसंपादक महाशय मनाने हिंदुत्वनिष्ठ असल्याने त्यांना तात्यारावांचें म्हणणें पटलें.

कृष्णराव गांगुर्डे, पुणें.

* * *

## १६८. क्रांतिकारकांचे चरित्रलेखक हेही क्रांतिकारकच!

सुप्रसिद्ध पार्श्वसंगीत गायिका कु. लता मंगेशकर यांच्या वडिलांच्या चरित्रग्रंथाचें 'मा. दीनानाथ स्मृति-दर्शन' चें काम इ. स. १९५० सालीं मी, लता व श्री. वि. ना. कोठीवाले करीत होतों. मा. दिनानाथ यांच्या आठवणींची मागणी करायला मी तात्यांच्या घरीं, दादरला सावरकरसदनांत गेलों. कारण, त्यांच्या 'संन्यस्तखड्ग' या नाटकांत मा. दीनानाथ नायिकेची – सुलोचनेची – भूमिका करीत असत. त्याची आठवण तात्यांनी आम्हांला सांगितली व ती आम्ही लिहून घेतली.

नंतर एकमेकांचा परिचय करून दिल्यावर तात्या मला म्हणाले,—

"तुम्ही राजगुरु यांच्या भाची आहात; तेव्हा तुम्ही आपल्या क्रांतिकारक मामांचें जीवनचरित्र कां लिहून काढीत नाही? अहो, क्रांतिकारकांचे चरित्रलेखक, हेही मी क्रांतिकारकच मानतों, समजतों. तुम्ही राजगुरूंचें चरित्र लिहून पूर्ण करा. मी तें स्वतः प्रसिद्ध करीन."

## १६९. अशा वेळीं शिवाजीपेक्षा बाजीरावच हवेत!

एकदा मी. तात्यांना मी भेटण्यास गेले असतां एक वर्तमानपत्र पुढे करून ते म्हणाले,—

"वाचा आणि विचार करा!"

मी वर्तमानपत्रांतील घडलेली एक हकीकत वाचली. त्यांत एका जमातींतील स्त्रीने आपल्या नवऱ्याकरतां दुसऱ्या जमातींतील तरुण व सधन स्त्रीला फुसलावून नेलें व तिचा आपल्या नवऱ्याशी निका लावून दिला इ. भयंकर मजकूर होता. नंतर तात्या आमच्याकडे पाहून उद्वेगाने म्हणाले :—

"वाचलेंत ! वास्तविक अशा गोष्टी सर्व धर्मांनी वर्ज्यच सांगितल्या असून, त्या त्याज्यच मानावयाला हव्यात हें खरें ! पण तें संबंधित समाजाकडून सांभाळलें गेलें तरच ! नाहीपेक्षा, अशा वेळीं कल्याणच्या सुभ्यांत लूट म्हणून आणलेल्या मुल्ला अहमदच्या सुनेला वहीण मानून तिला चोळी-बांगडी करून पाठविलेल्या छत्रपति शिवाजी महाराजांपेक्षा मस्तानी बाळगलेले श्रीमंत बाजीरावच मी अधिक पसंत करीन !

तुम्ही स्त्रियांनी हेंच तंत्र अवलंबून विरुद्ध गटांतील स्त्रियांना बळावीत आपल्या पुरुषांना साहाय्य केलें म्हणजेच हे असले आसुरी प्रकार कोणत्याच जमातींत किंवा धर्मांत होणार नाहींत !"

मनोरमा देशपांडे, पुणें.

* * *

## १७०. धर्माचें स्थान हृदय–पोट नव्हे !

इ. स. १९२७ साल. ती. तात्या रत्नागिरी येथे सेंट हेलेना बेटांतल्या नेपोलियनप्रमाणे आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध, समाजसुधारणाविषयक क्रांतिकारक लेख लिहून कंठीत होते. मी नुकताच पुण्याहून रत्नागिरीस बलवंत संगीत मंडळीकडे उतरलों होतों. त्याचवेळीं सार्वजनिक काकांचे नातू त्या वेळचे 'भारत इंडस्ट्रिअल् वर्क्स,' या पेपरमिंट कारखान्याचे मालक कै. केशवराव जोशी यांना आपल्या कारखान्यांत तयार केलेल्या लेमनड्रॉप्सवर ती. तात्यांना भेटून त्यांचा अभिप्राय घ्यावयाचा होता; म्हणून माझ्याकडे ते बलवंत सं. मं. च्या बिऱ्हाडीं कांही पेपरमिंटचे नमुने



घेऊन आले. नंतर आम्ही ती. तात्यांना भेटलों व सारे नमुने त्यांना दिले. यासंबंधीं दोघांची प्रश्नोत्तरें जी झाली ती अशीं :—

तात्या :—अगोदर तुम्ही आपल्या कारखान्याचें नांव शुद्ध मराठी करा पाहूं ! सार्वजनिक काकांच्या नातवाने 'भारत इंडस्ट्रिअल् वर्क्स' हें नांव द्यावें, हेंच आधी गौण आहे. बरं पावसाळ्यांत तुमचे हे पेपरमिंट्स पाझरत नसतीलच.

जोशी :—चांगलेच पाझरतात. कारण, परदेशी पेपरमिंटचे कारखानदार 'जिलेटिन' वापरतात. आम्ही तें वापरीत नाही. त्यांत गाईच्या शिंगापासून व खुरापासून तयार केलेला एक विशिष्ट प्रकारचा अर्क असतो ! म्हणून जिलेटिन वापरणें हें मी धर्मबाह्य मानतों !

तात्या :—तर मग देशाच्या औद्योगीकरणांत तुमच्याकडून कांही नवीन भर पडेलसें वाटत नाही. हें पहा, तुम्ही पेपरमिंटमध्ये अवश्य जिलेटिन वापरून विदेशी कारखानदारांशी स्पर्धा करा. त्यांत धर्मबाह्य कांही नाही. अहो, धर्माचें स्थान हृदय आहे, पोट नव्हे ! "

## १७१. शरण नाहीं, रण—मारीत मारीत मरण !

"आत्यंतिक अहिंसा तत्वामुळे शाक्य राष्ट्राची नुसती धुळधाणच नव्हे, तर भगवान् गौतमबुद्धाचा ऱ्हास झाला. बुद्धालाहि मरतां मरतां मेलेल्या डुकराचें मांस खाऊन आपल्या क्षुधित आत्म्याला जगवावें लागलें आणि शेवटीं ऐंशीव्या वर्षी महारोगानेच त्याला निर्वाणपद पहावें लागलें ! याचें कारण एकच की, बुद्धाने हिंसा-अहिंसेचीं टोकें एकत्र सांधण्याचा निष्फळ प्रयत्न केला. बळी तो कानपिळी हें तत्व तो विसरला ? एकूण आकाश आणि पृथ्वी ह्यांचीं टोकें जशीं कल्पांतीहि एकत्र सांधलीं जाणार नाहीत तशीच ती हिंसा-अहिंसाहि एकचित्त राहूं देणार नाहींत ! सृष्टीचा उत्कर्षापकर्ष हा रक्तलिप्त हिंसेनेच होत असतो ! अहिंसेने नव्हे !!"

'बलवंत संगीत मंडळी' च्या मालकांनी ती. तात्यांकडे नवीन नाटकाची मागणी केली असता, त्यांच्या तोंडून वरील उद्गार निघाले. ते ऐकल्याबरोबर मा. दिनानाथ व कोल्हटकर यांनी तात्यांना बुद्धाच्या जीवनावरच नवीन नाटक लिहून द्या म्हणून आग्रह धरला. ती. तात्यांनी तो दोन वर्षांनी इ. स. १९२९ सालीं 'संन्यस्तखड्ग' हें नवीन नाटक लिहून पूर्ण केलं.

या नाटकाकरता बलवंत सं. मं. ने चाळीस हजार रुपयांची सीन-सिनरी केली. सुप्रसिद्ध पळशिकर पेंटर यांनी दुसऱ्या अंकांतील शेवटचा बुद्ध विहाराचा सीन उत्कृष्ट केला. अजिंठ्यांतील बुद्धविहार-लेणी, लोकांच्या दृष्टीसमोर उभी केली. हा सीन व त्यांतील शस्त्रग्रहणाचा समरप्रसंग इत्यादि प्रवेश पाहून ती. तात्या म्हणाले –

" मी वर्णन केलेल्या हिंसा-अहिंसेच्या विषयपूर्तीला जर हे दोन कलावंत म्हणजे हिंसक कोल्हटकर व अहिंसक पळशिटकर लाभले नसते तर मग नाटक लिहूनही मी अयशस्वी ठरलों असतों ! "

तथापि दुर्दैवाने या नाटकाला प्रेक्षकांकडून जो मानसन्मान मिळावयास हवा होता तो मिळाला नाही ! फक्त नागपूरकरांनीच या नाटकाचें कौतुक केलें. पुण्यास तर तें उमगलेंच नाही. गांधीवादाच्या अनुयायांना तर जणू काय आपल्या राजकारणावर बॉम्बगोळाच सावरकरांनी टाकला अशी भीति वाटली आणि कांहींनी प्रच्छन्नपणें इंग्रज राजकर्त्यांच्या कानीं लागून असा वीरमंत्र फुंकला की, " पहा ! सावरकरांनी राजकारणासंबंधी कांहीही लिहिणार नाही असें सांगितलें, पण शेवटीं नाटक लिहून त्यांत आपलीं क्रांतिकारक तत्त्वें – 'शरण नाही, रण – मारीत मारीत मरा !' हें प्रतिपादिलेंच !

## १७२. थापांना मारीत नाही, गप्पांना छाटीत नाही.

'संन्यस्त खड्ग' नाटकांतील तात्यांनी केलेला म्हणजे बुद्ध भिक्षूच्या तोंडीं घातलेला एक बंडम (विनोदाचा विषय) विडंबनानुरूप साहित्यान्तर्गत झालेला अभिनव प्रकार आहे ! पण नाटकाला आलेल्या व गांधी तत्त्वज्ञानाचा शुष्क अभिमान बाळगणाऱ्या एका खादीवेषधारी वृद्ध नाटककाराने अंक झाल्यावर आंत येऊन तात्यांना उपरिनिर्दिष्ट विनोदाबद्दलची आपली तीव्र नापसंती दर्शविली. ती ऐकून तात्या म्हणाले:—

विषयाच्या पूर्तीकरता आत्यंतिक रसविमर्श साधून ती विविध रसांत रममाण होणाऱ्या प्रेक्षकांना पटवून देणें, हें नाटककाराचें प्रमुख कर्तव्य आहे. "अहिंसेनें हिंसा नाहींशी होईल," – असें तुम्ही लोकांनी समाजांत बोलणें, सांगत सुटणें – हीही एक शाब्दिक हिंसाच तुमचेकडून कळत न कळत होते



याचा नीट विचार करा. आजपासून पंचवीस वर्षेंच काय, पण या जगाच्या दुर्दैवाने पंचवीसशे वर्षांनंतरही जगांत शस्त्रयुद्धाचेंच प्राबल्य दिसून येईल! ज्या राष्ट्राच्या माथीं प्रजाक्षय मारला जातो आणि जेथे शस्त्रसंन्यासाचा घातुक उपदेश केला जातो, त्या दीन दुबळ्या राष्ट्राचा वाली साक्षात् परमेश्वरही होणार नाही ! मग मानवांचा विचारच कशाला ?

नंतर दुसऱ्या अंकांतील बुद्धभिक्षु विक्रमाचा शस्त्रग्रहणाचा प्रसंग पाहून तेच गृहस्थ कबुलीजबाब देत म्हणाले:—

" तात्या, अंकाच्या शेवटीं फार मोठा सिद्धान्त तुम्ही लोकांना सांगितला. खरोखरच, शस्त्रसंन्यासाच्या परिषदा भरविणाऱ्या मंडळींनी आणि त्यांच्या खटाटोपाला कोरडीच सहानुभूति दाखविणाऱ्या राष्ट्रांनी तुमचा हा 'संन्यस्त खड्ग' नाटकांतील दुसऱ्या अंकांतील शेवटचा शस्त्रग्रहणाचा प्रवेश जरूर वाचावा, अवश्य पहावा इतका तो तात्त्विक – 'सिद्धान्तरूप' झाला आहे !"

## १७३. गोवधबंदीवर सोपा उपाय !

धर्मवेडामुळे अहिंदूकडून जी गाईंची कुर्बानी केली जाते, ती कोणत्या उपायाने बंद करता येईल ?

एका गोरक्षण कार्यकर्त्यांनें तात्यांना हा प्रश्न विचारतांच ते म्हणाले:–

"गोवध बंदीवर फारच सोपा उपाय तुम्हांला करतां येण्याजोगा आहे. आणि तो म्हणजे जन्मतांच त्यांना डुकराच्या चरबीचीं अशी टोचून, तशी त्यांच्या अंगावर वैष्णवांच्या तप्तमुद्रेप्रमाणे खूण करून ठेवावी. म्हणजे गायींची कुर्बानी होण्याचें आपोआपच थांबेल ! तसेंच, मूर्तिभंजकाकरतां प्रत्येक देव-देवळांवर जर वराह-मूर्ति बसविली, तर ते अशा देवळांकडे मुळीच फिरकणार नाहीत ! धर्मवेडांतून धर्मयुद्धें निर्माण करण्याची आपल्याला सवय झालेली आहेच; पण आज धर्मवेडाला धर्मवेडानेच सडेतोड देत ती वाढविली पाहिजे !"

ती. तात्यांच्या अशा कितीतरी बारीक सारीक आठवणी सांगता येतील ! त्यांच्या 'संन्यस्तखड्ग' या नाटकावरील मी जो टीकाप्रबंध इ. स. १९३२ सालीं 'सूर्यकांत' मासिकांतून प्रसिद्ध केला, तो पाहूनच तात्यांनी मला बोलावून शाबासकी देत म्हटले, –

"माझ्या भाषाप्रभुत्वावरील-तुमची टीका योग्यच आहे; कारण, रंगभूमीवरील नाटकी भाषा मला माझ्या जन्मठेपेमुळें मुळींच आत्मसात् करतां आली नाहीं आणि मी मराठी रंगभूमि पाहूंहि शकलों नाहीं. तथापि तुमच्या टीकाप्रबंधांत माझ्या – 'संन्यस्तखड्ग' या नांवाचें व्यापकत्व म्हणून जें विवेचिलेलें आहे तें वाचून मी एवढेंच म्हणेन की, 'तुम्ही माझ्या अंतःकरणाला हात घातला आणि त्यांतील बोल न् बोल लोकांपुढे मांडून माझें ध्येय साध्य केलें."

त्या वेळेपासूनच मी तात्यांना केव्हांही आपुलकीने भेटत गेलों. तात्या 'समाजसंभव' या नांवाचें एक अत्यंत समाजक्रांतिकारक नाटक लिहून, तें बलवंत संगीत मंडळीला देणार होते. तसा त्यांनी कंपनीबरोबर करारहि केलेला असून, तो माझ्या संग्रहीं आहे. पण – नि सध्यां पुरे !

सारांश, इटलीचा स्वातंत्र्यदाता जोसेफ मॅझिनी, राष्ट्रीय मंत्राचा मंत्रद्रष्टा गॅरिबाल्डी नि आयर्लंडचा सूत्रचालक इमान डी. व्हॅलेरा, या त्रैमूर्तीप्रमाणेच भारताला ललामभूत झालेला स्वातंत्र्यसिद्धीचा सिद्धिविनायक म्हणजेच स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर होत !

– वि. ना. कोठीवाले, पुणें

✦ ✦ ✦

## १७४. कोण हे बापूजी

सन १९४१ किंवा १९४२ ची गोष्ट असेल. वीर सावरकर दिल्लीला आले होते. लोकनायक बापूजी अणे त्यांना भेटावयास आले. ते म्हणाले, "आम्ही असेंब्लीच्या वहावारा सभासदांनी 'नॅशनॅलिस्ट पार्टी' बनविली आहे. तेव्हा आपण त्या पार्टीला भेट देण्यास यावें." वीर सावरकरांनी त्यांचें निमंत्रण मान्य केलें. त्यानंतर लोकनायक अणे हे दुसरी विनंती करतांना म्हणाले, "आपण बापूजींना भेटावयास यावें." सावरकर म्हणाले, "कोण बापूजी ?" अणे म्हणाले, "बापूजी म्हणजे महात्मा गांधी." तें



ऐकतांच सावरकर म्हणाले, "माझें गांधींच्याकडे कांहींच काम नाहीं. त्यांचें माझ्याकडे कांही काम असल्यास त्यांना म्हणावें आपणच मजकडे भेटावयास यावें. ते जर जिनांचे सतरा वेळा उंबरठे झिजवितात तर मजकडे येण्यास त्यांना काय हरकत आहे ?"

## १७५. गुरूंना आपल्या शेजारीं बसविलें.

वीर सावरकर लखनौस आले असतांना तेथील महाराष्ट्र मंडळानें त्यांचा भव्य सत्कार केला. रँग्लर र. पु. परांजपे या वेळीं लखनौ विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून काम पाहत होते. सावरकरांच्या सत्काराला तेहि महाराष्ट्र मंडळांत आले. ते व्यासपीठाच्या समोरील बैठकीवर बसले. व्यासपीठावरून सावरकरांना परांजपे दिसले. तत्क्षणी सावरकर खालीं उतरून परांजप्यांच्याकडे गेले व त्यांनीं त्यांना लवून वंदन केलें व हाताला धरून आग्रहानें व्यासपीठावर आपल्या शेजारीं बसविलें. वीर सावरकर फर्ग्युसन महाविद्यालयांत असतांना परांजपे त्यांचे गुरु होते. गुरु-शिष्यांची राष्ट्रीय चळवळीतील चकमक इतिहासप्रसिद्ध आहे.

## १७६. दिल्लीचा लाल किल्ला

हिंदुमहासभेच्या प्रचार दौऱ्यावर वीर सावरकर असतांना १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें पाहिल्याशिवाय राहात नसत. वयाच्या २४ वर्षी त्यांनी इंग्लंडमध्ये ब्रिटिश ग्रंथालयात बसून त्यावर अपूर्व व क्रांतिकारकांची गीता ठरावी असा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथांतील कानपूर, मीरत, लखनौ, दिल्ली, ग्वाल्हेर, लालकिल्ला इत्यादि अनेक स्थळें प्रत्यक्ष पाहण्याचा योग त्यांना १९३७ नंतर आला. त्यांनीही प्रत्येक ठिकाण अतिशय बारकाईने व विशेष भावनेने पाहिलें. १८५७ मधील वीरांचे जे वंशज तेथे होते त्यांच्याकडे जाऊन त्यांची विचारपूस आस्थेने केली. दिल्लीच्या लाल किल्ल्यांत सावरकर आले, त्या वेळीं त्यांचें मन भारावून गेलें. त्या किल्ल्याचा मार्गदर्शक त्यांना माहिती देऊं लागला. त्याला हे सावरकर आहेत हें माहीत नव्हतें. आमच्याकडून कळतांच त्याने आपलें इतिहासाचें ज्ञान आवरतें घेऊन त्यांना नमस्कार केला.

– ब. बा. बर्वे, पुणें

✦ ✦ ✦

## १७७. वीरपत्नीचें दर्शन

१९३८ मध्यें वीर सावरकर पनवेलला आले होते. त्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. रस्त्यांत त्यांना ठिकठिकाणीं पुष्पहार अर्पण केले जात होते. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे पुतणे त्यांना पुष्पहार घालण्यासाठीं पुढे आले. वासुदेव बळवंत फडके या हुतात्म्यांची पत्नी येथेच राहात आहे असें सावरकरांना कळतांच ते मिरवणुकींतील गाडींतून खाली उतरून तिकडे निघाले; तेव्हां, व्याख्यानाची वेळ होत आलेली आहे व्याख्यान झाल्यानंतर आपण जाऊं, असें त्यांना कार्यकर्त्यांनी सांगितलें. व्याख्यान आटोपल्यावर वीर सावरकर चालत त्या बाईंच्याकडे गेले व त्या वीरपत्नीला नम्रभावाने त्यांनी अभिवादन केलें. पायांवर पुष्पहार अर्पण करून हुतात्मा फडके यांच्या कार्याविषयी स्फूर्तिदायक शब्दांत श्रद्धांजलि वाहिली. माझ्या माहितीप्रमाणें या वीरपत्नीचें दर्शन घेण्यास इतक्या अगत्यानें वीर सावरकरांव्यतिरिक्त यापूर्वी कोणीही आलेलें नव्हतें.

## १७८. शिव्या खाण्यांत वेळ चालला आहे.

वीर सावरकर मुंबईहून पुण्यास निघाले होते. नेरळ स्थानकावर त्यांच्या दर्शनाकरिता आम्ही अनेकजण गेलों. सावरकर आम्हां तरुणांना पाहतांच डब्याच्या दारांत आले. नेरळच्या स्थानकावर गाडी कांही मिनिटेंच थांबते. तेवढ्यांत त्यांना पुष्पहार अर्पण करून कुशल विचारलें. नेरळ गांवच्या हवामानाविषयी ते विचारीत असतांना मी म्हणालों, "आपण माथेरानची हवा खाण्यास यावें." वीर सावरकर गाडी सुटतांना म्हणाले, "आता हवा खाण्यास वेळ नाही, सध्या शिव्या खाण्यांत वेळ चालला आहे"

## १७९. लढाऊ हिशेब म्हणजे काय ?

हिंदुसभा कार्यकर्त्यांची लोकमान्य टिळक मंदिरांत खाजगी स्वरूपाची बैठक चालू होती. अण्णाराव भोपटकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर या बैठकीस उपस्थित होते. बैठकींतील महत्त्वाचे विषय संपल्यानंतर हास्य-विनोद चालू झाले. अण्णाराव भोपटकर भाषण करीत असतांना एक कार्यकर्ता म्हणाला, "आपल्या लढाऊ राजकारणाप्रमाणे आपले हिशेबही लढाऊ



स्वरूपाचे असावे." अण्णाराव भोपटकर थोडे गंभीर होऊन म्हणाले, "मला लढाऊ राजकारण समजतें. परंतु लढाऊ हिशेब म्हणजे काय हें समजत नाही." भोपटकरांनी असें म्हणतांच वीर सावरकर स्मितहास्य करीत म्हणाले, "लढाऊ हिशेब म्हणजे असें की, जे हिशेब पाहिले असतां परस्परांत मारामाऱ्या सुरू होतील." बैठकींत त्यामुळे खूपच हंशा पिकला.

## १८०. तेथेही स्टॅलिनचे पुतळेच आहेत

१९४३ मध्ये वीर सावरकर पनवेलला आले होते. त्यांच्या आदर-सत्काराकरिता श्री. पंढरीशेठ जाईल यांच्याकडे त्यांना मोठी मेजवानी झाली. त्यांच्या पंक्तीला गांवांतील बरीच प्रतिष्ठित मंडळी होती. जेवणाची पंगत चालू असतांनाच चर्चा चालू होती. एक कार्यकर्ते, रशियांतील समतेची स्तुति करून सावरकरांना म्हणाले, "रशियांत व्यक्तिपूजा नाही." सावरकर म्हणाले, "अशीच केवळ वस्तुस्थिति नसून तेथेहि लेनिन-स्टॅलिनचे पुतळे आहेत. त्यांच्या पूजा आहेत, पुष्पहार आहेत. सर्व कांही आहे. आपण म्हणतां तें समतेचें तत्त्व ठीक आहे, परंतु व्यक्तिमत्त्वाचें महत्त्व संपूर्णपणें केव्हांही नाहींसें होणार नाही."

## १८१. सिंध तोडू नका!

डोंबिवली येथे वीर सावरकर आले असतांना त्यांना कल्याण वसाहतींतील कांही सिंधी कार्यकर्ते भेटावयास आले. भारताच्या फाळणीचा विषय निघाला. सिंधी निर्वासितांनी आपल्यावर आलेलीं संकटें त्यांना सांगितलीं. वीर सावरकर त्यांना म्हणाले, "मी एकूण परिस्थिति लक्षांत घेऊनच वेळोवेळीं सूचना देत आलों आहे. त्यामध्येच मुंबई प्रांतापासून सिंध तोडू नका असें सांगितलें होतें. आपण कोणीहि माझें ऐकलें नाही. आता या परिस्थितीच्या आपत्तींत आपले आडवाणी आणि मिळवाणी आहेत कोठें? या आपत्तींत आपल्या सर्वांना मदत करण्याचें आमचें तर कर्तव्य आहे."

—वि. रा. सुगवेकर, पनवेल

* * *

## १८२. सत्याग्रहाच्या शास्त्राधाराचा अचूक वापर

भागानगर निःशस्त्र प्रतिकाराच्या लढ्याला नुकतीच सुरवात झाली होती. आर्यसमाज व स्टेट कॉंग्रेसनेही आपापले सत्याग्रह सुरू केले होते. त्यामुळे दूरदृष्टीने सुरू केलेल्या निःशस्त्र प्रतिकाराला धार चढू लागली होती. सर्व हिंदुस्थानामधून या लढ्याला साहाय्य मिळू लागलें होतें. पण संस्थानी स्वार्थी वृत्ति व मुसलमानी अत्याचारी राजवट यांना हिंदुत्वाच्या भूमिकेवरून सुरुंग लागलेला पाहतांच गांधींनी स्टेट कॉंग्रेसला सत्याग्रह बंद ठेवण्याची आज्ञा दिली. गांधींना असें वाटलें की, हिंदुत्वाची भूमिका जर यशस्वी ठरली तर कॉंग्रेसचें निःपक्षपाती धोरण म्हणजे मुस्लिम अनुनय संपुष्टात येईल. याच दुष्ट दृष्टीनें सत्याग्रह बंद केला.

गांधींच्या आज्ञेप्रमाणे स्टेट कॉंग्रेसने तर सत्याग्रह बंद केलाच, परंतु तथाकथित आर्यसमाजीही आपला सत्याग्रह बंद करण्यास सिद्ध झाले. ते आर्यसमाज अथवा निजामी अत्याचारांना विरोध करण्यापेक्षा गांधींच्या आज्ञेला श्रेष्ठ मानीत असत. या सत्याग्रहाचे सूत्रधार लो. अणे व घनश्यामदास गुप्ता यांनी सोलापूरला कृतिसमितीची सभा बोलाविली. या सभेच्या सुमारास वीर सावरकरांचा मुक्काम सोलापूरलाच होता. तेव्हा त्यांनाहि सभेला बोलाविण्यांत आलें. प्रारंभी लोकनायक अणे यांनी गांधींची भूमिका सभेला समजावून सांगितली. ते म्हणाले 'सत्याग्रहाला जातीयतेचें स्वरूप येत चाललें आहे. जाती-जातींत वैमनस्य निर्माण झाल्यास भयंकर संघर्ष होईल व इच्छित कार्य साध्य होणार नाही.' घनःश्यामदास गुप्ता म्हणाले, 'गांधीजी स्वतः सत्याग्रह शास्त्राचे प्रणेते आहेत, त्यांनी अनेक वेळां अनेक ठिकाणीं व प्रसंगीं सत्याग्रह केले आहेत. सत्याग्रहाचें त्यांचें निदान अचूक असतें. तेव्हा सध्याच्या सत्याग्रहाचें स्वरूप ओळखून त्याचें निदान करून तो बंद करण्याची त्यांनी दिलेली आज्ञा आम्हाला पाळली पाहिजे. नाहीतर लक्षावधि हिंदूंच्या कत्तलीस आपण कारणीभूत होऊं. घनश्यामदास गुप्तांचें भाषण झाल्यावर अनेक आर्यसभेच्या नेत्यांचीं भाषणें झालीं व त्यांनी सत्याग्रह बंद करावा अशा अर्थाच्या वरील वक्त्यांच्या भाषणाला दुजोरा दिला.



शेवटीं स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भाषण करण्याची विनंती करण्यांत आली. सावरकर म्हणाले, 'ही सभा आर्यसमाजाची आहे. मी हिंदुसभावादी आहे आणि म्हणून माझ्या मताला येथे महत्त्व देण्याचें कारण नाही. शिवाय वक्ता म्हणून मला बोलावें लागेल अशी पूर्व सूचनाही मला दिली गेली नव्हती. तेव्हा मीं भाषण देऊन आपलें मत व्यक्त करावयाचें कांही प्रयोजन उरत नाही. तरी पण सभाध्यक्ष श्री. घनश्यामदास गुप्ता यांनी वीर सावरकरांना आग्रह केल्यावरून वीर सावरकर बोलावयास उठले. ते म्हणाले:—

सत्याग्रह हा मुळी समान प्रवृत्ति, अक्कल व सहृद माणसांच्यात समोर करावयाचा असतो. त्यामुळे सत्याची जाणीव त्याला होऊन आपलें अज्ञान तो प्रांजलपणें कबूल करू शकेल. आपल्याबद्दल ज्याला मुळीच तसा भाव नाही, आपला छळ करण्याचा ज्यांनी मुळी विडाच उचललेला आहे, आपला सर्वनाश हेंच ज्यांचें उद्दिष्ट आहे अशांच्या समोर, अशांच्याकरिता सत्याग्रह करण्याची कल्पनाच मुळी निराधार आहे. शिवाय सत्याचा एकदा आग्रह धरल्यास त्यापासून आपण परावृत्त झालों तर तो आग्रह असत्याचा आग्रह ठरतो. सर्व गोष्टींचा सारासार विचार केल्यानंतर मगच सत्याग्रहाचें शस्त्र आपण उचललेलें आहांत. अशा स्थितींत नसत्या कल्पनेला महत्त्व देऊन आपण असत्याग्रही होऊं नये असें मला वाटतें. सत्याग्रहींचा तर उलट हा धर्म असतो की जगांतील कुठलेंही प्राणसंकट जरी त्यांच्यासमोर उभें राहिलें तरी त्याची तो मुळीच परवा करीत नाही. मोठ्या गौरवानें तो आपले प्राण समर्पीत असतो. तेव्हा आपणाला तर मुळीच सत्याग्रह बंद करता येणार नाही. शिवाय ज्या हुतात्म्यांनी, ज्या सत्याग्रहींनी आपली आज्ञा प्रमाण मानून तुरुंगवास पत्करले, हाल-अपेष्टा भोगल्या, आपलें सर्वस्व गमावलें, प्रसंगीं आपले प्राणांहि दिले ते सत्याग्रही आपणांला काय म्हणतील ? राणा प्रतापवर एकदा असाच प्रसंग आला होता. तो संधिपत्र लिहून आपले प्राण वांचविणार होता. परंतु स्वतंत्रता देवीनें त्याचा उपहास केला. ती म्हणाली, 'संधिपत्र लिहिण्याचा अधिकार तुम्हांला मुळीच पोंचत नाही. तो पोंचलाच तर तो हुतात्म्यांना पोंचतो.' स्वतंत्रतादेवीचे हे उद्गार ऐकून राणा प्रताप सावधान झाले व आमरण लढण्याची त्यांनी सिद्धता केली. मला असें वाटतें की आपणहि राणा प्रतापाप्रमाणे उचललेलें पाऊल मागे घेऊं नये. सत्याग्रह तत्त्वाला कलंकित करू नये. सत्याग्रहींचा विश्वासघात करूं नये.

वीर सावरकरांचें प्रभावी, शास्त्रीय व मुद्देसुद भाषण ऐकून सभेच्या विचारांत एकदम क्रांति झाली. जी सभा एकमतानें सत्याग्रह बंद करावा असें म्हणत होती त्या सभेनें बहुमतानें सत्याग्रह चालू ठेवण्याचा प्रस्ताव संमत केला.

अशा रीतीनें वागून वीर सावरकरांनी अंधश्रद्धेला सत्याग्रहाच्या शास्त्रीय रूपाचा आधार घेऊनच जणू काय सुरुंग लावला आणि महासभेने चालू केलेल्या निःशस्त्र प्रतिकाराला अप्रत्यक्षपणें फार मोठें साहाय्य मिळवून ६०० वर्षांच्या निजामी जुलूमशाहीचा अंत्यदिवस नजीक आणला. त्यामुळेच वल्लभभाईंच्या प्रेरक शक्तीने निजामीची हिंदुजनता आपले पाय पुढे जोमानें टाकू शकली. नाही तर हैद्राबादचें काश्मीर झालें असतें !

—म. तु. कुळकर्णी, पुणें.

✦ ✦ ✦

## १८३. एकमेव मार्ग म्हणजे सैनिकीकरण

१९३९ मध्ये दुसरें महायुद्ध सुरू झालें. नंतर त्या परिस्थितींत कोणतें धोरण ठेवावें असा मुख्य प्रश्न होता. काँग्रेसने युद्धविरोधी धोरण प्रकट केलें होतें. "राज्यकर्त्यांची अडचण तीच आपली सुवर्णसंधि" या राजकीय सूत्रवाक्याने आम्ही प्रेरित झालेले असल्याने आमचें सर्वांचें इंग्रजांना सर्व प्रकारें विरोध करावा असें मत होतें. महाराष्ट्रांतील बहुतेक नामवंत नेत्यांचेंहि असेंच मत होतें. स्वातंत्र्यवीर सावरकर सोडून अ. भा. हिंदुसभेच्या प्रमुख नेत्यांचाहि महाराष्ट्राच्या मताला पाठिंबा होता. अशा स्थितीत मदुरेच्या अधिवेशनांत तात्यारावांनी सैनिकीकरणाचा आदेश दिला. उलट, सर्व प्रतिनिधींच्या आग्रहावरून दोन तीन महिन्यांत परिस्थितीत घडणारा फरक पाहून प्रत्यक्ष प्रतिकाराची चळवळ सुरू करावी की काय व त्याचीं साधनें कोणती हा विचार मांडणारा प्रस्तावहि संमत झाला. मदुरा अधिवेशनांतहि इंग्रजांशी प्रत्यक्ष शस्त्रांनिशी सामना करणारे सावरकर सैनिकीकरणानें नकळत साम्राज्यवाद्यांचे हस्तक कसे बनतात याचें आश्चर्य



हिंदुस्थानांतील सर्व क्रांतिकारकांना वाटत होतें ! ! माझ्यासारख्या हिंदुसभेचा प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्याला प्रभावीपणें सैनिकीकरणाचें धोरण समाजापुढे मांडणें अशक्यप्रायच वाटत होतें. म्हणून मी तात्यारावांस अगोदर कळवून या विषयावर बोलण्यासाठी त्यांच्याकडे गेलों. मी लहानसा कार्यकर्ता असूनहि मनमोकळेपणानें त्यांनी सैनिकीकरणांतील आपली भूमिका मला समजाविली. त्याचा तात्पर्यार्थ (१) सैन्यांतील हिंदूंचें प्रमाण पुरेशा प्रमाणात वाढलें तरच आपण पाकिस्तानी कृतीला प्रभावीपणें विरोध करूं शकूं. (२) अमेरिका युद्धांत आल्याकारणानें आता हिंदुस्थानामधील व जगाच्या राजकारणामधील इंग्रजांचें महत्त्व निश्चितपणें कमी होणार आहे. (३) स्वातंत्र्यप्राप्तीकरिता इतर सर्व उपाय संपुन सशस्त्र क्रांति करावयाची झाल्यास सैनिकाद्वारा होणारी क्रांति हीच सफल व परिणामकारक होऊं शकते. (४) सैनिकाला साहाय्यक होणारे कारखाने हेच आपल्या देशांत कायमचे राहणार असून यामुळे राष्ट्राची प्रगति निश्चित साधणार आहे. (५) अंतिम क्रांतीचे वेळीं हे कारखाने उडवून द्यावयाचे झाल्यास आपली कारखान्यांत काम करणारी माणसें अत्यल्प संख्येच्या बळानेसुद्धा काम पूर्णपणें करूं शकतील; बाहेरील लोकांचे अहिंसावादी मोर्चें हें काम मुळीच साधू शकणार नाहीत. इत्यादि विवेचन करून या सर्व गोष्टी साधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सैनिकीकरण हाच होय असें तात्यारावांनी सांगितलें. याचा परिणाम म्हणूनच मी १९४२-१९४३ सारख्या क्रांतिमय कालांतहि हिंदुमहासभेचा प्रचार माझ्या परीनें करूं शकलों. १९४७ च्या स्वातंत्र्यकाळांत तात्यारावांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव हिंदुस्थानला आला. हें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाही.

## १८४. तरी तो शेण-किडाच आहे!

१९३७ मध्ये सुटका झाल्यानंतर वीर सावरकरांसारखे प्रथम श्रेणीचे क्रांतिकारक कोणत्या राजकीय पक्षांत जातात हा प्रश्न सर्व महाराष्ट्रांत चर्चिला जात होता. वीर सावरकरांचें नेतृत्व व कर्तृत्व काँग्रेसवाल्यांना झेपण्यासारखें नव्हतें. असें असतांहि महाराष्ट्रांतील नामवंत काँग्रेसवाले सावरकरांनी काँग्रेसमध्ये यावें अशी इच्छा वैयक्तिकरीत्या वा समक्षपणे व्यक्त

करीत होते. १ ऑगस्ट १९३७ मध्ये सावरकरांचे लो. टिळक पुण्यतिथीच्या दिवशीं प्रकट व्याख्यान झालें. सावरकरांनी प्रारंभींच एक श्लोक म्हणून आपण कोणत्या राजकीय पक्षांत जाणार याची घोषणा केली. "राष्ट्र-स्वतंत्रताऽध्येयं, यथासाध्यं च साधनम्, अभ्युत्थानाय हिंदूनामयं पक्षः प्रवर्तितः" असें म्हणून आपण लोकशाही पक्षाचे सभासद झाल्याचें सांगितलें. पुढें थोड्याच दिवसांनी कर्णावती (अहमदाबाद) येथे वीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली अ. भा. हिंदुसभेचें अधिवेशन झालें. या अधिवेशनानंतर कर्णावती येथील महाराष्ट्रीय लोकवस्तीच्या विभागांत सावरकरांचें प्रकट व्याख्यान झालें. या व्याख्यानाचे प्रवर्तक प्रा. रा. ब. आठवले हे व्याख्यानापूर्वी सुप्रसिद्ध कांग्रेस देशभक्त व एक महाराष्ट्रीय दादासाहेब मावळंकर यांचेकडे गेले व त्यांना सावरकरांचे व्याख्यानास येण्याचें निमंत्रण दिलें. अर्थात् त्यांनी या निमंत्रणास नकार दिला. पण तो नकार देतांना मी वर व्यक्त केलेलें मत मावळंकरांनी प्रा. आठवले यांचेजवळ व्यक्त केलें. प्रा. आठवले यांचे मी ऐकलेले शब्द असे, "सावरकर हे हिंदुसभेंत जाण्याऐवजी जर कांग्रेसमध्ये आले असते तर त्यांना कांग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान अवश्य मिळाला असता. पण हिंदुसभेंत जाऊन त्यांनी आपलें क्षेत्र फार आकुंचित करून घेतलें." प्रा. आठवले यांनी सभेच्या सुरवातीच्या भाषणांत मावळंकरांचें प्रत्यक्ष नांव न घेतां त्यांचें म्हणणें सांगितलें. या आक्षेपाला उत्तर देणारें भाषण वीर सावरकरांनी केलें. वीर सावरकर उत्तरादाखल भाषणांत म्हणाले, "मी जर कांग्रेसचा सभासद झालों असतों तर कांग्रेसचा अध्यक्ष झालों असतों हे म्हणणें मी अमेरिकेचा नागरिक झालों असतों तर अमेरिकेचा अध्यक्ष झालों असतों असें म्हणण्या-सारखेंच आहे. केवळ मानाचीच अपेक्षा असती तर कांग्रेसचा अध्यक्ष होण्या-पेक्षा अमेरिकेचा अध्यक्ष होणें श्रेष्ठपणाचें होतें. आपण सर्वजण पारतंत्र्यांत असल्याने आपलें स्वातंत्र्य हे किडदामुऱ्यांच्या स्वातंत्र्याप्रमाणे नामधारी आहे. शेणकिड्यांतील सर्वांत वरचा किडा हा इतरांच्या मानाने उच्चस्थानी असला तरी तो शेणकिडाच आहे हें ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे." प्रा. रा. ब. आठवले आपल्या आठवणींत लिहितात की, "महाराष्ट्रीयांपैकी गांधीजींच्या नेतृत्वाखाली कांग्रेसमध्यें काम करणाऱ्या आमच्यांतील काही प्रतिष्ठित मंडळींनी या संकल्पित सत्कारसमारंभाला कसून विरोध केला. या समा-



रंभाला येण्यापूर्वी वरील विरोधकांच्या कारवायांची हकीकत वीर सावर-करांच्या कानावर घालण्यांत आली होती. प्रा. रा. ब. आठवले हे सावर-करांना मुद्दाम डिवचण्यासारखें जें बोललें त्याची भर पडली.

—ह. भा. भिडे

* * *

## १८५. राष्ट्रभाषेचें हें गमक !

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर कै. तात्याराव केळकर यांच्या अध्यक्षतेखाली वीर सावरकरांचें भाषण झालें. प्रचंड गर्दी झाली होती. टाळ्यांच्या कडकडाटांतच सभा झाली. गांधींच्या हिंदुस्थानी राष्ट्रभाषे-संबंधाने वीर सावरकर म्हणाले, "गांधीजी म्हणतात How can that be a national language which—असें बोलून सावरकर व्यासपीठाशेजारी व मागे बसलेल्या लोकांच्याकडे वळून म्हणतात "कोण हो ते मुसलमान गृहस्थ! गांधीजींच्या आसपास असतात व ज्यांचा पगडा गांधीजींवर फार फार आहे. ते कोण बरं मुसलमान गृहस्थ" या वेळीं वीर सावरकरांनी असें नाट्य निर्माण केलें की, असें कांही त्यांचें नांव आपणांस माहीत नाही. इतक्यांत व्यासपीठावरचे कोणी म्हणाले, "त्यांचें नांव अबुलकलाम आझाद" तें ऐकतांच वीर सावरकर म्हणाले, "हो हो त्यांचें नांव आझाद—आझाद. मी विसरूनच गेलों त्यांचें नांव." यांचे मत गांधीजी फार मानतात. त्यांच्या मनाविरुद्ध जाण्यास ते तयार होत नाहीत. गांधीजी म्हणतात "How can that be a national language which Azad—the Maulana does not understand ? (जी भाषा मौलानांना समजत नाही ती (हिंदी) ही राष्ट्रभाषा कशी होईल ?" या वेळीं त्या प्रचंड सभेंत टाळ्यांचा अभूतपूर्व गजर झाला.

—स. के. नेऊरगांवकर

स मा प्त

* * *